नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## ११२ औषधे गुणवत्ता तपासणीत अपयशी

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २४ :
देशातील औषधांच्या गुणवत्तेबाबत सरकारने धक्कादायक माहिती उघड केली आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या तपासणीत ११२ औषधांचे नमुने गुणवत्ता चाचणीत अपयशी ठरले. याचा अर्थ असा की, ही औषधे रुग्णांना बरे करण्याऐवजी नुकसान पोहोचवू शकतात. या ११२ नमुन्यांपैकी ५२ नमुने केंद्रीय औषध प्रयोगशाळेने तपासले होते, तर ६० नमुने राज्य प्रयोगशाळांनी मानक दर्जाचे (ठरद) नसल्याचे आढळून आले. छत्तीसगडमधील एका औषधाचा नमुनाही बनावट असल्याचे आढळून आले. आरोग्य मंत्रालयाने अहवाल प्रसिद्ध केला. औषधांच्या गुणवत्तेची तपासणी दरमहा केली जाते. सप्टेंबरमध्ये अनेक शहरांमधून औषधांचे नमुने गोळा करण्यात आले.

* वर्ष ५५ * अंक २०३ * * नागपूर * शनिवार, दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

खरीखरी..

# अफगाणी हिसका

अफगाणिस्तानचे सरकार तालिबानी आहे. तालिबान म्हणजे आतंकवाद्यांचे समृद्धी स्थळ असे म्हणतात. अफगाणिस्तानच्या निवडून आलेल्या सरकारला सळो की पळो करून आधी पळवून लावले आणि मग तालिबानने सत्ता बळकावली. पूर्वी तालिबानी जेव्हा सत्तेवर आले होते तेव्हा त्यांनी अफगाणिस्तानातील बुद्धांच्या अनेक मूर्ती तसेच इतरही पुराणकालीन मूर्तींना नेस्तनाबूत करण्याचे महत्कार्य केले होते. आता हे नवीन तालिबानी चांगलेच माणसाळलेले दिसत आहेत. अजून या तालिबानी सरकारला जागतिक मान्यता मिळालेली नाही, भारताशिवाय इतर कोणताही देश त्यांच्या बरोबर संबंध ठेवायला तयार नाही. ज्या पाकिस्तानने भारताविरुद्ध तालिबानचा उपयोग करण्याचे ठरवले होते त्याच तालिबानने भारताशी मैत्री करून पाकिस्तानला भलतेच पेचात पाडले आहे. आता अफगाणच्या तालिबानी सरकारने अफगाणिस्तानात उगम पावणाऱ्या आणि पाकिस्तान मध्ये वाहणाऱ्या कुनार नदीचे पाणी अडवून त्या ठिकाणी मोठे धरण बांधण्याचा इरादा स्पष्ट केला आहे. ४८० किलोमीटर दूरवर पसरलेली कुनार नदी ईशान्य अफगाणिस्तान मधील हिंदूकुश पर्वतरांगांच्या बोरघिल खिंडीजवळ उगम पावते. याच कुनार नदीला पाकिस्तान मध्ये चित्राल नदी असे म्हणतात. अफगाणिस्तानचा हा निर्णय पाकिस्तानच्या तोंडचे पाणी पळवणारा ठरू शकतो. कारण याआधी पाकिस्तानला जाणारे सिंधू नदीचे पाणी अडवून भारताने पाकला त्याच्या दहशतवादी कारवायांबद्दल धडा शिकवण्याचे ठरवले होते. आता तालिबानने माणसाळल्यानंतर भारताने जसे पाकिस्तानचे पाणी तोडले तोच कित्ता अफगाणिस्तान गिरवणार आहे. यामुळे भारत आणि अफगाणिस्तान या दोघांनी जर पाकिस्तानला जाणारे पाणी रोखले तर पाकिस्तानची मोठीच कोंडी होणार आहे. पाकिस्तानला अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारकडून जे हवे होते ते मिळाले नाहीच, उलट अफगाणिस्तानने पाकिस्तान बरोबर उभा दावा मांडलेला आहे. आता नदीचे पाणी अडवून पाकिस्तानची जलकोंडी तालिबान्यांनी केली तर ते पाकिस्तानला महागात जाणार आहे. एकूणच पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणाचे सूत्र काय आहे हे कोणालाच समजेनाचे झाले आहे. एकीकडे पाकिस्तान चीनशी मैत्री करतो तेव्हा तो अमेरिकेचा विरोधक असतो. आता पाकचा सेनापती मुनीर अमेरिकेच्या पायावर लोटांगण घालतो आहे तेव्हा आता चीन बरोबरची पाकिस्तानची मैत्री कितपत टिकेल ही सुद्धा शंका आहे. पाकिस्तानला जो भीक देईल त्याचा पाकिस्तान मित्र असतो, याचे कारण पाकिस्तानच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा भाग लष्कराकडे जातो. पाकिस्तानचे लष्कर पाकिस्तानच्याच लोकशाहीच्या बोकांडीवर असे काही बसलेले आहे की, पाकिस्तानातील लोकशाहीमध्ये निवडून आलेले सत्ताधारी जोपर्यंत लष्कराच्या छत्रछायेच्या खाली येण्याचे मान्य करीत नाहीत. तोपर्यंत त्यांना राज्य करताच येत नाही. एकेकाळचा पाकिस्तानचा अत्यंत लोकप्रिय असलेला क्रिकेटपटू इमरान खान सत्तेवर आला त्याला सत्तेवर आणायलाही लष्करानेच मदत केली. पण जेव्हा तो लष्करावर उलटला तेव्हा त्याला चक्क जेलची हवा खावी लागली. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांनी थोडीशी शरीफाई दाखवल्यानंतर त्यांनाही पाकिस्तान सोडून पोबारा करावा लागला. अशा पाकिस्तानला आता भारत आणि अफगाणिस्तान या दोन सध्या तरी परस्पर मैत्री असलेल्या देशांनी धडा शिकवण्याचे ठरवलेले असावे. आपले पंतप्रधान स्पष्ट सांगतात की, पाकिस्तानने जर काही आगळीक आमच्याबरोबर केली तर त्यांचे थोबाड फोडण्यासाठी भारत समर्थ आहे. अशा अस्थिरबुद्धी पाकिस्तानला आता केवळ पाण्यावरून धडा शिकवण्याचे काम अफगाणिस्ताननेही हाती घेतलेले दिसते. भारताने आपले पाणी दाखवलेले आहे आणि आता अफगाणिस्तान ही पाकिस्तानला पाणीपाणी करायला लावणार आहे. जर हे शक्य झाले तर पाकिस्तान मधील सुजलाम सुफलाम भूमी जला अभावी त्यांना चांगले उत्पन्न देऊ शकणार नाही. हा पाकिस्तान साठी मोठाच धोका आहे भारताची मैत्री आज जरी हवेत तरंगत असली तरी काही समानधर्मी पाकिस्तान विरुद्ध अफगाणिस्तानने कोणती कारवाई करू नये यासाठी दबाव आणू शकतात. परंतु अफगाणिस्तानच्या सरकारला अजूनही जागतिक मान्यता नाही, त्यामुळे अफगाणिस्तान या दबावाला जुमानेल असे वाटत नाही. भारताबरोबर आलेल्या अफगाणिस्तानचा हिसका पाकला बराच महाग पडेल यात शंका नाही.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# आंध्र प्रदेशात धावत्या बसला आग
# २० जिवंत जळाले

■ वृत्तसंस्था, कुर्नूल, दि. २४ :
आंध्र प्रदेशातील कुर्नूल येथील चिन्नाटेकुरजवळ एका खासगी बसला आग लागली. वृत्तसंस्था एएनआयनुसार, या अपघातात २० प्रवासी जिवंत जळाले. काही माध्यमांच्या वृत्तानुसार ही संख्या २५ इतकी आहे. ही घटना शुक्रवारी पहाटे ३:३० च्या सुमारास घडली. मृतांचा आकडा वाढू शकतो.

हैदराबादहून बेंगळुरूला जाणारी बस राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर एका दुचाकीला धडकली. दुचाकी बसखाली गेली आणि इंधन टाकीला धडकली, ज्यामुळे बसने लगेचच पेट घेतला. या अपघातात शिवशंकर नावाच्या चालकाचाही मृत्यू झाला.

बसमध्ये अंदाजे ४० प्रवासी होते. त्यापैकी बरेच जण भाजले होते. १९ जणांनी उडी मारून जीव वाचवला. आपत्कालीन गेट तोडून जीव वाचवणारे लोक गंभीर भाजले होते आणि त्यांना कुर्नूल सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

बसला आग लागल्याचा व्हिडिओ महामार्गावर मागून येणाऱ्या लोकांनी रेकॉर्ड केला. अपघात झाला तेव्हा कुर्नूलच्या या भागात पाऊस पडत होता. अपघात झाला तेव्हा कुर्नूलच्या या भागात पाऊस पडत होता. अग्निशमन पथक आग विझविण्यासाठी धडपडताना दिसून आले. अग्निशमन पथक आग विझविण्यासाठी धडपडताना दिसून आले. आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली आणि १९ जणांनी जीव वाचवण्यासाठी बाहेर उड्या मारल्या.

आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली आणि १९ जणांनी जीव वाचवण्यासाठी बाहेर उड्या मारल्या. बसच्या पुढच्या भागात बाईक अडकली आणि तिच्या इंधन टाकीला धडकल्यानंतर तिला आग लागली. बसच्या पुढच्या भागात बाईक अडकली आणि तिच्या इंधन टाकीला धडकल्यानंतर तिला आग लागली. अपघातानंतर बसमधील आग विझविण्यात आली. चालक आणि क्लिनर बेपत्ता आहेत. अपघातानंतर बसमधील आग विझविण्यात आली. चालक आणि क्लिनर बेपत्ता आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मिळालेल्या माहितीनुसार, बसमधील बहुतेक प्रवासी हैदराबादचे होते. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचा फक्त सांगाडा शिल्लक आहे, त्याची ओळख पटवणे कठीण आहे. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचा फक्त सांगाडा शिल्लक आहे, त्याची ओळख पटवणे कठीण आहे. आगीनंतर, बसचा फक्त सांगाडा उरला आहे.



### जिल्हाधिकाऱ्यांनी हेल्पलाइन क्रमांक जारी केले

अपघातानंतर कुरनूलचे जिल्हाधिकारी डॉ. ए. सिरी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी सांगितले की हेल्पलाइन क्रमांक जारी करण्यात आले आहेत. यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय नियंत्रण कक्ष ०८५१८-२७७३०५, सरकारी रुग्णालय कुरनूल ९१२११०१०५९, स्पॉट नियंत्रण कक्ष ९१२११०१०६१, कुरनूल पोलिस नियंत्रण कक्ष ९१२११०१०७५ आणि जीजीएच मदत कक्ष ९४९४६०९८१४ आणि ९०५२९५१०१० यांचा समावेश आहे.

पंतप्रधान मोदींनी ट्विटरवर लिहिलेः "कर्नूल अपघात दुःखद आहे. मृतांच्या कुटुंबीयांबद्दल माझ्या संवेदना." पंतप्रधान कार्यालयाने मृतांच्या कुटुंबीयांना २ लाख रुपये आणि जखमींना ५०,००० रुपयांची मदत जाहीर केली आहे.

## पाकला पाणी देण्यास अफगाणिस्तानचा नकार

■ वृत्तसंस्था, काबुल, दि. २४ :
अफगाणिस्तानच्या माहिती मंत्रालयाच्या माहितीनुसार, तालिबानशासित अफगाणिस्तान आता पाकिस्तानला जाणारे पाणी अडविण्यासाठी त्यांच्या नद्यांवर धरणे बांधण्याची योजना आखत आहे. कुनार नदीवर शक्य तितक्या लवकर धरण बांधण्याचे आदेश तालिबानचे सर्वोच्च नेते मवलावी हिबतुल्ला अखुंदजादा यांनी दिले आहेत. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात काही दिवसांपासून सशस्त्र संघर्ष पेटलेला असताना आणि शेकडो लोकांचा बळी गेल्यानंतर आता अफगाणिस्तानकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.

भारताने मे महिन्यात घेतलेल्या निर्णयाचा पुनरावृत्ती अफगाणिस्तानने केल्याचे यातून दिसून येत आहे. २२ एप्रिल रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर भारताने तीन नद्यांमधून पाकिस्तानात वाहून जाणारे पाणी थांबवले. पाकिस्तानात पाणी सोडण्यासंबंधी असलेल्या सिंधू जल कराराला भारताने स्थगिती दिली.

अफगाणिस्तानचे पाणी आणि ऊर्जा मंत्रालयाने सांगितले की, तालिबानचे सर्वोच्च नेते मवलावी हिबतुल्ला अखुंदजादा यांनी कुनार नदीवर शक्य तितक्या लवकर धरणे बांधण्याचे काम सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी देशाअंतर्गत कंपन्यांशी करार करा, असेही ते म्हटले आहेत.

इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तात लंडनस्थित असलेल्या अफगाणि पत्रकार सामी युसुफझाई यांची प्रतिक्रिया दिली आहे. भारतानंतर आता पाकिस्तानात जाणारे पाणी रोखण्याची वेळ अफगाणिस्तानवर आलेली दिसते. युसुफझाई यांच्या म्हणण्यानुसार, सर्वोच्च नेत्यांनी अफगाणी कंपन्यांशी करार करण्याचे निर्देश दिले आहेत. ४८० किमी लांबीची कुनार नदी ईशान्य अफगाणिस्तानातील हिंदूकुश पर्वतरांगांमध्ये आणि पाकिस्तान सीमेजवळील ब्रोघिल खिंडीजवळ उगम पावते. ही नदी कुनार आणि नांगरहार प्रांतांमधून दक्षिणेकडे वाहते. त्यानंतर ती पाकिस्तानमधील खैबर पख्तूनख्वामध्ये प्रवेश करते. जिथे ती जलालाबाद शहराजवळ काबूल नदीला जाऊन मिळते. कुनार नदीला पाकिस्तानमध्ये चित्राल नदी म्हणतात.

## फडणवीस-जरांगे एका व्यासपीठावर येणार?

■ महासागर प्रतिनिधी
सोलापूर, दि. २४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे पहिल्यांदाच एका व्यासपीठावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाजप आमदार समाधान अवताडे यांनी सोलापूरच्या मंगळवेढा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अनावरण सोहळ्याचे या दोन्ही नेत्यांना निमंत्रण दिले आहे. या दोघांनी हे निमंत्रण स्वीकारले व हे दोन्ही नेते एकत्र आले, तर महाराष्ट्राच्या राजकारणाला एक नवे वळण मिळण्याची शक्यता आहे.



मंगळवेढा हे ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे. इथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मृतीशी निगडित अनेक ठिकाणे आहेत. त्यातच आता येथे शिवरायांचा एक भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचे २६ ऑक्टोबर रोजी अनावरण होणार आहे. पंढरपूर - मंगळवेढ्याचे भाजप आमदार समाधान अवताडे यांनी या सोहळ्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना निमंत्रण दिले आहे. या दोन्ही नेत्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या निमित्ताने एकमेकांना पाण्यात पाहणारे हे दोन्ही नेते प्रथमच एका व्यासपीठावर येण्याची शक्यता वाढली आहे. या प्रकरणी राज्याच्या राजकीय वतुर्ळात खमंग चर्चा रंगली आहे. यासंबंधीच्या वृत्तानुसार, आमदार समाधान अवताडे यांनी या प्रकरणी सांगितले की, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंगळवेढा येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण होणार आहे.

## हातावर सुसाईड नोट लिहित महिला डॉक्टरची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात घडलेल्या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण वैद्यकीय क्षेत्र हादरले आहे. येथील कार्यरत महिला डॉक्टर डॉ. संपदा मुंडे यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना समजताच रुग्णालयातील सहकारी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांमध्ये शोककळा पसरली. आपल्या कर्तव्यनिष्ठ आणि रुग्णसेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या या डॉक्टरने असे टोकाचे पाऊल उचलल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. स्थानिकांपासून वैद्यकीय संघटनांपर्यंत सर्व स्तरांवर या घटनेबाबत दुःख आणि संताप व्यक्त केला जात आहे.

प्राथमिक माहितीनुसार, डॉ. मुंडे या गेल्या काही महिन्यांपासून पोलिस आणि आरोग्य विभागातील प्रशासकीय वादात अडकल्या होत्या. एका वैद्यकीय तपासणी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर चौकशी सुरू होती. या कालावधीत त्यांना प्रचंड मानसिक ताणाचा सामना करावा लागत होता, अशी माहिती सहकारी कर्मचाऱ्यांनी दिली आहे. संबंधित चौकशी दरम्यान त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर करून आपल्यावर अन्याय होत असल्याची तक्रार केली होती.

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात आत्महत्या केलेल्या महिला डॉक्टर प्रकरणाने नवे वळण घेतले आहे. मृत डॉक्टर डॉ. संपदा मुंडे यांच्या हातावर थेट सुसाईड नोट आढळली असून, त्यात त्यांनी दोन पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत.

या सुसाईड नोटमध्ये डॉक्टर मुंडे यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की, पोलिस निरीक्षक गोपाल बदने यांनी माझ्यावर चार वेळा बलात्कार केला, तर पोलीस प्रशांत बनकर यांनी मला सतत मानसिक त्रास दिला. या धक्कादायक खुलाशामुळे सातारा जिल्ह्यात आणि संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

आत्महत्येपूर्वी डॉक्टर काही काळ पोलिस आणि आरोग्य विभागातील वादात अडकल्या होत्या. एका वैद्यकीय तपासणीसंदर्भात पोलिसांशी झालेल्या वादानंतर त्यांच्या विरोधात अंतर्गत चौकशी सुरू होती. त्याच दरम्यान त्यांनी हा टोकाचा निर्णय घेतल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

## बिहारमध्ये मोदी-नितीश सरकार

■ वृत्तसंस्था, सिवान, दि. २४ :
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी सिवान येथून निवडणूक प्रचाराला सुरुवात केली. एका जाहीर सभेला संबोधित करताना अमित शहा म्हणाले, "मी राजेंद्र प्रसाद यांच्या भूमीला वारंवार वंदन करतो. मी पक्षाच्या बिहार नेत्यांना सांगितले होते की उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माझा पहिला निवडणूक प्रचार सिवानमध्येच असावा."

अमित शहा यांनी १८ मिनिटांच्या भाषणात लालू प्रसाद यादव आणि जंगल राज यांचा १० वेळा उल्लेख केला, तर सिवानचे माजी खासदार शहाबुद्दीन यांचा आठ वेळा उल्लेख केला. लालू-राबडी



राजवट आणि जंगलराजचा उल्लेख करताना केंद्रीय गृहमंत्री म्हणाले, सिवानने शहाबुद्दीनचा दहशतवाद सहन केला आहे, परंतु सिवानचे लोक झुकले नाही. शहाबुद्दीनने एका व्यावसायिकावर ॲसिड फेकले. लालू यादव यांनी या शहाबुद्दीनच्या मुलाला रघुनाथपूरमधून तिकीट दिले आहे.

## विराट-रोहित ऑस्ट्रेलियात शेवटची मॅच खेळणार

■ वृत्तसंस्था, सिडनी, दि. २४ :
पर्थमध्ये ८ चेंडूत शून्य धावा... सिडनीमध्ये ४ चेंडूत शून्य धावा... एकूण १२ चेंडूत शून्य धावा. ही कामगिरी विराट कोहलीची आहे. टीम इंडियाच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात त्याला अजून खाते उघडता आलेले नाही. तिसरा आणि शेवटचा एकदिवसीय सामना शनिवारी सिडनी येथे होणार आहे.

विराट कोहली आणि त्याचा दीर्घकाळचा सहकारी रोहित शर्मा यांचा ऑस्ट्रेलियन भूमीवरील हा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना असू शकतो. या सामन्यात दोन्ही स्टार खेळाडूंना प्रभावी कामगिरी करावी लागेल. भारतीय संघाने आधीच मालिका गमावली आहे आणि आता पहिल्यांदाच क्लीन स्वीपचा धोका त्यांच्यासमोर आहे. क दिवस आधी, २३ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियाने दुसरा सामना दोन विकेट्सने जिंकला. संघाने पहिला सामना सात विकेट्सने जिंकला होता.













# संघ कार्यालयावर वंचित बहुजन आघाडीचा मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी
छत्रपती संभाजीनगर, दि. २४ :

शैक्षणिक संकुलात राष्ट्रीय स्वंयसेवक संघाने सुरु केलेल्या नोंदणीच्या विरोधात आक्षेप घेतल्याने दोन युवकांवर दाखल झालेल्या गुन्हाच्या विरोधात निषेध नोंदवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने शहरातील क्रांती चौकापासून मोर्चा काढण्यात आला. आरएसएस कार्यालयावरचा हा पहिला मोर्चा असल्याचा दावा वंचितचे नेते सुजात आंबेडकर यांनी केला.

शैक्षणीक संकुलात वैचारीक संघटनांची नोंदणी कशासाठी जर असे असेल तर संघाच्या नोंदणी प्रमाणपत्र दाखवा असे आव्हान त्यांनी दिले. या वेळी क्रांती चौकापासून आरएसएस मुदार्बादच्या घोषणांनी परिसर दणाणला. शहरातील देवगिरी महाविद्यालयासह विविध ठिकाणी सदस्य नोंदणी अभियान सुरू करण्यात आले होते. यातील एका महाविद्यालयासमोरील सदस्यता नोंदणीला विरोध करण्यात आला. राहुल मकासरे आणि विजय वाहुळ कार्यकर्त्यांवर पोलिसांनी दिलेल्या तक्रारीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे आंबेडकरी विचारांच्या कार्यकर्त्यांमध्ये रोष होता. समाजमाध्यमांमधून तो व्यक्त केला जात असताना वंचित बहुजन आघाडीच्या वतीने रा. स्व. संघ कार्यालयावर शुक्रवारी मोर्चा काढण्याचे ठरविण्यात आले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे कोणत्याही स्वरुपाची तक्रार नसताना पोलिसांनी स्वतः तक्रार दाखल केली.



दुपारी बाराच्या दरम्यान सुजात आंबेडकर, सिद्धार्थ मोकळे, अमित भुईगळ आदी नेत्यांच्या उपस्थितीमध्ये क्रांती चौकातून मोर्चास सुरूवात करण्यात आली. या वेळी रा. स्व. संघ संविधान विरोधी असून त्यांना तिरंगा आणि संविधान भेट देण्यासाठी मोर्चा काढण्यात आल्याचे सुजात आंबेडकर यांनी सांगितले. हा मोर्चा काही अंतरावर गेल्यानंतर जिल्हा बँकेच्या अलिकडे पोलिसांनी अडवला. या वेळी रा. स्व. संघाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

मोर्चात सहभागी नेत्यांचे एक शिष्टमंडळ तिरंगा ध्वज, संविधानाची प्रत घेऊन रा. स्व. संघ कार्यालयापर्यंत गेले. शहरातील प्रल्हाद भवन या रा. स्व. संघाच्या इमारतीचे बांधकाम सुरू असल्याने येथे कोणीही नसते असे शिष्टमंडळास पोलिसांनी सांगितल्याची माहिती सुजात आंबेडकर यांनी मोर्चाच्या समारोप प्रसंगी दिली. रा. स्व. संघाच्या विरोधात केवळ आंबेडकरी जनताच उभा राहू शकते, असा संदेश देशभरात नव्हे तर रा.स्व. संघाचे काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कार्यकर्त्यांपर्यंत पोहचल्याचे सांगत मोर्चा यशस्वी झाल्याचा दावा या वेळी करण्यात आला.

मनुवाद पसरायला नको म्हणून त्यांना नोंदणी करायला आम्ही नकार दिला होता. आमच्या कार्यकर्त्यांनी त्यांचा फलक काढायला भाग पाडले होते. नोंदणी करणाऱ्या या संघटनेची नोंदणी कुठे आहे, असा सवाल या वेळी करण्यात आला. तिरंगा आणि संविधानाची प्रत स्वीकारायला आरएसएस चा कोणी प्रतिनिधी पुढे आला नाही म्हणजे त्यांनी त्याचा अपमानच केला असल्याचा आरोप या वेळी सुजात आंबेडकर यांनी केला. या मोचार्मुळे शहरातील विविध चौकात शुक्रवारी मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला.

---

फलटण महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी

## महिला आयोगाकडून गंभीर दखल



**सातारा :** जिल्ह्यातील फलटण शहरातील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका महिला डॉक्टरने एका हॉटेलमध्ये आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली आहे. या मृत महिला डॉक्टरने आत्महत्येपूर्वी स्वतःच्या तळहातावर सुसाइड नोट लिहिली होती. यामध्ये तिने दोन जणांवर मानसिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. यापैकी एक जण पोलीस अधिकारी असल्याचा आरोप आहे. दरम्यान, या प्रकरणाची राज्य महिला आयोगाने गंभीर दखल घेतली असून कारवाईचे आदेश दिले आहेत. यावर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी प्रतिक्रिया देत ही घटना अत्यंत संतापजनक असल्याचं म्हटलं आहे. त्या टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होत्या. आरोपीच्या शोधासाठी पोलिसांचं पथक रवाना झालेलं आहे. बीड आणि पुणे या भागात आरोपींचा तपास सुरू आहे. खरं तर अशी घटना घडणं हे अत्यंत संतापजनक आहे. राज्य महिला आयोग म्हणून आम्ही याची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात दोन्हीही आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. तसेच मी स्वतः या प्रकरणात सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांच्या संपर्कात आहे.

---

रक्षकच भक्षक बनले तर न्याय कसा मिळणार?

## आत्महत्या प्रकरणात काँग्रेसचा सवाल



**मुंबई :** फलटण उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टर संपदा मुंडे यांच्या आत्महत्येमुळे अवघ्या महाराष्ट्रातून संतापजनक प्रतिक्रिया येत आहेत. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणातील आरोपी पोलिस निरीक्षक गोपाल बदने याने मृत महिलेवर एकदा नव्हे तर तब्बल 4 वेळा बलात्कार केल्याचा दावा केला आहे. पोलिसांचे काम हे रक्षण करण्याचे असते. पण तेच महिला डॉक्टरचे शोषण करत असतील, तर न्याय कसा मिळणार? असा प्रश्न त्यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे. साताऱ्यातील फलटम उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या एका वरिष्ठ महिला डॉक्टरने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे राज्याच्या वैद्यकीय क्षेत्रात एकच खळबळ माजली आहे. सदर डॉक्टरने आपल्या हातावर एक सुसाईड नोट लिहिली आहे. त्यात तिने आपल्यावरील अन्यायाचा पाढा वाचला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणी सरकारवर टीकेची झोड उठवत पोलिसांच्याही कर्तव्यपरायणतेवर सवाल उपस्थित केला आहे. ते म्हणाले, फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयातील महिला डॉक्टरने फाशी घेत आत्महत्या केली. आत्महत्या करताना त्यांनी हातावर सुसाईड नोट लिहिली आहे. त्यात उल्लेख आहे, पोलीस निरीक्षक गोपाल बदने याने त्यांच्यावर चार वेळा बलात्कार केला, तर पोलीस प्रशांत बनकर याने त्यांना सतत मानसिक त्रास दिला.

---

## आम्ही महायुतीत राहूनच निवडणूक लढवणार : उदय सामंत



**मुंबई :** आम्ही महायुतीत राहूनच निवडणूक लढवणार आहोत. पण, स्थानिक पातळीवर कोणी जास्त खुमी दाखवली तर धनुष्यबाण कसा चालतो ते दाखवू, असा इशारा शिवसेना शिंदे गटाचे नेते व मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिला आहे. एकनाथ शिंदे यांनी सुद्धा महायुतीत राहूनच निवडणूक लढवण्याची भूमिका घेतली आहे. तिन्ही पक्षाच्या नेत्यांना त्रास होणार नाही. महायुतीत जागावाटपाचा जो फॉम्युर्ला असेल त्यानुसारच निर्णय होतील. तसेच महायुतीत मिठाचा खडा टाकणाऱ्यांना मात्र बाजूला केले पाहिजे, अशी भूमिका सामंत यांनी मांडली आहे. सध्या शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांनी भाजप नेते व केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर जैन बोर्डिंग प्रकरणी गंभीर आरोप केले आहेत. यावर बोलताना उदय सामंत म्हणाले, रवींद्र धंगेकर यांच्या सोबत मी स्वतः बोलणार आहे. त्यांना भेटायला जाणार आहे. त्यांनी संयम बाळगला पाहिजे, तसा बाकीच्या नेत्यांनीही बाळगला पाहिजे. धंगेकर यांच्यावर कारवाई करायची असेल, तर मग नवी मुंबईत काय घडले हेही पहावे लागेल. कोणी सुरुवात केली हे सर्वांना माहीत आहे, असे म्हणत सामंत यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्यावर निशाणा साधला आहे.

---

## सांगलीचे इस्लामपूर आता ईश्वरपूर

केंद्र सरकारची नामांतराला मान्यता




**सांगली :** जिल्ह्यातील इस्लामपूर शहराच्या नामांतराचा ऐतिहासिक निर्णय केंद्र सरकारकडून मंजूर झाला आहे. केंद्र सरकारच्या भारतीय सर्वेक्षण विभागाकडून यासंबंधी अधिकृत मान्यतेचे पत्र राज्य सरकारला प्राप्त झाले असून, आता या शहराचे अधिकृत नाव ईश्वरपूर असे राहणार आहे. या निर्णयानंतर अनेक दशकांपासून सुरू असलेली स्थानिकांची मागणी पूर्ण झाली आहे. राज्य सरकारने मागील पावसाळी अधिवेशनात या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर तो केंद्र सरकारकडे पाठवला होता. केंद्राची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर आता ईश्वरपूर हे नाव सर्व शासकीय, निमशासकीय आणि औद्योगिक नोंदणीत अधिकृतपणे लागू होणार आहे. इस्लामपूर शहराचे नाव बदलून ईश्वरपूर करण्याची मागणी मागील चार ते पाच दशकांपासून सुरू होती. 1970 च्या दशकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे इस्लामपूर प्रमुख पंत सबनीस यांनी सर्वप्रथम या नामांतराची मागणी केली होती.

त्यांच्या मते, शहराचे नाव भारतीय सांस्कृतिक आणि धार्मिक वारशाशी सुसंगत असावे. पुढे 1986 मध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी इस्लामपूरमधील यल्लमा चौकातील जाहीर सभेत हे इस्लामपूर नव्हे, तर ईश्वरपूर आहे, असा ठाम उच्चार करत या विषयाला राजकीय दिशा दिली होती. त्यानंतर अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिक, स्वयंसेवी संस्था आणि राजकीय नेते या मागणीचा पाठपुरावा करत होते. अखेर या दशकांपासून प्रलंबित असलेल्या मागणीला केंद्र सरकारची शिक्कामोर्तब मान्यता मिळाली आहे.

---

## मालाडमधील फोर डायमेंशन इमारतीत आग

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २४ :

मुंबईत आग लागण्याचे सत्र सुरूच असून मालाड (पश्चिम) येथील लिंक रोडवरील फोर डायमेंशन या इमारतीत गुरुवारी मध्यरात्री आग लागली. इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील सुमारे १५ हजार चौरस फूट क्षेत्रफळाच्या कॉल सेंटर युनिटमध्ये लागली होती. गुरुवारी मध्यरात्री १२.४५ च्या सुमारास ही आग लागली. क्षणातच आगीचा भडका उडाल्यामुळे मुंबई अग्निशमन दलाने दोन क्रमांकाची वर्दी दिली. पाचव्या मजल्यावर सुमारे १५ हजार चौरस फूट क्षेत्रफळात कॉल सेंटर युनिटमधील विद्युत वाहिन्या, विद्युत यंत्रणा, लाकडी फर्निचर, पार्टिशन, फॉल्स सीलिंग, संगणक व सर्व्हर रूममधील साहित्य जळून खाक झाले. आगीमुळे इमारतीत धुराचे साम्राज्य पसरले होते. त्यामुळे अग्निशमन दलाच्या जवानांना आगीवर नियंत्रण मिळविण्यात अडथळे येत होते. अखेर काचेची तावदाने फोडण्यात आली. त्यामुळे इमारतीमधील धूर बाहेर पडला. अग्निशमन दलाच्या सात अग्निशामक गाड्या, रुग्णवाहिका, पाण्याचे ट्रँकर, तसेच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते. या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग नियंत्रणात आणून पूर्णतः विझवण्यात आली असून, शुक्रवारी सकाळी ९ वाजता ही आग विझल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

---

## बविआ कार्यकर्त्याची आक्षेपार्ह चित्रफित प्रसारीत भाजपच्या दोन कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी
वसई, दि. २४ :

बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्याची आक्षेपार्ह चित्रफित तयार करून ती समाजमाध्यमावर प्रसारीत करण्यात आली आहे. याप्रकरणी भाजपाच्या दोन कार्यकर्त्याविरोधात नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हे दोन्ही कार्यकर्ते तडीपार असून ते सर्रास शहरात वावरत असल्याचे सांगण्यात येत आहे. तक्रारदार किरण बनसोडे (३५) हे नालासोपारा मध्ये राहतात. ते बहुजन विकास आघाडीचे सक्रीय कार्यकर्ते आहेत. शहरातील विविध प्रश्न, गैरप्रकार याविरोधात ते सातततत्याने आवाज उठवत असतात. २६ सप्टेंबर रोजी फेसबुक या समाजमाध्यमावर त्यांची एक आक्षेपार्ह चित्रफित प्रसारीत करण्यात आली होती. बनसोड हे रस्त्याच्या कडेला लघुशंका करत असताना चोरून ही चित्रफित काढण्यात आली होती. त्यावर असभ्य भाषेत बदनामीकारक मजकूर लिहून ती पोस्ट व्हायरल करण्यात आली होती. भाजपचे कार्यकर्ते ऋतिक पोळ आणि प्रितेश पवार यांनी ही चित्रफित काढून ती समाजमाध्यमावर पोस्ट केली होती.

या दोघांच्या विरोधात मी तक्रारी दिल्यामुळे त्यांची तडीपारी झाली होती. त्यामुळे बदला घेण्यासाठी त्यांनी ही चित्रफित तयार केली आणि माझी समाजात बदनामी केली असे बनसोडे यांनी या तक्रारीत म्हटले आहे.या तक्रारीवरून नालासोपारा पोलीस ठाण्यात ऋतिक पोळ आणि प्रितेश पवार यांच्याविरोधात माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६७ (अ) तसेच धकावल्याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५१ (२) अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

विशेष म्हणजे चित्रफित काढणारे प्रितेश पवार आणि ऋतिक पोळ हे दोन्ही भाजपचे कार्यकर्ते असून त्यांच्याविरोधात विविध गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्यांना जिल्हाबंदी करण्यात आली आहे.तरी देखील ते सर्रास शहरामध्ये वावर असल्याचे बनसोडे यांनी सांगितले आहे.

---

## बैलाच्या हल्ल्यात १ जण ठार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

रायगड जिल्ह्यातील कर्जतमध्ये बैलाच्या हल्ल्यात 1 जण ठार, तर 5 जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. ऐन दिवाळीच्या दिवसांत ही घटना घडली असून, यामुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, कर्जतच्या दहिवली परिसरात बैलाने नागरिकांवर हल्ला केला. त्यात 1 जण ठार, तर 5 जण जखमी झाले. जखमींपैकी एकाची प्रकृती चिंताजनक आहे. स्थानिकांच्या मते, हा बैल पिसाळलेला आहे. तो गत दिवसांपासून शहरातील दहिवाली परिसर व श्रीराम पूल भागात फिरत होता. त्याने बुधवारी रात्रीपासून धुडगूस घालण्यास सुरुवात केली. तो रस्त्याने ये-जा करणाऱ्या वाटसरूंवर हल्ला करत होता. त्याने काही वाहनांचेही नुकसान केले. त्याने बुधवारी रात्री सर्वप्रथम आदित्य कनोजिया नामक एका 9 वर्षीय मुलावर हल्ला केला. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळीही त्याने काही जणांवर हल्ला केला.

गुरूवारी सकाळी या भागातील मंजुळा चव्हाण (65) व योगिता थोरवे (44) या महिला मॉर्निंग वॉकसाठी घराबाहेर पडल्या होत्या. या बैलाने या दोघींवर हल्ला चढवला. त्यात मंजुळा चव्हाण गंभीर जखमी झाल्या. त्यामुळे त्यांना उपचारासाठी पनवेल येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. योगिता थोरवे यांच्यावर कर्जत येथीलच रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

---

राहुल गांधींप्रमाणे आदित्य ठाकरेही फोडणार बोगस मतदानाचा बॉम्ब

## निर्धार मेळाव्यात मल्टिमीडियाच्या माध्यमातून सादरीकरण करणार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

मुंबईत सोमवारी होणाऱ्या ठाकरेंच्या शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यात युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे एक मोठा राजकीय बॉम्ब फोडणार आहेत. या बाबत मिळालेल्या माहितीप्रमाणे, आदित्य ठाकरे या मेळाव्यात मुंबईतील मतदार याद्यांमधील प्रचंड घोटाळ्याचा पदार्फाश करणार आहेत.

दिल्लीमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जसा बोगस मतदारांचा विषय पुराव्यांसह मांडला होता, तसाच प्रकार आदित्य ठाकरे मुंबईत सादर करणार आहेत.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मागील काही महिन्यांत मुंबईतील मतदार याद्यांची स्वतंत्र तपासणी केली असून, त्यात असंख्य विसंगती, डुप्लिकेट आणि बनावट मतदार नोंदी आढळल्याचे सांगितले जात आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईत होणाऱ्या महापालिका निवडणुकीआधी हा विषय राजकीयदृष्ट्या मोठा वाद निर्माण करू शकतो. वरळी डोम येथे सोमवारी सायंकाळी पाच वाजता हा निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, शिवसेनेचे सर्व मुंबईतील पदाधिकारी, विभागप्रमुख, उपविभागप्रमुख आणि शाखाप्रमुख उपस्थित राहणार आहेत. आदित्य ठाकरे या कार्यक्रमात मल्टिमीडियाच्या माध्यमातून सादरीकरण करणार असून, मुंबईतील मतदार याद्यांमधील त्रुटी आणि बोगस नोंदींचे पुरावे ते दाखवतील, अशी माहिती समोर आली आहे. या सादरीकरणात शिवसेनेच्या तज्ञ टीमने मतदार नोंदणीतील पॅटर्न, अचानक वाढलेले मतदान क्रमांक आणि बाहेरील राज्यातील मतदारांची नावे यांचा तपशील तयार केला आहे. शिवसेनेने गेल्या काही महिन्यांपासून मतदार यादीतील घोटाळ्याचा मुद्दा सातत्याने पुढे आणला आहे. आदित्य ठाकरे यांनी यापूर्वीही अनेकदा निवडणूक आयोगाकडे तक्रारी दाखल करून मतदार नोंदणीची पारदर्शकता मागितली होती.

---

## प्रेयसीवर हल्ला करून तरुणाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :

एका तरुणाने २४ वर्षीय प्रेयसीवर चाकूने हल्ला करून नंतर आत्महत्या केल्याची घटना काळाचौकी परिसरात शुक्रवारी सकाळी ११ च्या सुमारास घडली. सोनू बराई असे या घटनेत मरण पावलेल्या तरुणाचे नाव आहे. काळाचौकी येथील दत्ताराम लाड मार्गावरून हे दोघे चालत येत होते. त्यांच्यात शाब्दिक वाद झाला. अचानकपणे त्या तरुणाने आपल्या खिशातील चाकू काढला आणि तरुणीवर हल्ला केला. ती तरुणी जीव वाचवण्यासाठी जवळच्या आस्था नर्सिंग होममध्ये गेली.

---

नगरसेविका होण्याच्या महत्त्वकांक्षेने

## पत्नीने पतीचा केला खून

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २४ :



पिंपरी चिंचवड शहरात उशिरा रात्री घडलेल्या एका घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. शरद पवारांच्या पक्षाच्या समर्थक आणि स्थानिक सामाजिक कार्यकत्यार्चा पत्नीनेच गळा आवळून खून केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. नकुल भोईर असं मृत व्यक्तीचं नाव असून, तो शहरात विविध सामाजिक उपक्रम आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या राजकीय कार्यक्रमात सक्रिय होता.

या प्रकरणातील पत्नी चैताली भोईर या आगामी महापालिका निवडणुकीसाठी नगरसेवक पदाच्या इच्छुक असल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, दोघांमध्ये काही दिवसांपासून सतत वाद सुरू होते. शुक्रवारी मध्यरात्री झालेल्या वादातूनच चैतालीने ओढणीने गळा दाबून नकुलचा खून केल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. चिंचवड पोलिसांनी आरोपी पत्नीला अटक करून चौकशी सुरू केली आहे. ही घटना चिंचवड परिसरातील नकुल आणि चैताली यांच्या राहत्या घरी मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास घडली. रात्री उशिरा नकुल आणि चैताली यांच्यात पुन्हा एकदा वाद सुरू झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर रागाच्या भरात चैतालीने घरातील ओढणीने पतीचा गळा दाबला, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. काही वेळानंतर नकुल बेशुद्ध पडला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. दोन आणि पाच वर्षांची लहान मुलं शेजारच्या खोलीत झोपलेली असताना घराच्या हॉलमध्ये हा सगळा प्रकार घडला. घटनेची माहिती मिळताच चिंचवड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो शवविच्छेदनासाठी पाठवला असून, आरोपी पत्नीला अटक करण्यात आली आहे.

या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, स्थानिक नागरिक धक्कादायक अवस्थेत आहेत. नकुल भोईर हे पिंपरी चिंचवड परिसरातील परिचित सामाजिक कार्यकर्ते होते. विविध समाजकारण, शिक्षण आणि नागरिकांच्या समस्यांसाठी ते नेहमी पुढाकार घेत असत. चिंचवडगाव परिसरात त्यांचा मोठा जनसंपर्क होता आणि अनेकदा ते शासकीय यंत्रणांकडे नागरिकांच्या मागण्यांसाठी पाठपुरावा करत असत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाशी त्यांचे राजकीय संबंध होते आणि अलीकडच्या काळात ते स्थानिक निवडणुकीत सक्रिय झाले होते.

---

# कलाकारांच्या सृजनशीलतेचा उत्सव

(२५ ऑक्टोबर : आंतरराष्ट्रीय कलाकार दिन)

आंतरराष्ट्रीय कलाकार दिन- इंटरनॅशनल आर्टिस्ट डे दरवर्षी 25 ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो, ज्याचा उद्देश जगभरातील कलाकारांच्या सर्जनशीलतेचा आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करणे हा आहे. या दिवसाच्या माध्यमातून चित्रकला, शिल्पकला, नृत्य, संगीत, साहित्य आणि इतर कलाप्रकारांतील कलाकारांचे कौतुक करण्यात येते, कारण त्यांच्या कलाकृतींमुळे समाजात सौंदर्य, संस्कृती आणि विचारशक्तीला चालना मिळते. कलाकार त्यांच्या अनोख्या दृष्टिकोनातून समाजातील विविध समस्यांवर प्रकाश टाकतात आणि लोकांना प्रेरित करतात. कला ही व्यक्त होण्याचे शक्तिशाली साधन आहे, जी सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच बदल घडवून आणण्यासाठी देखील वापरली जाते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा ज्ञानवर्धक संकलित लेख आपल्या सेवेशी सादर.... संपादक.

या दिवशी, कलाविश्वातील विविध उपक्रम राबवले जातात, जसे की कला प्रदर्शनं, कार्यशाळा आणि चर्चासत्रं, ज्यामध्ये नवोदित आणि अनुभवी कलाकारांना त्यांची कला सादर करण्याची संधी मिळते. आंतरराष्ट्रीय कलाकार दिन हा कलाकारांच्या सृजनशीलतेचा उत्सव असून, त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी आणि समाजातील कलात्मकतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी साजरा केला जातो.

कलाकार म्हणजे कला निर्माण करणे, कलेचा सराव करणे किंवा कला प्रदर्शित करणे याशी संबंधित क्रियाकलापात गुंतलेली व्यक्ती होय. सर्वात सामान्य वापर- रोजच्या भाषणात आणि शैक्षणिक प्रवचनात फक्त व्हिज्युअल आर्ट्समधील अभ्यासकाला संदर्भित करतो. सेंट जस्टिनियन, वेल्स, सन २०२१मध्ये कामावर असलेला चित्रकार

तथापि, हा शब्द मनोरंजन व्यवसायात देखील वापरला जातो, विशेषतः व्यावसायिक संदर्भात, संगीतकार आणि इतर कलाकारांसाठी जरी कमी वेळा अभिनेत्यांसाठी योजला जातो. आर्टिस्ट, फ्रेंच हा या संदर्भात इंग्रजीमध्ये वापरला जाणारा एक प्रकार आहे, परंतु, हा वापर दुर्मिळ झाला आहे. लेखकांचे वर्णन करण्यासाठी "कलाकार" या शब्दाचा वापर वैध आहे, परंतु सामान्य आहे आणि मुख्यतः समीक्षकांच्या पुनरावलोकनांसारख्या संदर्भांपुरता मर्यादित आहे; त्याऐवजी "लेखक" वापरला जातो.

आंतरराष्ट्रीय कलाकार दिन २५ ऑक्टोबर रोजी कलाकारांचा आणि त्यांनी केलेल्या सर्व योगदानांचा सन्मान केला जातो. दि.२५ ऑक्टोबर १८८१ रोजी जन्मलेल्या पाब्लो पिकासो या सर्वात प्रसिद्ध कलाकारांपैकी एक म्हणून हा दिवस साजरा केला जातो. कलाकार आपली कला निर्माण करण्यासाठी खूप मेहनत घेतात. ते आपल्या सभोवतालच्या जगाला सौंदर्य जोडतात. बहुतेक कलाकार अनेक वेगवेगळ्या माध्यमांसह काम करतात. इतकेच नाही तर कलाकार या शब्दात चित्रकार, छायाचित्रकार, शिल्पकार, संगीतकार, नर्तक, लेखक, अभिनेते, डिजिटल कलाकार आणि बरेच काही समाविष्ट आहे. जेव्हा एखादी सर्जनशील भेट घेऊन जन्माला येते, तेव्हा ती सर्जनशीलता विविध क्षेत्रांमध्ये वाहते. उदाहरणार्थ, पिकासो एक चित्रकार, शिल्पकार, सिरेमिकिस्ट, कवी आणि नाटककार होता. लिखित कामांच्या खूप आधी कला आली. काळाच्या सुरुवातीपासून कलेने कल्पनांचा संवाद साधला आहे आणि महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी ठेवल्या आहेत. कला भूतकाळाशी जोडणी देते. कलाकार आपला इतिहास अमिटपणे नोंदवतात. ते सत्यही शोधून काढतात. त्यांच्या कार्याद्वारे ते कथा सांगतात आणि परंपरा पार पाडतात. कलाकारांकडे त्यांच्या सभोवतालच्या लोकांशी जोडण्याचा एक अनोखा मार्ग असतो. वाईट बातम्यांनी भरलेल्या जगात, आशेचा संदेश देणे ही त्यांची सर्वात महत्त्वाची भूमिका आहे.

जागतिक कला दिवस - १५ एप्रिल रोजी साजरा करतात, तर आंतरराष्ट्रीय कलाकार दिन कसा साजरा करायचा- जगभरातील अनेक संस्था आंतरराष्ट्रीय कलाकार दिनाचे समर्थन करतात. यापैकी काहींमध्ये मेट्रोपॉलिटन म्युझियम ऑफ आर्ट, आर्ट गॅलरी ऑफ ओंटारियो, नॅशनल गॅलरी ऑफ स्कॉटलंड, जेरुसलेम फाउंडेशन आणि इतर अनेकांचा समावेश आहे. स्थानिक कलाकारांना साजरे करण्यासाठी, व्हाईट रॉक, ब्रिटिश कोलंबिया आणि सॅन मिगुएल, स्पेन सारखी अनेक शहरे ललित कला महोत्सव आयोजित करतात. जगभरातील गॅलरी ओपन हाऊस होस्ट करतात आणि लोकांना त्यांची कला विनामूल्य किंवा सवलतीच्या दरात पाहण्यासाठी आमंत्रित करतात. आंतरराष्ट्रीय कलाकार दिनात आपण सहभागी होऊ ईच्छिता तर- आपण कोणत्या प्रकारचे कलाकार आहात हे ठरवण्यासाठी ऑनलाइन क्विझ करावे. उपाशी असलेल्या कलाकाराला जेवणासाठी बाहेर काढावे. आपल्या घरासाठी नवीन पेंटिंग खरेदी करावी,आर्ट गॅलरीला भेट द्यावी. सिम्फनीमध्ये सहभागी व्हा. कला वर्गासाठी साइन अप करा. ते पुस्तक लिहायला सुरुवात करा. वाद्य कसे वाजवायचे ते शिका. प्रतिभा शो स्पर्धा प्रविष्ट करा. आपल्या स्थानिक कलाकारांना सपोर्ट करा. सर्जनशीलतेची देणगी असलेल्या मुलाला प्रोत्साहित करा. एक स्क्रॅपबुक एकत्र ठेवा. सर्जनशीलता आपल्या आजूबाजूला आहे, याचा अर्थ असा आहे की आपण प्रत्येक दिवस साजरा करू शकतो. फक्त आपल्या फोनने फोटो काढणेही एक कला आहे. आपण तो साजरा करण्यासाठी काहीही करत असतो.

आंतरराष्ट्रीय कलाकार दिवसाचा इतिहासः कॅनेडियन कलाकार, ख्रिस मॅक्क्लूर यांनी सन २००४मध्ये आंतरराष्ट्रीय कलाकार दिन सुरू केला. तेव्हापासून २५ ऑक्टोबर हा दिवस कलाकारांनी समाजासाठी दिलेल्या सर्व योगदानांचा उत्सव साजरा करण्यासाठी समर्पित आहे.

!! जागतिक कलाकार दिनाच्या समस्त कलावंत आणि कलाप्रेमींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

- संकलन व सुलेखन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली

# भरधाव जाणाऱ्या प्रवासी ऑटोची बैलगाडीला धडक

## एक प्रवासी बालक जागीच ठार तर चार प्रवासी जखमी

■ महासागर प्रतिनिधी
**खामगाव, दि. २४ :**
भरधाव जाणाऱ्या प्रवासी ऑटोरिक्षाने बैलगाडीला धडक दिली. या अपघातात ऑटो मधील एक प्रवासी बालक जागीच ठार झाला असून ऑटो चालकासह चार प्रवासी जखमी झाले आहेत. ही घटना २० ऑक्टोबर रोजी रात्री साडे सात वाजेच्या सुमारास भोरसी मंदिराजवळ घडली.



तालुक्यातील माटरगाव बुद्रुक येथील शेख परवेज उर्फ पप्पू शेख मेहबूब हा आपल्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या एम.एच.२७ बी डब्ल्यू २८१८ या क्रमांकाच्या ऑटोमधून शेख रहिम शेख इस्माईल (वय १६) शेख फैजान शेख अकिल व शेख खय्युम शेख नबी सर्व रा माटरगाव बुद्रुक यांना २० ऑक्टोबर रोजी खामगाव वरून माटरगाव कडे घेऊन जात असताना मार्गावरील भोरसी मंदिराजवळ रात्री साडे सात वाजेच्या सुमारास ऑटोने बैलगाडीला धडक दिली. या अपघातात शेख रहिम शेख इस्माईल नामक १६ वर्षीय बालक जागीच ठार झाला आहे. तर ऑटो मधील शेख फैजान शेख अखिल, शेख कय्युम शेख नबी व ऑटो चालक शेख परवेज शेख मेहबूब हे तिघे व बैलगाडी चालक नरवाडे हे जखमी झाले आहेत. अपघातानंतर ऑटो चालक व दोन प्रवासी अशा तिघांना उपचारार्थ येथील शासकीय रुग्णालयात भरती करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांच्यावर प्रथमोपचार करून त्यांना पुढील उपचारांसाठी अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले आहे. या अपघातात शेख फैय्युम याचे दोन्ही पाय निकामी झाले आहेत. अपघात प्रकरणी जलंब पोलिसांनी शेख हारुण शेख मेहबूब रा. माटरगाव बुद्रुक यांनी २२ ऑक्टोबर रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी ऑटो चालक शेख परवेज उर्फ पप्पू शेख मेहबूब याच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. पुढील तपास ठाणेदार अमोल सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका नन्हेखॉ तडवी हे करत आहेत.

# पाच लाख शेतकऱ्यांना ३४३ कोटींचा मदत निधी वितरित

## सर्वाधिक मदत, चिखली, मेहकर, लोणार, नांदुऱ्यातील शेतकऱ्यांना

■ महासागर प्रतिनिधी
**बुलडाणा, दि. २४ :**
बुलडाणा जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने आतापर्यंत सुमारे ३४३ कोटी रुपयांची मदत निधी वितरित करण्यात आली आहे. सर्वात अधिक निधी जिल्हयातील चिखली, मेहकर, लोणार व नांदुरा तालुक्यात वितरित करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली आहे. जिल्ह्यात जून ते सप्टेंबर शेवट पर्यत जिल्ह्यात पुरस्थिती निर्माण झाली होती. जिल्ह्यात या दरम्यान चार ते पाच वेळा अतिवृष्टी नोंदवण्यात आली. यामुळे जिल्ह्यात लाखो शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या, अनेकांची पिके नष्ट झाली. सोयाबीन, कापूस, तूर आदी



पिकांचे मोठे नुकसान झाले होते. तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्याने दिवाळी पूर्वीच शेजाऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी प्रशासनाने पंचनामे करून अहवाल राज्य शासनाकडे सादर केला होता.

तर दुसरीकडे महसूल विभागाच्या वतीने महसूल विभाग व जिल्हा प्रशासनाच्या वतीने वारंवार शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून घेण्याचे आवाहन केले होते, त्या पश्चात देखील अनेकांनी सदर काम पुर्ण केले नाही. त्यामुळे शासनाच्या वतीने उपलब्ध करुन देण्यात आलेल्या या निधीचा लाभ अनेकांना मिळाला नाही. अद्याप ही सीएससी केंद्रावर सदर प्रक्रिया राबवली जात आहे. त्यामुळे आता तरी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होण्यास अडचण येत आहे. याला कारण म्हणजे सामूहिक शेती आहे. सदर मदत आपल्या खात्यात जमा होण्यासाठी शेतकऱ्यांनी संमतीपत्र लवकरात लवकर जमा करावे,आधार, सातबारा, शेतकरी क्रमांक व बँकेला जोडावे.

**डॉ. किरण पाटील, जिल्हाधिकारी बुलडाणा**

# दिवाळीतील सलग सुट्यांमुळे भाविकांची शेगावात मांदियाळी

## श्री संस्थानचे चोख नियोजन ; शहराला आले यात्रेचे स्वरूप

■ महासागर प्रतिनिधी
**शेगाव, दि. २४ :** दिवाळीच्या सलग सुट्यांमुळे शेगावात भाविक-भक्तांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. हजारो भाविक श्रींच्या समाधी मंदिराचे मनोभावे दर्शन घेतले. दिवाळीनंतर आलेल्या सलग सुट्यांमुळे शेगावात मुंबई, पुणे, नागपूर या व इतर राज्यभरातील विविध ठिकाणचे भाविक श्रींच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून येत आहेत. भाविकांच्या गर्दीमुळे मंदिर परिसरासह शहराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. जवळपास दिवाळीच्या सुट्या संपेपर्यंत २



नोव्हेंबर पर्यंत लाखो भाविक भक्तांची शेगाव येथे मांदियाळी राहणार आहे. दिवाळीच्या सलग सुट्या लागून आल्याने भाविकांची मोठी गर्दी शहरात झालेली पहायला मिळत आहे. भक्तांच्या गर्दीने शहरातील मंदिराकडे जाणारे सर्व रस्ते फुलून गेले आहेत.

श्रींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांना श्रींच्या दर्शनासाठी किमान दोन ते तीन तास दर्शन बारी मध्ये राहून श्रींच्या समाधीचे गण गण गणात बोते मंत्राचा नाम जप करत मनोभावे दर्शन घेत आहेत. तर श्रीमुख दर्शनासाठी अर्धा तास वेळ लागत आहे. शाळा, कॉलेजला दिवाळी सुटी असल्याने या दिवसात तब्बल लाखाच्या वर भाविक श्रींचे दर्शन घेणार असल्याचा अनुमान लावला जात आहे. दरम्यान,गुरूवारी देशभरातून हजारो भाविक श्रींच्या दर्शनासाठी शहरात दाखल झाले होते. सुट्यांमध्ये शेगावला येणाऱ्या भक्तांचा ओघ लक्षात घेता श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने भाविकांच्या दर्शन, महाप्रसाद तसेच निवासाची चोख व्यवस्था केली आहे. शेगाव या तीर्थक्षेत्र स्थळी भक्तांना आपल्या माहेरी आल्याचा अनुभव पदोपदी येताना दिसून येत आहे. भाविकासाठी श्रींची समाधी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण व्यवस्था केली आहे. तसेच भक्तांच्या सोईसाठी संस्थानच्या भक्त निवासात नियमानुसार व्यवस्था सुरू आहे. संपूर्ण मंदिर परिसरात स्वच्छता ही भक्तांना श्रींच्या प्रति आपली आस्था प्रसन्न मनाने एकरूप करणारी आहे. भक्तांना कोणताही त्रास होवू नये यासाठी श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर आहेत. श्रींच्या भाविक भक्तांसाठी सर्वतोपरी सोयीसुविधा पुरवल्या जात आहेत. श्री संस्थानकच्या पार्किंगमध्ये मोठ्या प्रमाणावर भाविकांची वाहने शिस्तबद्ध उभी असल्याचे दिसून येत आहे .तर मंदिर परिसरात व खासगी पार्किंग सुद्धा हाऊस फुल झाले आहे.

व्यावसायिकांना दिलासा दिवाळीच्या सुट्टयांमध्ये शहरात भाविकांची गर्दी वाढली आहे. त्यामुळे फुलांचे हार विक्री करणारे, पेढा विक्री करणारे त्याचप्रमाणे इतर लहानसहान वस्तू कुंकू, गुलाल, अष्ट गंध विक्रेत्यांची चांगली विक्री झाली आहे. त्यामुळे व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मागील दोन दिवसांपासून राज्यभरातील विविध भागातून भाविक संतनगरीत हजेरी लावत आहेत, भाविक भक्तांच्या प्रचंड गर्दीमुळे मंदिर परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. भक्तांच्या गर्दीमुळे शेगावातील हॉटेल, रेस्टॉरंट, गेस्ट हाऊस विविध वस्तू व साहित्य विक्रीच्या व्यावसायिकांसह ऑटोरिक्षा चालक, खाद्यविक्रेते, किरकोळ व्यावसायिक अशा सर्वांनाच सध्या सुगीचे दिवस आले आहेत.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांची दिवाळी बांधावर साजरी

■ महासागर प्रतिनिधी
**मारेगाव, दि. २४ :**
ओल्या दुष्काळाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या जखमा अजूनही ताज्या आहेत. एकीकडे शेती पाण्याने वाहून गेली तर दुसरीकडे सरकारकडून मदतीचा एक शब्दही ऐकू आलेला नाही. या अन्यायाविरोधात आता शेतकरी शांत बसले नाहीत. काँग्रेसच्या सूचनेनुसार मारेगाव तालुका काँग्रेस कमिटीच्या नेतृत्वात शेतकऱ्यांनी बांधावरच भाकरी तोडत सरकारविरोधात निषेध व्यक्त केला. पिकांचा घास गेला, परंतु, आशेचा किरण दिसत नसल्याने शेतकऱ्यांची दिवाळी यंदा 'काळी दिवाळी' ठरली. राज्यात ओल्या दुष्काळामुळे हजारो शेतकऱ्यांचे संसार उघडे पडले असतानाही मदतीचे आश्वासन केवळ कागदावरच राहिले आहे.

त्यामुळे आंदोलन करून शेतकऱ्यांनी आमचं दुःख आता



दुर्लक्षित राहणार नाही, असा स्पष्ट संदेश सरकारला दिला. काँग्रेसतर्फे शेतकऱ्यांच्या ऐक्यासाठी आणि त्यांच्या परिस्थितीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी बांधावर जाऊन भाकरी व चटणी खाण्याचे आयोजन करण्यात आले. शेतकऱ्यांना साथ देण्यासाठी कार्यकर्त्यांनी पारंपरिक पद्धतीने बेसन, भाकरी व ठेचा घेऊन शेताच्या बांधावरच सामूहिक भोजन केले. या प्रतिकात्मक कृतीतून सरकारच्या निष्क्रियतेचा निषेध नोंदवण्यात आला. या उपक्रमाचे नेतृत्व मारोती गौरकार यांनी केले. सरकारने तत्काळ शेतकऱ्यांना नुकसानभरपाई जाहीर करून आर्थिक मदत द्यावी, अन्यथा काँग्रेस रस्त्यावर उतरून लढा उभारेल, असा इशाराही गौरकार यांनी दिला. या आंदोलनात बाजार समितीचे सभापती गौरीशंकर खुराना, अंकुश माफूर, आकाश बदकीसह शेतकरी भूषण कोल्हे, विठ्ठल रस्से, हनुमान जुमनाके यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व शेतकरी बांधव यावेळी सहभागी झाले होते.

# दिवसा दोन चोरट्यांकडून सोन्याची पोत लंपास

**मलकापूर:** शहरातील बुलडाणा रोड परिसरात दिवसाढवळ्या झालेल्या सोनसाखळी चोरीच्या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. शहरातील पद्मालय अपार्टमेंट येथे राहणाऱ्या सोनल आशिष राठी (वय ४२) ही शिक्षिका आपल्या मुलीसह खरेदीसाठी दुचाकीने जात असताना मागून



येणाऱ्या दोन चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावून लंपास केली आहे. ही घटना २० ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास घडली. राठी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या आपल्या पंधरा वर्षीय मुलीसह स्कूटीवरून जीएस मॉल व डागा मार्ट येथे खरेदीसाठी गेल्या होत्या. त्यानंतर घरी परत येत असताना सिध्दी विनायक हॉस्पिटलसमोर दोन चोरटे दुचाकीने आले. त्यापैकी एकाने निळ्या रंगाचा तर दुसऱ्याने काळ्या रंगाचा शर्ट घातला होता. त्या दोघांनी शिक्षिकेच्या स्कूटीला आडवे उभे राहून गळ्यातील ७५ हजार रुपये किमतीची अडीच तोळे सोन्याची पोत जबरीने हिसकावून घेत घटनास्थळावरून पसार झाले.

# महाकाली मंदिरात 'बरकत' घेण्यासाठी प्रचंड गर्दी





■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. २४ :**
हिंदू स्मशानभूमीच्या लगत असलेल्या महाकाली मंदिरात लक्ष्मीपूजनाच्या रात्री 'बरकत' वाटप करण्यात आले. यावेळी हजारोंच्या संख्येत पुरुष व महिला भाविकांनी गर्दी केली होती. घरचे लक्ष्मीपूजन आटोपले की, भाविक महाकाली मंदिरात बरकत घेण्यासाठी येतात. येथे महाकालीच्या मूर्तीपुढे त्यांना लाह्या, बत्तासे व काही नोट व शिक्के दिले जातात. हा एकूणच प्रसाद म्हणजे बरकत होय. कोणाला १ तर कोणाला २ रुपयांचा शिक्का मिळतो. कोणाला ५, १० रु, २० रु., ५० रु. तर कोणाला १०० रु.पर्यंत बरकत दिली जाते. भाविक वर्षभर बरकत म्हणून मिळालेले शिक्के, नोट आपल्याकडे जपून ठेवतात. असे केल्याने घरात लक्ष्मी नांदते, अशी भाविकांची धारणा आहे. दरवर्षी महाकाली मंदिरात बरकत वाटली जाते, याबाबत माहिती जिल्हाभर पसरल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून भाविक बरकत घेण्यासाठी येत असतात. त्यामुळे येथे प्रचंड गर्दी होते. लगतच स्मशान असले तरी त्याची कोणतीही तमा भाविक बाळगत नाहीत. दोन स्मशानांच्या मधून महाकाली मंदिरापर्यंत रस्ता जातो. या स्मशानाच्या भिंतीला लागूनच भाविक उभे राहतात. बरकत घेण्यासाठी अगदी पहाटेपर्यंत भाविक रांगेत उभे होते. महाकाली मंदिरात लक्ष्मीपूजन, दिवाळीची महाआरती आणि प्रसाद वितरण झाल्यानंतर लगेच रात्री ९ वाजतापासून बरकत वाटप केले जाते. शक्ती महाराजांच्या मार्गदर्शनात हा बरकत वाटपाचा विधी होत असते. ते स्वत:च्या हाताने भाविकांना बरकत वाटप करतात. विशेष बाब म्हणजे बरकत मिळवी, यासाठी भाविक डोळ्यात झोप असली किंवा कितीही थकले असले तरी रांगेत उभे राहतात.

अनेक वर्षांची परंपरा महाकाली मंदिरात बरकत वाटण्याची परंपरा अनेक वर्षांपासून अव्याहतपणे सुरू आहे. श्री श्री श्री १००८ महाकाली शक्तिपीठाचे पीठाधीश्वर शक्ती महाराज यांच्याद्वारे ही बरकत वाटप करण्याची परंपरा सुरू करण्यात आली. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी बरकत मिळाली की, आपले वर्ष हे सुख-समृद्धीचे जाते, अशी भाविकांची धारणा असल्यामुळे बरकत घेण्यासाठी प्रचंड गर्दी होत असते. बरकत म्हणजे महाकालीचा आशीर्वाद असे भाविक मानतात.

# विदर्भाची आळंदी म्हणून ओळख:संत गजानन महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेले मुंडगाव

■ महासागर प्रतिनिधी
**मुंडगाव, दि. २४ :**
(ता. अकोट) मुंडगाव हे श्री संत गजानन महाराजांच्या पावन पदस्पर्शाने पवित्र झालेले एक ऐतिहासिक व धार्मिक स्थळ आहे. मुंडगाव हे ठिकाण संत गजानन महाराजांनी काही काळ वास्तव्य केले होते. त्यांच्या चरणस्पर्शाने हे गाव पावन झाले असून येथे 'श्री संत गजानन महाराज पादुका संस्थान, मुंडगाव' स्थापन करण्यात आले आहे. या पादुका संस्थानला महाराष्ट्र शासन मान्य तीर्थक्षेत्र 'ब' दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे येथे राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. येथील यात्रा महोत्सव संत गजानन महाराजांनी सुरू केला आहे. पादुका संस्थानमुळे गावाला विदर्भाची आळंदी म्हणून ओळखल्या जात आहे. १०० वर्षे जुने झालेले पादुका मंदिराच्या ठिकाणी विश्वस्तांनी २००० मध्ये दुमजली नवीन वास्तू बांधून पादुका संस्थानाचा जीर्णोद्धार केला. या मंदिरात श्रींच्या मूळ पादुका, विश्रांतीचा पलंग, धुनीची जागा, रथाचे अवशेष व शेगाव संस्थानचे श्री हरी कुकाजी पाटील यांनी भेट



दिलेल्या सुंदर कोरीव दगडी पादुका आहेत. मुंडगाव हे अकोट तालुक्यातील सर्वात मोठी सधन ग्रामपंचायत आहे. मुंडगाव येथील विविध संतांच्या वास्तव्यामुळे गावाला संतनगरी संबोधल्या जाते. मंदिरात यात्रा महोत्सवाबरोबर रामनवमी, गोकुळाष्टमी, ऋषीपंचमी, प्रकटदिनी हे उत्सव साजरे होतात. संस्थानमध्ये येणाऱ्या पायदळ वारी, दिंडी, पालखीचा येथे सन्मान व व्यवस्था केल्या जाते. बाहेरगावातील भक्तांना दर गुरुवारी महाप्रसाद दिल्या जातो. या संस्थानात महाराजांच्या पादुका प्रतिष्ठापित असून, दरवर्षी मोठ्या श्रद्धेने यात्रोत्सव, भजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह आणि महाप्रसादाचे आयोजन केले जाते. राज्यभरातील हजारो भक्त दर्शनासाठी येत असतात. रस्ता मार्ग अकोला चोहोट्टाबाजार -देवरीफाटा मार्गे मुंडगाव. गावात बस सेवा आहे. जिल्हाधिकारी कार्यालयापासून अंतर ३० ज्ञा कनेक्टिव्हिटी वैशिष्टे ि मुंडगाव येथे ७० स्वयमं सहायता समूह ७०१ महिला समाविष्ट शिलाई मशीन, किराणा दुकान, पीठ गिरणी, बांगडी व्यवसाय, पापड व्यवसाय, मूर्ती बनवणे, झाडू बनवणे, बांबू बसून वस्तू बनवणे अशा शंभरावर महिला 'उमेद'मुळे व्यवसाय करत आहेत. गावात एकच सार्वजनिक पोळा भरतो.

म्हणून गावाचे नाव पडले मुंडगाव भगवान श्रीकृष्णाने रुक्मीणीच्या भावाचा पराभव करत येथे त्याचे मुंडण केले होते म्हणून या गावाला 'मुंडगाव' असे नाव पडल्याची आख्यायिका आहे. दासगणूरचित विजय ग्रंथानुसार १९०६ ला पुंडलिक भोकरेंच्या स्वप्नात श्रींची सांगितल्याप्रमाणे महाराजांनी स्वतःच्या चरण पादुका झ्यामसिंगासोबत प्रत्यक्षात पुंडलिकास देण्यासाठी शेगाव येथून पाठवल्या होत्या. त्या पादुकांचे भक्तांना दर्शन करता यावे, म्हणून या पादुकांची स्थापना झ्यामसिंगच्या वाड्यात मुंडगावला केल्या गेली.

येथे गजानन महाराजांना आमंत्रित करून त्यांची रथात बसवून मिरवणूक काढण्यात आली. तसेच यात्रा व महाप्रसादाचे आयोजन केले होते, असा येथील यात्रा महोत्सव व पादुका संस्थानचा इतिहास सांगितल्या जातो.

# नव्या युगासाठी गो अमृतमचा वापर हा अतिशय गरजेचा : उद्धव नेरकर



**खामगाव:** भारतीय गोवंश हा देशातील अनेक समस्या सोडवू शकतो, असे स्पष्ट झाल्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी गो आधारित शेतीचा मार्ग पत्करला आहे आणि त्याला चांगला प्रतिसादही मिळत आहे, गो अमृतमचा वापर ही नव्या युगासाठी काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य उद्धव नेरकर यांनी केले. वसुबारस निमित्त श्री संत गजानन महाराज गोशाळा प्रतिष्ठान ट्रस्ट द्वारा १७ ऑक्टोबर आयोजित वसुबारस व गो आधारित कृषी प्रशिक्षण प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी विचार मंचावर बाळू पाटील, डॉ. सुधीर देशमुख, डॉ. दीपक राऊत, भानुदास बनारे व गजानन घरत उपस्थित होते. पुढे बोलताना नेरकर म्हणाले की, हरित क्रांतीच्या नावाखाली देशात अवैज्ञानिक पद्धतीने रासायनिक खतांचा वापर वाढला. त्याने उत्पादनात वाढ झाली. परंतु रासायनिक खतांमुळे सारे पीक विषाचा अंश असणारे निर्माण झाले. त्याचा परिणाम म्हणजे सध्या या देशात दहा लाख कोटींचे रासायनिक खतही वापरले जात आहे आणि त्यातून येणाऱ्या आजारपणासाठी दहा लाख कोटी रुपयांची औषधेही वापरली जात आहेत. रासायनिक खताने शेती खराब आणि कमी उत्पन्न देणारी झाली आहे, त्याच प्रमाणे महाराष्ट्रातील आणि देशातीलही सारे जण ते विषारी अंश असल्याने कोणत्या ना कोणत्या आजाराने ग्रस्त झाले आहेत. त्यासाठी ते अन्नच सेंद्रिय पद्धतीने करण्याची मोहीम राबवल्या गेली पाहिजे असे उपस्थितांना त्यांनी आवाहन सुद्धा केले. गाय आणि तिचे वासरू यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पूजा केली जाते. कुटुंबातील सदस्यांच्या आणि मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी तसेच सुख समृद्धीसाठी विवाहित स्त्रिया या दिवशी गोवत्सासह गायीची पूजा करतात आणि उपवास करतात असे वसू बारस विषयी भानुदास बनारे यांनी कार्यक्रमात सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक दुर्गेश घरत यांनी तर आभार प्रदर्शन माधव माने यांनी केले.

# ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी तहसीलमध्ये साजरी

■ महासागर प्रतिनिधी
**अंजनगाव सुर , दि. २४ :**
अंजनगाव तालुका ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी त्यांची दिवाळी तहसील कार्यालयात साजरी केली. त्यांनी दिवाळीच्या दिवशी तहसीलमध्येच ठिय्या दिला. तत्काळ ज्वारी खरेदी सुरू करण्याची या शेतकऱ्यांची मागणी आहे. यावेळी शेतकरी संघटनेच्या वतीने स्वतंत्र भारत पक्षाचे तालुकाध्यक्ष गजानन दुधाट, बाबू साबळे, सुभाष उंबरकर व बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते. या वर्षी खरीप हंगामात काही शेतकऱ्यांनी ज्वारीचे पीक घेतले आहे. या वर्षीच्या अतिवृष्टीमुळे व संततधार पावसामुळे जवळपास सर्वच पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अशातच काही शेतकऱ्यांकडे ज्वारी पीक घरी पडून आहे. अंजनगाव तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीने नाफेड मार्फत ज्वारीची खरेदी सुरू केली होती. शेतकऱ्यांची ज्वारी खरेदी




करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आदेशाप्रमाणे शेतकऱ्यांनी पोर्टलवर सुमारे ५५० शेतकऱ्यांनी नोंद केलेली आहे. परंतु, त्यापैकी २०० लोकांची ज्वारी खरेदी करण्यात आली. त्यानंतर ही योजना बंद करण्यात आली. त्यामुळे उरलेल्या ३५० शेतकऱ्यांची ज्वारी अजूनही घरात पडून आहे. दिवाळीसारखा सण आहे इतर पिके हातातली गेली असल्यामुळे कोणत्याच प्रकारची आवक आज शेतकऱ्याच्या घरात नाही.

त्यामुळे निदान दिवाळीचा सण साजरा करण्यासाठी म्हणून घरी पडून असलेली ज्वारी तरी निदान विकून दिवाळी साजरी करूया या आशेवर असलेल्या शेतकरी मात्र या सरकारच्या अडेलतट्टू धोरणामुळे आज अगदी मेटाकुटीस आलेला आहे. शेतकरी संघटनेने या शेतकऱ्यांना सोबत घेऊन वारंवार निवेदने देऊनही सरकार ऐकत नाही.म्हणून त्यांनी आपली ज्वारी ट्रॅक्टरमध्ये भरून ते तहसील कार्यालयात आणून उभे केलेले आहेत.

या वर्षीची दिवाळी आपण तहसील कार्यालयातच उपाशी पोटी साजरी करू, असा निर्धार शेतकऱ्यांनी केला. शेतकऱ्याच्या दुःखाचा अंत हे सरकार आणखी किती वेळ बघणार आहे. शेतकरी संघटना या विषयावर जागृत असून वारंवार उठाव करते आहे. पण, सरकार प्रतिसाद देत नाही. आता जर ज्वारी खरेदी करण्यात आली नाही तर उग्र आंदोलन आणि त्याचबरोबर बेमुदत उपोषणाचा इशारा अंजनगाव तालुका शेतकरी संघटना व ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी दिला आहे.

### एसटी आगारात दर बुधवारी 'प्रवासी राजा दिन' व 'कामगार पालक दिन' साजरा होणार

**बुलढाणा :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने दि. १५ जुलै २०२४ रोजी पासून प्रवाशांच्या समस्या, तक्रारी व सूचनांचे स्थानिक पातळीवर जलद गतीने निराकरण होण्याच्या उद्देशाने प्रत्येक आगारात दर प्रत्येक बुधवारी ' प्रवासी राजा दिन' व ' कामगार पालक दिन' आयोजित करण्यात येणार आहे. यापूर्वी हा दिन महिन्याच्या दर सोमवारी व शुक्रवारी आयोजित होत होता आता त्यात बदल करण्यात आला आहे. या उपक्रमात विभाग नियंत्रक आगारात जाऊन प्रवाशांच्या व रा.प. कर्मचाऱ्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना ऐकून त्या तातडीने सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणार आहेत. त्यामुळे प्रवाशांचे समाधान होऊन प्रवासी सेवेचा दर्जा व गुणवत्ता वाढण्यास मदत होईल, असे एस.टी. महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी व्यक्त केले आहे. राज्य परिवहन, बुलढाणा विभागातील आगारामध्ये हा दिन साजरा करण्याकरीता महामंडळाने वेळापत्रक जाहीर केले आहे. या वेळापत्रकानुसार दि. २९ ऑक्टोबर रोजी बुलढाणा आगार, १२ नोव्हेंबर रोजी चिखली आगार, १९ नोव्हेंबर रोजी खामगाव, २६ नोव्हेंबर रोजी मेहकर, ३ डिसेंबर रोजी मलकापूर, १० डिसेंबर रोजी जळगाव आणि १७ डिसेंबर रोजी शेगाव येथे प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. या वेळापत्रकानुसार रा.प. आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार असून या वेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये आपल्या समस्या तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडु शकतात.


### डिजिटल व्यवहारांसाठी डाक विभागाची विशेष मोहीम

**बुलढाणा :** भारतीय डाक विभागाच्या वतीने डाक जीवन विमा आणि ग्रामीण डाक जीवन विमा योजनेंतर्गत डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी दोन महिन्यांची विशेष मोहीम बुलढाणा विभागात १६ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व सक्रिय पॉलिसीधारकांचे मोबाईल क्रमांक आणि ई-मेलआयडी अद्ययावत करून व्यवहार प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि कार्यक्षम करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. पॉलिसीधारकांनी आपले अद्ययावत संपर्क तपशील दिल्यास त्यांना प्रीमियम भरपाई, पॉलिसी स्थिती, दावा प्रक्रिया यासंदर्भातील सर्व माहिती तत्काळ एसएमएस व ई-मेलद्वारे मिळणार आहे. ग्राहकांनी आपल्या जवळच्या मुख्य किंवा उप टपाल कार्यालयात भेट देऊन आवश्यक केवायसी दस्तऐवजांसह माहिती सादर करावी. ग्रामीण भागातील शाखा टपाल कार्यालयांमध्येही ही प्रक्रिया सुलभतेने पूर्ण होणार आहे. डिजिटलायझेशनच्या या उपक्रमामुळे डाक जीवन विमा सेवांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिक वापर होऊन ग्राहक सेवा दर्जा उंचावेल.





# मातृभक्त अर्चना शंभरकर!



योगेश वसंत त्रिवेदी
मुंबई.
९८९२९३५३२१.

केम छो गुरुजी ? मजामां नें ? शुं चाले छे ? अस्खलित गुजराती भाषेतून प्रश्नांची सरबत्ती. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय येथील वरिष्ठ सहाय्यक संचालक सौ. अर्चना गाडेकर शंभरकर या सुमारे बारा वर्षे अहमदाबाद येथे कार्यरत होत्या.

आताचे पंतप्रधान नरेंद्र दामोदरदास मोदी हे त्या वेळी गुजरातचे मुख्यमंत्री होते. हा त्यांचा संपूर्ण कार्यकाळ सौ. अर्चना शंभरकर यांनी जवळून पाहिला असल्याने आणि शिकण्याची जिज्ञासा असल्याने त्या अस्खलित गुजराती बोलत होत्या. मुंबई येथे बदली होऊन अर्चना मंत्रालयात आल्या आणि आमचा परिचय झाला.

माझ्याबरोबर त्या बहुतेक वेळा गुजरातीमधूनच बोलायच्या. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मध्ये विभागीय संपर्क अधिकारी म्हणून कार्यरत असतांना निवडणुकीच्या काळात त्या मुंबई शहर, मुंबई उपनगर जिल्ह्याची जबाबदारी सांभाळतांना या जिल्ह्यातील मतदारसंघ निहाय तपशीलवार माहिती, जुने संदर्भ देण्याचे काम अर्चना चोखपणे बजावत.

काम करणाऱ्या माणसाची बदली करणे हे तर नित्याचेच. त्यामुळे अर्चना शंभरकर या मंत्रालयातून कधी ठाण्याला, कधी पालघरला जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असायच्या. त्यांनी लिखाणाची आवड जोपासतांना गुजरात मधील आपल्या एका तपाच्या कारकीर्दीवर 'सोलमेट' नावाची कादंबरी लिहिली. या कादंबरीचे अभिवाचन त्यांनी गोरेगाव येथे आयोजित केले होते आणि मला आवर्जून आमंत्रित केले होते.

गोरेगावच्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मोहिनी अणावकर आणि मी या सोलमेटच्या अभिवाचन कार्यक्रमास उपस्थित राहिलो. इतकेच नव्हे तर या कार्यक्रमाची बातमी गुजरात समाचार मध्ये तीन स्तंभात दिली. अर्चना जाम खुश झाल्या. गुरुजी आटला मोटा समाचार? हुं तो एकदम हरखाई गई, अशा शब्दांत त्यांनी कौतुक केले.

मी कोरोना च्या काळात पासष्टायन आणि गुरुजी ही दोन पुस्तके लिहिली. ही दोन्ही पुस्तके त्यांना सस्नेह भेट दिली. दोन्ही पुस्तकांची त्यांनी वाखाणणी केली. गुरुजी हे पुस्तक संदभार्साठी असल्याने त्याचा त्यांनी चांगलाच उपयोग करुन घेतला. इतकेच नव्हे तर त्यांनी एल एल एम ची परीक्षा दिली.

मला आवर्जून त्यांनी सांगितले की गुरुजी तुमच्या गुरुजी पुस्तकावरुन मी ही परीक्षा दिली आहे.

त्यांनी यावर एक लेख लिहिला अर्थात मी अजून पूर्ण करुन पाठविते असे त्यांनी सांगितले. परंतु कर्करोगाशी झुंज देत त्यांनी इहलोकीची यात्रा संपवली. हा लेख अपूर्णच राहिला. सुस्वभावी, मितभाषी आणि बोलतांना जणू त्यांच्या मुखातून साखर पाझरते की काय इतका गोडवा त्यांच्या स्वभावात होता. त्या खऱ्याखुऱ्या मातृभक्त होत्या. विमल गाडेकर या चंद्रपूर येथील कवयित्री अर्चना शंभरकर यांच्या मातोश्री. तीनेक वर्षांपूर्वी विमलताई यांनी अखेरचा श्वास घेतला. त्याचे दुःख अर्चनाताईंना मोठ्या प्रमाणावर झाले.

अर्थात प्रत्येक व्यक्तीला आई ही प्यारीच असते. परंतु मातृभक्ती ही अर्चना शंभरकर यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिली. एकाच वेळी चंद्रपूर आणि मुंबई येथे 'विमल दिवस' हा विमल ताईंच्या स्मृतिदिनानिमित्त खास कार्यक्रम अर्चना शंभरकर या करीत असत.

वडील भगवान गाडेकर, पती प्रकाश, भाऊ डॉ. हेमंत गाडेकर, अभिनेता असलेला भाऊ जयंत गाडेकर आणि डॉ. मोना या भगिनी असा परिवार विमल दिवस साजरा करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत असतांना पाहिले आहे. कुटुंब रंगलंय काव्यात चे सर्वेसर्वा प्रा. विसुभाऊ बापट, ख्यातनाम गीतकार, लेखक दिग्दर्शक अभिनेते स्वानंद किरकिरे, ज्येष्ठ संपादक शाम पेठकर, अभिनेते भारत गणेशपुरे, रंगकर्मी शिक्षणतज्ज्ञ डॉ. मंगेश बनसोड अशा नामवंतांची मांदियाळी अर्चना शंभरकर यांनी आपल्या या कार्यक्रमात उभी केलेली पहावयास मिळाली.

विमलताई गाडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अनेकांना त्यांनी सन्मानित केले. समाजाप्रती आपली बांधिलकी दाखवून देण्याचे महत्कार्य अर्चना शंभरकर यांनी केले आहे. बरं, कोणतेही विधायक कार्य करतांना त्यांनी त्याचा कधी बोभाटा केला नाही. कोकण विभागीय उपसंचालक पदाचा कार्यभार असतांनाच त्यांना कर्करोगाने घेरले.

पत्रकारांच्या रत्नागिरी अभ्यास दौऱ्यात अर्चना शंभरकर यांनी उपसंचालक या नात्याने आपली जबाबदारी चोख बजावली. तिथेच कर्करोगाने त्रस्त असूनही चेहऱ्यावर हसू सातत्याने ठेवीत त्यांनी त्रास सहन केला. मंदार पारकर यांनी मला सांगितले की गुरुजी अर्चनाताई कर्करोगाशी सामना करीत आहेत.

इच्छा असूनही प्रकृतीच्या कारणास्तव अपोलो पर्यंत जाऊ शकलो नाही आणि अर्चना शंभरकर यांच्या देहावसानाचे वृत्त कानी पडले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मधील प्रत्येक जण या बातमीने हळहळला.

पत्रकारांबरोबर सलोख्याचे संबंध असल्याने मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघानेही आदरांजली वाहण्याचे कर्तव्य बजावले. त्या दिवसापासून मन सुन्न झाले. नव्या मुंबई पर्यंत पोहोचू शकलो नाही परंतु अर्चना शंभरकर यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यासाठी ही शब्द सुमने अर्पण करणे हे माझे कर्तव्यच ठरते.

अर्चना शंभरकर यांच्या अकाली निधनाने एक हसतमुख, मितभाषी आणि आपल्या परिवारातील एक सदस्य, चांगला साहित्यिक आपण गमावला आहे. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आणि आमचे परमादरणीय मित्र विजय वैद्य यांच्या देहावसानानंतर अर्चना शंभरकर यांनी थोडक्यात आपल्या भावना माझ्याकडे व्यक्त केल्या, त्या याठिकाणी देणे औचित्यपूर्ण ठरेल.


"विजय वैद्य या अफाट व्यक्तीमत्वाला आपण प्रत्यक्ष भेटून संवाद साधू शकलो याचा मला अभिमान वाटला. त्यांच्या सारखे प्रेरणादायी व्यक्ती या आपल्या आसपास आहेत त्यामुळेच आपला जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन सकारात्मक होत जातो.

वैद्य यांचे जाणे हे मनाला चटका लावून गेले. तुमचा लेख वाचून त्यांनी प्रेरित केलेल्या कामांची अधिक माहिती मिळाली . एवढी उर्जा असणारे व्यक्ती सतत त्यांच्या कामातून, त्यांनी तयार केलेल्या कार्यकर्त्यांमधून आपल्याला भेटत राहतील. स्मृतीशेष. विजय वैद्य यांना विनम्र अभिवादन" -अर्चना शंभरकर (२९ सप्टेंबर २०२४). लिहिण्यासारखे खूप आहे पण लेखनसीमा सांभाळणेही आवश्यक आहे. अर्चना शंभरकर गाडेकर यांच्या कार्यकर्तृत्वाला शतशः प्रणाम!

---------------

(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)

# शनिवारवाड्यातील नमाज



## मुंबई कॉलिंग

डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

गेल्या पंचवीस वर्षात पुणे वेगाने बदलले. दर्जेदार उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचे मोठे जाळे या महानगरात आहे. लहान-मोठ्या उद्योगांनी पुण्याला वेढलेले आहे. अनेक आयटी हब या शहरात उभे राहिले. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कार्यालयांची गर्दी झाली.

शिक्षणासाठी व रोजगारासाठी हजारो परप्रांतीयांचे लोंढे गेल्या दोन दशकांपासून पुण्यावर आदळू लागलेत. पेशव्यांचे पुणे आता पुस्तकात शोधावे लागते. मराठा साम्राज्य आणि पेशव्यांची वास्तू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शनिवारवाड्यात जाऊन दोन मुस्लिम बुरखाधारी महिलांनी नमाज पढल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आणि पुण्यात राजकीय पक्षांना एकमेकांवर हल्ले चढविण्यासाठी नवे शस्त्र मिळाले.

हिंदु मुस्लिम तेढ निर्माण केली जात असल्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. विशेष म्हणजे राज्यात सत्तेवर असलेल्या महायुतीमधील घटक पक्षांमधेच शनिवारवाड्यातील नमाजावरून जुंपली असल्याचे बघायला मिळाले. ऐन दिवाळीत उद्धव ठाकरेंची उबाठा सेना, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, अजितदादा पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाच्या खासदार मेधा कुलकर्णींवर तुटन पडले होते. राजकीय पक्षांच्या दंगलीत पुणेकर बिचारे शांत राहिले. मग शनिवार वाड्यातील नमाजावर राजकीय पक्ष रान का पेटवत होते?

शनिवारवाडा ही मराठा साम्राज्याची शान आहे. पेशव्यांच्या यशाची घोडदौड आणि अस्त या वास्तुने पाहिला आहे. शनिवारवाडा ही ऐतिहासिक वास्तू पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येते. नमाज पढल्यावरून आणि तिथे असलेल्या मजारीवरून राजकीय पक्षातील वाद विकोपाला गेला आहे.

तिथे असलेल्या कबरीवर हजरत ख्वाजा सैयद शाह पीर मकबुल हुसेरी पीर असा फलक दिसतो. पण ही कबर कधी बांधली , कोणी बांधली यासंबंधीच काहीच माहिती मिळत नाही. याच शनिवारवाड्यात मस्तानी राहिली होती. अधिकृत कबर हटवा अशी मागणी मेधा कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा कार्यकर्त्यानी व पतित पावन संघटनेने केली आहे.

मेधा कुलकर्णी या भाजपाच्या धाडसी लोकप्रतिनिधी आहेत. नगरसेवक, आमदार आणि आता खासदार असा त्यांचा प्रवास आहे. विधानसभेला त्यांचे तिकीट कापून पक्षाने कोल्हापुरच्या चंद्रकांतदादा पाटील यांना दिले तेव्हा पुण्यात भाजपामधे असंतोषाला तोंड फुटले होते. नंतर भरपाई म्हणून पक्षाने त्यांना राज्यसभेवर पाठवले.

मेधा कुलकर्णी या नेहमीच हिंदुत्वाचा अजेंडा जिद्दीने राबवताना दिसतात. त्यांच्या राजकीय वाटचालीत त्यांना स्वतःच्या भाजपासह विरोधी पक्षात अनेक राजकीय शत्रू निर्माण झाले आहेत.

शनिवारवाड्यातील नमाजावरून वादंग पेटले तेव्हा राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा) च्या प्रवक्त्या रूपाली ठोंबरे, उबाठा सेनेच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे, या त्यांच्यावर तुटून पडल्याच पण शिवसेना (शिंदे) नेत्या व विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हेंनीही घरचा आहेर दिला.

दोन मुस्लिम महिलांनी नमाज पढल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर मेधा कुलकर्णींनी थेट शनिवारवाडा गाठून आंदलन केले. मजारी हटविण्याची मागणी केली. या मजारीची नोंद १९३६ च्या दस्तऐवजात आहे, मग मेधा कुलकर्णी तिला अनधिकृत कोणत्या आधारावर ठरवतात, असा रूपाली ठोंबरेंचा सवाल आहे. भाजपाचा मुस्लिम विरोध सर्वांना ठाऊक आहे. पण मेधा यांना खोटे ठरविण्याचा राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा सेनेने चंग बांधलाय.

मेधाताईंचा राजकीय स्टंट आहे, नौटंकी आहे, हिंदु मुस्लिम यांच्यात त्या तेढ निर्माण करीत आहेत, त्यांच्यावर पोलिसांनी गुन्हे दाखल करावेत अशा मागण्या विरोधकांनी केल्या. राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रवक्त्याने तर मेधा कुलकर्णींची अक्कल काढली, शिक्षिका असून कसे कळत नाही, त्यांची पदवी तपासायला हवी अशी मागणी केली.

मेधांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी बुरखाधारी महिलांनी नमाज पढला, त्या जागेवर गोमुत्र शिंपून ती जागा शेणाने सारवून घेतली. तिथे भगवा झेंडा लावावा असा आग्रह धरला. नंतर पुण्याचे ग्रामदैवत कसबा गणपतीचे दर्शन घेतले व छत्रपती शिवाजी महाराजांनी जिथे शाहिस्तेखानाची बोटे छाटली त्या लाल महालात जाऊन मेधाताईंनी राष्ट्रमाता जिजाऊंना अभिवादन केले.

याच शनिवारवाड्यात मस्तानी राहात असे, तिथे किती वेळा नमाज पढला गेला असेल याची गिनती करता येणार नाही, असा खोचक टोला सुषमा अंधारे यांनी लगावला आहे. शनिवारवाड्यात नमाजाला बंदी असेल व कबर अनधिकृत असेल तर सत्ताधारी पक्षाच्या खासदार असलेल्या मेधाताईंनी पोलीस आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा पुरातत्व विभागाकडे तक्रार द्यायला हवी होती हे निलम गोऱ्हे यांचे म्हणणे रास्त आहे.

मुळात नमाजाचा व्हिडिओ कधीचा आहे, त्यात नेमके कोण आहे हे स्पष्ट झालेले नाही. सारस बागेतील नमाजानंतर आता शनिवारवाड्यातील नमाजाने पुण्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. हाजी अलीला जाऊन कोणी हनुमान चालिसा वाचला तर चालेल का? असा मार्मिक प्रश्न मंत्री नितेश राणेंनी विचारलाय. शनिवारवाडा नमाजावरून राजकीय रण पेटले असताना राजकीय पक्षांचे प्रमुख दिवाळीत फराळ खाण्यात व्यस्त होते.

• • •

# धार्मिक बना.. धर्मांध नाही!

धर्म ही संकल्पना माणसाला उन्नत करणारी आहे. धर्म म्हणजे करुणा, दया, माणुसकी, समता आणि न्याय. पण दुर्दैवाने आज धर्माचे रूपांतर अंधश्रद्धा, कर्मकांड, ढोंग आणि लोभाच्या बाजारात झालेले दिसते. धमार्ची खरी आत्मा आपण विसरलो आणि धर्मांधतेच्या काळोखात आपण डोळे मिटून चालत आहोत. धर्म हा कधीच माणसाला विभाजित करणारा नसतो; धर्म म्हणजे माणसाला माणसाशी जोडणारा अदृश्य धागा. पण आज त्या धाग्याला छेद दिले गेले आहेत. जाती-पातींच्या भिंती उभारल्या गेल्या आहेत. एखाद्याचे रक्त वेगळ्या धमार्चे म्हणून नाकारले जाते, एखाद्याचे दुःख जातीमुळे गौण मानले जाते हे धर्म नाही, तर धमार्चा अपमान आहे. म्हणून एकच आवाहन करायचे आहे की धार्मिक बना, पण धर्मांध कधीही होऊ नका!

---------------

### कर्मकांड व अंधश्रद्धेची साखळी :

आपल्या समाजातील मोठा आजार म्हणजे कर्मकांड. एखादी अडचण आली की आपण उपाय शोधत नाही, तर बुवाबाबांच्या दारात डोकं टेकतो. रोग झाला की औषधापेक्षा झाडफुंक जास्त केली जाते. मुलगी झाल्यावर दुःखी चेहेरे आणि मुलगा झाला तर देवदेवतांना नवस.आजही लाखो लोकांना वाटते की नुसते कर्मकांड केल्याने त्यांचे भाग्य बदलते. पण सत्य वेगळे आहे.भाग्य बदलते ते परिश्रमाने, शिक्षणाने, विज्ञानाच्या आचरणाने.

गाडगेबाबा म्हणाले होते....

खायचे ताट मोडा, पण लेकरांना शिकवा.

ही शिकवण म्हणजे एका वाक्यात संपूर्ण समाजधर्म आहे. मंदिरांच्या कळसावर सोन्याचा थर चढवण्यापेक्षा जर एखाद्या गरीब मुलाच्या शाळेच्या फीला मदत केली, तर तेच देवपूजन आहे.

### खोट्या बुवाबाबांचा खेळ

गेल्या काही दशकांत समाजाला ढोंगी बुवाबाबांनी जखडून ठेवले. बाहेरून साधू-संताचे वस्त्र, पण आतून पैशासाठी भुकेलेले व्यापारी. भक्तांचा भावनिक शोषण करून संपत्ती कमावणारे अनेक बाबा महाराज आज कारागृहात आहेत.पण दोष फक्त त्यांचा नाही. दोष आपलाही आहे. आपणच त्यांच्या खोट्या वचनांना सत्य मानून त्यांच्या चरणी माथे टेकवले. आपली विचारशक्ती झोपवून ठेवली.

गजानन कुसुम ओंकार हरणे
खडकी, अकोला.
9822942623

आजही समाजात असे अनेक भोंदू जन्म घेत आहेत आणि तरुणाई त्यांच्या मागे जाते आहे.

खरा धर्म सांगतो... स्वतः विचार करा, स्वतः निर्णय घ्या, आणि सत्य-असत्य यातला फरक ओळखा.

### धर्मवाद व जातीय राजकारण

धर्माच्या नावाने राजकारण करणारेही समाजाला वेगळ्या दिशेने ढकलतात. तरुणांना प्रगतीची दिशा दाखवण्याऐवजी ते जातीयतेच्या कचाट्यात अडकवतात. एकजुटीची ताकद मोडून काढण्यासाठी धमार्चा वापर केला जातो.आज जर तरुणाईने या जाळ्यातून बाहेर पडले नाही, तर आपल्या समाजाची प्रगती कधीच होणार नाही. जातीय राजकारणाने समाजाच्या पायाभरणीला उखडून टाकले आहे. धर्माने जोडायचे असते, पण धर्मवाद फोडतो.

### गाडगेबाबांचा खरा संदेश

गाडगेबाबांनी आपले जीवनच एक संदेश बनवले. त्यांनी कधी वैभवाचे वस्त्र नेसले नाही. गावोगावी भटकून त्यांनी स्वच्छतेचा, शिक्षणाचा, विज्ञानाचा संदेश दिला. त्यांनी स्पष्ट सांगितले, कर्मकांड करू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, आळस झटकून प्रयत्नवादी बना. जातीभेद विसरा. शाळेला मंदिरापेक्षा प्राधान्य द्या. ही शिकवण म्हणजे आपल्या समाजाच्या उत्थानाचा खरा मार्ग आहे. पण आज आपण या संदेशाला विसरलो आहोत.

### उत्सवांचा विकृत चेहरा

सार्वजनिक उत्सव म्हणजे एकतेचा उत्सव असायला हवा होता. पण आज त्याचे रूपांतर स्पर्धा, डीजेच्या गोंगाटात आणि दारू-मांसाच्या मेजवानीत झाले आहे. उत्सव म्हणजे आनंदाचा प्रसंग आहे, पण तो आनंद जर दुसऱ्याला त्रास देणारा असेल, तर तो धर्म नाही.आपण जर महापुरुषांच्या जयंतीत त्यांच्या विचारांना वंदन न करता फक्त मिरवणुकीवर भर दिला, तर ती जयंती केवळ दिखावा आहे. खरा उत्सव म्हणजे विचारांचा उत्सव, कायार्चा उत्सव, समाजाला दिशा देणारा उत्सव.

### तरुणाईची जबाबदारी

आजचा समाज एका वळणावर उभा आहे.एकीकडे विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, प्रगती आहे; तर दुसरीकडे अंधश्रद्धा, जातीयता, धर्मांधता आहे. हा वळण योग्य दिशेला न्यायचा तो फक्त तरुणाईच्या हातात आहे. आजची तरुण पिढी जर बंडखोरी करणार असेल, तर ती बंडखोरी दगडफेकीची नाही, तर विचारांची असायला हवी.

खोट्या बुवाबाबांविरुद्ध, जातीभेदाविरुद्ध, अंधश्रद्धेविरुद्ध, व्यसनांविरुद्ध अशी विचारांची मशाल पेटवली पाहिजे. धर्माचा खरा मार्ग काय तर ,धर्म म्हणजे,माणसाने माणसाशी समतेने वागणे, गरिबाला मदतीचा हात देणे, ज्ञानाचा दीप लावणे, अन्यायाविरुद्ध उभे राहणे.

### करुणा, दया, प्रामाणिकपणा

धर्म कोणताही वाईट नसतो, पण त्यात स्वार्थी विकृती घुसतात तेव्हा तो विकृत होतो. त्या विकृतींना विरोध करणे, त्यांच्यावर प्रश्न विचारणे हेच खऱ्या धर्माचे पालन आहे.

### धर्म म्हणजे माणुसकी

आज आपण ठरवले पाहिजे, मंदिरापेक्षा शाळांना प्राधान्य द्यायचे,कर्मकांडाऐवजी विज्ञानावर विश्वास ठेवायचा, ढोंगी बुवाबाबांऐवजी गाडगेबाबांच्या संदेशाला अंगीकारायचे,जात-पात विसरून मी माणूस आहे, ही ओळख जपायची.

आपण धर्माने एकमेकांना जोडले, तरच समाज उन्नत होईल. धर्माच्या नावाने जर आपण वेगळे झालो, तर समाज मागे जाईल.म्हणूनच शेवटचे एक वाक्य धर्म म्हणजे माणुसकी, आणि माणुसकीतच देव आहे. धार्मिक बना, पण धर्मांध कधीही होऊ नका.

(लेखक, साहित्यिक,समाजसेवक, समाजसुधारक, कवी, वक्ता, विश्लेषक, प्रबोधनकार आहेत.)

■ ■ ■

## वाचक लिहितात

# 'मनाचे श्लोक' नावाचा वापर करणे पडले महागात!

समर्थ रामदास स्वामी लिखित 'मनाचे श्लोक मागील साडेतीनशेहून अधिक काळ विद्यार्थ्यांच्या मनात संस्कारांचे बीजारोपण करत आहेत. 'मनाचे श्लोक' आदर्श जीवन कसे असावे याची शिकवण बालमनावर बिंबवतात. या श्लोकांच्या वाचनातून उभारी मिळते, स्वतःतील दोषांची जाणीव होते. त्यामुळे शेकडो वर्षांपासून हे श्लोक घराघरांत श्रद्धेने आणि आदराने म्हटले जात आहेत, पाठ केले जात आहेत. अशा 'मनाचे श्लोक' हे नाव घेऊन एक चित्रपट मागील महिन्यात प्रदर्शित झाला. हे नाव वाचल्यावर या चित्रपटातून समर्थांविषयी अधिक माहिती मिळेल, हा चित्रपट आपल्या घरातील लहान मुलांनाही दाखवूया अशी काहीशी चर्चा सुरु असतानाच चित्रपटाचा ट्रिझर प्रदर्शित झाला आणि चित्रपटाची सत्यता समोर आली.

भारतीय संस्कृतीला काळिमा फासणाऱ्या 'लिव्ह इन रिलेशनशिप'चा उहापोह करणारा हा चित्रपट असल्याचे लोकांच्या लक्षात आले ज्यातील काही दृश्यसुद्धा खटकणारी होती. चित्रपटात हेच दाखवायचे होते, तर त्याला 'मनाचे श्लोक' नाव का? हा प्रश्न त्यावेळी प्रेक्षकांना पडला आणि या चित्रपटाच्या नावाला विरोध सुरु झाला. केवळ आपला गल्ला भरण्यासाठी परमपवित्र 'मनाचे श्लोक' या नावाचा वापर करणे कोणालाही न रुचणारे होते.

या चित्रपटाला प्रेक्षकांकडूनच विरोध होऊ लागला, काही ठिकाणी या चित्रपटाचे प्रक्षेपण थांबवण्यात आले. चित्रपटाच्या निर्मात्यांनी अखेर राज्यभरात या चित्रपटाचे प्रक्षेपण बंद करून चित्रपटाचे नाव बदलून चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्याची घोषणा केली. त्यानुसार चित्रपटाला 'तू बोल ना' असे नाव देऊन १६ ऑक्टोबरला चित्रपट पुन्हा प्रदर्शित करण्यात आला; मात्र मायबाप प्रेक्षक चित्रपटाच्या निर्माता दिग्दर्शकांसह कलाकांवर नाराज झाल्याने त्यांनी या चित्रपटाकडे पाठ फिरवली. प्रेक्षकांच्या भावनांचा विचार न करता चित्रपट प्रदर्शित केल्यास त्याचे काय परिणाम होतात हे या चित्रपटाच्या टीमच्या लक्षात आलेच असेल. यावरून अन्य निर्माता, दिग्दर्शकांनीही बोध घ्यायला हवा.

चित्रपट हा व्यवसाय आहे आणि तो ज्यांच्यावर अवलंबून आहे त्या प्रेक्षकांच्या आवडीनिवडी जपायला हव्यात, त्यांच्या भावनांचा सन्मान करायला हवा. आजमितीला 'महाअवतार नरसिम्हा', 'कांतारा : अ लिजेंड चॅप्टर १', 'दशावतार' यांसारखे चित्रपट बॉक्स ऑफिसवर भरपूर गल्ला जमवतात. या चित्रपटांतून धार्मिक विषय हाताळले आहेत मात्र ते हाताळताना प्रेक्षकांच्या भावनांचाही आदर करण्यात आला आहे.

मागील ४-५ वर्षांत प्रेक्षकांची आवड बदलू लागली आहे. आपली श्रद्धास्थाने, धार्मिक प्रतीके, आपल्या प्रथा परंपरा यांबाबत सजग होऊ लागले आहेत. त्यांचा अवमान आजचा प्रेक्षक सहन करणार नाही; मात्र त्यांचा आदर करून चित्रपटांची निर्मिती केली तर हेच प्रेक्षक त्या निर्मितीला डोक्यावर उचलून घेण्यासही कमी करत नाहीत. 'तू बोल ना' चित्रपटाची टीम सुजाण आहे. ती आपल्या चुकीतून नक्कीच बोध घेतील आणि येणाऱ्या काळात प्रेक्षकांच्या भावनांचा आदर करून दर्जेदार चित्रपटाची निर्मिती करतील अशी अपेक्षा आहे !

■ सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.




आजकालच्या खराब खाण्या पिण्याच्या सवयींमुळे मधुमेहाचे रुग्ण झपाट्याने वाढताना पाहायला मिळत आहेत. मधुमेहाला सायलेंट किलर आहे, जो हळूहळू संपूर्ण शरीर खाऊन टाकतो. त्यामुळे तुमच्या शरीरातील साखर नियंत्रीत ठेवण्यासाठी ठेवण्यासाठी काही घरगुती उपाय करू शकता.

आरोग्य तज्ञांच्या मते, दररोज सकाळी 5 अँटी डायबेटिक ड्रिंक्स प्यायली पाहिजेत. या ड्रिंक्सचे सेवन केल्यामुळे तुमचं आरोग्य निरोगी राहाण्यास मदत होते आणि तुमच्या शरीरात साखरेच्या चढ-उतारांना प्रतिबंध करण्यास मदत करेल. ज्यामुळे डोळे, मूत्रपिंड, हृदय यांना नुकसान होण्यापासून वाचवता येते.

अनेक संशोधन आणि तज्ञ मेथीच्या दाण्यांना फायदेशीर मानतात. त्यामध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते ज्यामुळे मधुमेह नियंत्रित राहातो आणि मधुमेहावरील रामबाण उपाय संप्रेरकाचे उत्पादन वाढविण्याची शक्ती असते. संशोधनानुसार, मेथीचे दाणे रक्तातील साखर नियंत्रणात ठेवू शकतात. त्याचे पाणी तयार करण्यासाठी एक चमचा मेथीचे दाणे पाण्यात भिजवून रात्रभर ठेवा. सकाळी उठून ते प्या आणि धान्य चावून खा.

अनेक वर्षांपासून कारल्याचा मधुमेहावर औषध म्हणून वापर केला जात आहे. यात काही संयुगे असतात, जे शरीरात ग्लुकोजचा वापर वाढवून रक्तातील साखर नियंत्रित करतात. सकाळी ताजे पिऊ शकता. हे रक्त स्वच्छ करण्यास देखील मदत करते. दालचिनीच्या पोषक तत्वांमध्ये इन्सुलिनसारखे कार्य करण्याची शक्ती असते .त्यामुळे मधुमेहावर या मसाल्याच्या सेवनाने फायदा होतो.

रात्री झोपण्यापूर्वी एक चमचा दालचिनी पावडर पाण्यात भिजवा आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्याचे सेवन करा. हे फळ आपल्या मेंदूसाठी, त्वचासाठी, डोळ्यांसाठी, केसांसाठी खूप आरोग्यदायी आहे.

हे ऑक्सिडेटिव्ह स्ट्रेस रिड्यूसर मानले जाते, जे मधुमेह आणि रक्तातील साखर संतुलित ठेवते. दररोज सकाळी आवळ्याचा रस प्यायल्याने शरीराचे कार्य सुधारते.

ग्रीन टीला बऱ्याचदा चरबी कमी करणारे पेय म्हणून पाहिले जाते. परंतु यामुळे मधुमेहावरील रामबाण उपाय संवेदनशीलता वाढते. हे पिण्यामुळे टाइप 2 मधुमेहाच्या विकासास अडथळा येतो. सकाळच्या न्याहारीमध्ये आपण सर्वप्रथम ह्याचे सेवन करू शकता. या सर्व उपायांमुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहील.

• • •

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### जगमे रह जायेंगे..!

जिभेला हाड नाही म्हणून
काही कां बरळावं ?
त्यामुळे कुणाचे संसार होती
उध्वस्त, हे ही ध्यानात घ्यावं..!

जिभेपाशी आहे सुत्र
जोडावया शत्रु मित्र
म्हणून संयम व सबुरी
हेच यशस्वी जीवनाचे सुत्र..

शब्दशक्ति आहे अनमोल
म्हणून तोलुन मापून बोल
कारण जगमे रह जायेंगे
आखरी प्यारे तेरे बोल..!

# कलर कोटेड बनावट उत्पादनांची विक्री रोखण्यासाठी जेएसडब्ल्यू स्टील आणि अमरावती पोलिसांचे संयुक्त छापे; ५० हून अधिक बनावट जेएसडब्ल्यू पत्रे जप्त

**नागपूर, २४ ऑक्टोबर :** जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेडने महाराष्ट्रात अमरावती येथे कंपनीच्या बौद्धिक संपदा हक्काचा संपत्तीचा गैरवापर करणाऱ्या प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. बनावट कंपन्यांविरुद्ध जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेडने ही निर्णायक कारवाई करताना जेएसडब्ल्यूच्या ब्रॅण्डचा गैरवापर करत बनावट उत्पादने विकण्याचा प्रकार रोखला आहे. जेएसडब्ल्यू ब्रँडचा वापर करत हुबेहुब बनावट उत्पादन विक्री होत असल्याचा अनेक तक्रारी कंपनीला प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत कंपनीच्या ब्रँड संरक्षण पथकाने अमरावती शहर पोलिसांच्या सहकार्याने अमरावती शहर पोलिस ठाण्याच्या अखत्यारीत कार्यरत असलेल्या रोलेक्स रूफिंग्ज आणि जीटी देवरिया या दोन विक्री केंद्रांवर छापे टाकत कंपनीच्या नावाने बनावट उत्पादने विक्रीचा प्रकार उघडकीस आणला.





कंपनीच्या पथकाने ९ ऑक्टोबर २०२५ आणि १२ ऑक्टोबर २०२५ रोजी केलेल्या या कारवाईत, जेएसडब्ल्यू ब्रॅण्डचा नावाचा वापर करत कलर कोटेड केलेले आणि विक्रीसाठी ठेवलेले ५० हून अधिक बनावट पत्रे जप्त केले. कॉपीराइट कायद्याच्या कलम ५१ आणि ६३ अंतर्गत संबंधितांविरुध्द एफआयआर क्रमांक ०३५९/२०२५ आणि ०८६१/२०२५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कंपनीच्या नावाचा गैरवापर करत अशा फसव्या आणि बनावट उत्पादनांच्या विक्रीत सहभागी असलेल्या व्यापारी आस्थापनांविरुध्द कठोर कायदेशीर कारवाईबाबत जेएसडब्ल्यू स्टीलची कठोर वचनबद्धता या कारवाईमुळे पुन्हा एकदा दिसून आली आहे.

या कारवाईबद्दल भाष्य करताना जेएसडब्ल्यू स्टीलच्या प्रवक्ता म्हणाला, जेएसडब्ल्यू स्टीलच्या बौद्धिक संपत्तीचे उल्लंघन किंवा ब्रँडचा गैरवापर करण्यांना कंपनी अजिबात दयामाया दाखविणार नाही. बनावट उत्पादनांमुळे केवळ ग्राहकांची फसवणूकच होत नाही, तर कंपनीच्या गुणवत्ता आणि सुरक्षिततेसंदर्भातील उच्च मानकांशी देखील तडजोड होते. त्यामुळे जेएसडब्ल्यूच्या ब्रँडबाबत ग्राहकांचा असलेला विश्वास आणि भरोसा सदैव जपण्यासाठी आम्ही कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय यंत्रणांच्या खांद्याला खांदा लावून कारवाई करत राहू.

शासकीय यंत्रणांच्या साथीने जेएसडब्लू स्टीलने देशात विविध प्रदेशांमध्ये अशाच प्रकारची प्रतिबंधात्मक कारवाई केलेली आहे. अशा कारवाईंमध्ये आंध्र प्रदेशातील कडप्पा येथे अलिकडेच टाकलेल्या छाप्याचा समावेश आहे. तेथे कंपनीच्या ब्रॅण्डचा गैरवाप करुन विक्रीस असलेली बनावट जेएसडब्लू सिल्व्हर ही उत्पादने जप्त करण्यात आली होती. जेएसडब्लूच्या नावाचा गैरवापर करत विकल्या जाणाऱ्या निकृष्ट आणि बनावट वस्तूंपासून ग्राहक, डीलर्स आणि वितरकांचे संरक्षण करण्यासाठी कंपनीचा सक्रिय दृष्टिकोन या सातत्यपूर्ण प्रयत्नातून प्रतिबिंबित होतो.

आपल्या बौद्धिक संपत्तीचे रक्षण करण्यासाठी आणि भारतातील आपल्या अधिकृत नेटवर्कद्वारे केवळ अस्सल, उच्च दर्जाची जेएसडब्ल्यू उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचण्याबाबत जेएसडब्ल्यू स्टील वचनबद्ध आहे.

# मीशोने सेबीकडे दाखल केला अपडेटेड ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस

**मुंबई, २४ ऑक्टोबर :** मीशो लिमिटेड ही भारतातील ई-कॉमर्स क्षेत्रात ग्राहक, विक्रेते, लॉजिस्टिक्स भागीदार आणि कंटेंट क्रिएटर्स या चार प्रमुख घटकांना एकत्र आणणारे मल्टी-साइडेड टेक्नॉलॉजी कंपनी आहे. कंपनीने भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाकडे (सेबी) आपला अपडेटेड ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे.

प्रस्तावित प्रारंभिक सार्वजनिक ऑफर मध्ये ४,२५० कोटींच्या नवीन इक्विटी शेअर्सचा इश्यू (फेस व्हॅल्यू १ प्रत्येकी) तसेच १७,५६,९६,६०२ इक्विटी शेअर्सचा ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे. या ओएफएसमध्ये एलेव्हेशन कॅपिटल व्ही लिमिटेड, पीक एक्सव्ही पार्टनर्स इन्व्हेस्टमेंट्स व्ही, हायवे सिरीज १ (व्हेंचर हायवे एसपीव्ही एलएलसीचा एक भाग), वाय कॉम्बिनेटर कॉन्टिन्युइटी होल्डिंग्ज एलएलसी, गोल्डन समिट लिमिटेड, व्हीएच कॅपिटल, व्हीएच कॅपिटल एक्सआय हे कॉर्पोरेट सेलिंग शेअरहोल्डर्स आहेत.

विदित आत्रेय आणि संजीव कुमार हे प्रमोटर सेलिंग शेअरहोल्डर्स आहेत, तर मॅन हे टॅम हे इंडिव्हिज्युअल सेलिंग शेअरहोल्डर म्हणून सहभागी आहेत.

कंपनीने नेट प्रोसीड्सचा वापर पुढील कारणांसाठी करण्याचा प्रस्ताव मांडला आहे : मीशो टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड (सबसिडियरी) मध्ये क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चरवरील गुंतवणूक; मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि टेक्नॉलॉजी विकासासाठी काम करणाऱ्या टीम्सच्या विद्यमान व नव्या कर्मचाऱ्यांचे वेतन भरणे; मीशो टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडमध्ये (सबसिडियरी) मार्केटिंग आणि ब्रँड इनिशिएटिव्हसाठी खर्चाची गुंतवणूक; तसेच अधिग्रहण व इतर धोरणात्मक उपक्रमांद्वारे इनऑर्गनिक ग्रोथ साधणे आणि सामान्य कॉर्पोरेट कामकाजासाठी निधी वापरणे.

आर्थिक वर्ष २५ मध्ये मीशो भारतातील सर्वात मोठे ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म म्हणून उदयास आले. वार्षिक ट्रान्झॅक्टिंग युजर्स आणि वार्षिक प्लेस्ड ऑर्डर्स या दोन्ही बाबतीत मीशोने सर्व ई-कॉमर्स कंपन्यांना मागे टाकले. या प्लॅटफॉर्मने ५ लाखांहून अधिक ट्रान्झॅक्टिंग विक्रेत्यांना सुमारे १९९ दशलक्ष वार्षिक ट्रान्झॅक्टिंग युजर्स सोबत जोडले आणि वर्षभरात जवळपास १.८ अब्ज ऑर्डर्स सुलभ केल्या. हे भारतभरातील ग्राहकांसाठी ई-कॉमर्स अधिक परवडणारे, सुलभ आणि आकर्षक करण्याच्या मीशोच्या प्रयत्नांचे खरे प्रतिबिंब आहे.

# श्रीराम सुपर ५-एसआर-०५ आणि १-एसआर-१४ गहू बियाण्यांद्वारे शेतकऱ्यांना मिळतेय विक्रमी उत्पादन, यंदाही याच जातींवर विश्वासाचा कल

**अमरावती, २४ ऑक्टोबर :** महाराष्ट्रात गहू लागवडीमध्ये श्रीराम फार्म सॉल्युशन्सने विकसित केलेल्या श्रीराम सुपर ५-एसआर-०५ आणि श्रीराम सुपर १-एसआर-१४ या गहू बियाण्यांनी उल्लेखनीय बदल घडवून आणला आहे. या सुधारित जाती उच्च उत्पादन, रोगप्रतिकारक क्षमता आणि विविध हवामान परिस्थितींमध्ये जुळवून घेण्याच्या गुणधर्मांसाठी प्रसिद्ध झाल्या आहेत.

श्रीराम फार्म सॉल्युशन्सच्या जागतिक दर्जाच्या गहू वैज्ञानिकांनी विकसित केलेल्या या जाती - श्रीराम सुपर १-एसआर-१४ आणि ५-एसआर-०५ - त्यांच्या उत्कृष्ट उत्पादकता आणि अनुकूलन क्षमतेमुळे शेतकऱ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय ठरल्या आहेत. या जातींमध्ये अधिक कल्ले, लांब बाळ्या आणि रोगांविरुद्ध सहनशीलता आहे. विशेष म्हणजे, बदलत्या हवामान आणि नव्या आव्हानांमध्येही या जाती उत्तम परिणाम देतात. त्यामुळे भारतातील विविध भागांतील शेतकऱ्यांची ही दोन्ही जाती पहिली पसंती बनल्या आहेत.

अनुभवी शेतकरी विपुल वसंतराव देशमुख सांगतात की यावर्षी त्यांनी आपल्या शेतात श्रीराम सुपर ५-एसआर-०५ गहू पेरला. त्यांचे म्हणणे आहे की या जातीचा खोड मजबूत असल्याने पिके पडण्याची शक्यता राहत नाही. त्याचबरोबर कल्ल्यांची संख्या जास्त असून प्रत्येक ओंबीत ८५ ते ९० दाणे मिळाल्याने उत्पादन अत्यंत चांगले आले. ते म्हणतात, विपरीत हवामानातही श्रीराम सुपर ५-एसआर-०५ ने स्थिर आणि उत्कृष्ट उत्पादन दिले हा खरोखरच विश्वासार्ह गहू प्रकार आहे.

त्याचप्रमाणे श्रीराम सुपर १-एसआर-१४ या जातीबद्दलही शेतकऱ्यांचा प्रतिसाद खूप चांगला आहे. शेतकरी मंगेश कुमार सांगतात की गेल्या वर्षी त्यांनी आपल्या शेतात श्रीराम सुपर १-एसआर-१४ बियाणे पेरले होते. त्यांच्या माहितीनुसार, या जातीच्या ओंब्या अधिक लांब आहेत, कल्ले जास्त येतात आणि प्रति बाळी दाण्यांची संख्या देखील अधिक आहे. याशिवाय या जातीला पाणीही तुलनेने कमी लागते. मंगेश कुमार इतर शेतकऱ्यांनाही ही जात पेरण्याचा सल्ला देतात.

श्रीराम सुपर ५-एसआर-०५ आणि १-एसआर-१४ व्यतिरिक्त श्रीराम फार्म सॉल्युशन्सच्या इतर जाती जसे की श्रीराम सुपर ३-एसआर-७२, ३०३, १११ आणि २७२ ह्याही मागील काही वर्षांपासून त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय ठरल्या आहेत.

श्रीराम फार्म सॉल्युशन्स ही १३५ वर्षे जुनी डीसीएम श्रीराम लिमिटेड कंपनीचा एक भाग आहे. हा एक अग्रगण्य व्यावसायिक समूह आहे, ज्याचा वार्षिक उलाढाल रुपये १२,७४१ कोटी आहे.

श्रीराम फार्म सॉल्युशन्स बीज, विशेष पोषण आणि पिक संरक्षण यांसारख्या कृषी इनपुट क्षेत्रात कार्यरत असून भारतातील कृषीला बळकटी देणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे.

# पुष्पा इम्पॉसिबलमध्ये कादंबरीने एक धक्कादायक योजना आखल्यामुळे निःस्वार्थ दीप्तीचे मन दुखावते

**मुंबई, २४ ऑक्टोबर :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल ही मालिका तिच्या उत्कंठावर्धक कथेद्वारे आणि हृदयस्पर्शी पात्रांद्वारे प्रेक्षकांना आकर्षित करत आहे. पुष्पा (करुणा पांडे) वकील होण्याचे स्वप्न पूर्ण करत असताना तिला नवीन अडचणींना तोंड द्यावे लागते. या अडचणी तिच्या दृढनिश्चयाची आणि तिच्या निरतिशय जपलेल्या बंधनांची परीक्षा घेतात.

प्रार्थना गर्भवती राहू शकत नाही, हे कळल्यानंतर दीप्ती एक आयुष्य बदलून टाकणारा निःस्वार्थी निर्णय घेते : ती तिच्या न जन्मलेल्या जुळ्यांपैकी एकाला प्रार्थनाला देण्याचा निर्णय घेते. तथापि, या कृतीमुळे कुटुंबात अशांतता निर्माण होते. जेव्हा बापोदरा (जयेश भारभया) मुलासाठी कायदेशीर कागदपत्रांबद्दल बोलतो तेव्हा आश्विन (समृद्ध बावा) रागावतो. तो दीप्तीच्या निवडीबद्दलही द्विधा मनःस्थितीत असतो. या भावनिक वादळातच प्रार्थनाला तिच्या आयपीएस प्रशिक्षणासाठी फोन येतो. तिचे कर्तव्य आणि दीप्तीचा निर्णय यात अडकलेली ती निघून जाण्याचा निर्णय घेते. ती दीप्तीला सांगते की, आता तिला तिच्या मुलाची गरज नाही. तिचा नवीन प्रवास तिची वाट पाहत आहे. कादंबरीच्या (ब्रिंदा त्रिवेदी) भयानक योजनेची जाणीव नसलेल्या दीप्तीला दुसऱ्या दिवशी प्रसूती वेदना होतात. कादंबरीसाठी हे धक्कादायक असते. कादंबरी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन दीप्तीच्या नवजात बाळाला चोरण्याचा कट रचते आणि स्वतःच गर्भवती असल्याचे भासवते.

या भावनिक भागाबद्दल बोलताना दीप्तीची भूमिका साकारणारी गरिमा परिहार म्हणाली, दीप्तीच्या आयुष्यातील हा टप्पा वेदना, शक्ती आणि त्यागाने भरलेला आहे. एक आई म्हणून तिची प्रवृत्ती निःस्वार्थपणे प्रेम देण्याची आहे आणि तिचे न जन्मलेले बाळ प्रार्थनाला देण्याचा तिचा निर्णय पूर्णपणे तिचा मनापासूनचा आहे. पण, जेव्हा परिस्थिती तिच्या विरुद्ध होते तेव्हा ती आणखी हृदयद्रावक होते. या भागात दीप्तीची भूमिका साकारताना मला आईच्या भावना किती शक्तिशाली असू शकतात, इतरांना काही देण्यासाठी स्वतःचे काही गमावावे लागले तरी ती सर्व काही देऊ शकते, हे जाणवले.

यात भर घालत कादंबरीची भूमिका साकारणारी ब्रिंदा त्रिवेदी म्हणाली, कादंबरीचे वागणे व कृती क्रूर वाटू शकतात, परंतु त्या असुरक्षितता आणि भावनिक अशांततेतून निर्माण होतात. तिच्या वागण्याने नैतिक मर्यादा ओलांडल्या तरी तिला जग आणि स्वतःसमोर काही तरी सिद्ध करायचे आहे. तिच्या व्यक्तिरेखेसाठी हा एक गुंतागुंतीचा टप्पा आहे, ती अपमानास्पद बोलणारी, असुरक्षित आणि काय करेल याचा नेम नसणारी आहे. एक अभिनेत्री म्हणून नैराश्य आणि अंधकार यांच्यातील बारीक रेषा चित्रित करणे आव्हानात्मक आणि आकर्षक आहे.

# मुख्यत्वे भव्यतेवर केंद्रित अललेल्या अनेक पौराणिक मालिकांपेक्षा सोनी सबवरील गाथा शिव परिवार की ही मालिका गणेश व कार्तिकेय यांचे दिव्यत्व आणि मानवी भावनांचा समतोल साधते : अभिनेत्री श्रेणू पारीख

**मुंबई, २४ ऑक्टोबर :** सोनी सबवरील गाथा शिव परिवार की ही मालिका गणेश कार्तिकेय यांच्या साथीने प्रेक्षकांना भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेणू पारीख) आणि त्यांचे पुत्र भगवान गणेश (एकांश कथरोटिया) व भगवान कार्तिकेय (सुभान खान) यांच्या दिव्य जगात एका तल्लीन करणाऱ्या प्रवासावर घेऊन जाते. या मालिकेत पौराणिक कथा आणि भावनांचे सुंदर मिश्रण केलेले आढळते. तसेच या मालिकेत या दैवी कुटुंबातील नातेसंबंध, आव्हाने आणि शिकवण यांचा शोध घेतला आहे. श्रेणू यांनी पार्वतीचे सूक्ष्म चित्रण, शक्ती, कृपा आणि मातृत्वाचा उबदारपणा यांचे संतुलन साधले आहे, प्रेक्षकांनादेखील हे मोठ्या प्रमाणात आवडले आहे.

या मनमोकळ्या गप्पांमध्ये पार्वतीची भूमिका साकारणाऱ्या श्रेणू पारीख त्यांच्या भूमिकेतील प्रवासाबद्दल, त्यांच्या तयारीच्या प्रक्रियेबद्दल आणि दैवी आईच्या भूमिकेला आकार देणाऱ्या अनुभवांबद्दल बोलतात.

**देवी पार्वतीची भूमिका साकारण्यासाठी तुम्ही होकार का दिला?**

मला नेहमीच शक्ती, कृपा आणि भावनिकता एकत्र करणाऱ्या भूमिकांनी आकर्षित केले आहे. देवी पार्वती तर या सर्व गुणांना परिपूर्णपणे मूर्त रूप देतात. जेव्हा मला ही भूमिका ऑफर करण्यात आली तेव्हा मला उत्साह तर आलाच, पण जबाबदारीदेखील जाणवली. परम आदरणीय असलेल्या देवतेचे चित्रण करणे ही एक दुर्मिळ संधी आहे आणि मला याची पूर्ण जाणीव होती की, कलाकार म्हणून माझ्यासाठी हे आव्हानात्मक असेल. सुरुवातीला हा निर्णय घेणे सोपे नव्हते, परंतु पात्राची व्यापकता आणि मालिकेचा दृष्टिकोन समजून घेतल्यानंतर मला वाटले की, अशी भूमिका साकारणे मी चुकवू शकत नाही. आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर काढणारा हाच खरा विकास आहे आणि या भूमिकेने मला खरोखरच भावनिक, आध्यात्मिक आणि कलात्मकदृष्ट्या तसे करण्यास प्रवृत्त केले.

**गाथा शिव परिवार की - गणेश कार्तिकेय ही मालिका इतर पौराणिक मालिकांपेक्षा कशी वेगळी आहे?**

भव्यता आणि देखाव्यावर केंद्रित असलेल्या अनेक पौराणिक मालिकांच्या पलीकडे जाऊन ही मालिका देवत्व आणि संबंधित मानवी भावनांचे संतुलन साधते. ही मालिका कुटुंबातील प्रेम, संघर्ष आणि परस्परसंवादांवर प्रकाश टाकते, त्यामुळे दैवी पात्रेदेखील सहज आणि हृदयस्पर्शी वाटतात. यातील कथाकथन हे जीवनातील शिकवण आणि भावनिकता यावर भर देते, त्यांच्याशी प्रेक्षक जोडले जाऊ शकतात, त्यामुळे ते आजच्या टेलिव्हिजन लँडस्केपमध्ये वेगळे दिसते.

**देवी पार्वतीच्या भूमिकेसाठी तुम्ही कशी तयारी केली? त्यासाठी काही विशेष अभ्यास किंवा प्रशिक्षण आवश्यक होते का?**

देवी पार्वतीची तयारी ही एक तपशीलवार आणि तल्लीन करणारी प्रक्रिया होती. भूमिकेत ताजेपणा आणि मौलिकता आणण्यासाठी मी जाणूनबुजून दृश्य संदर्भांपासून दूर राहिले. त्याऐवजी ही कौटुंबिक आणि पौराणिक कथा समजून घेण्यासाठी मी शिव-शक्तीच्या कथांबद्दल विस्तृतपणे वाचन केले. आमच्याकडे अनेक कार्यशाळादेखील झाल्या, त्यामुळे मला या पात्राकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन तयार करण्यास मदत झाली. विशेषतः देवी पार्वतीचे विरह, आशा आणि दंडपाणीची निर्मिती हे अनुभव देणारे भाग आव्हानात्मक होते, त्यासाठी मला त्यांच्या भावना खोलवर आत्मसात कराव्या लागल्या. या दृश्यांवर काम करणे कठीण होते, त्यात मला प्रामाणिक आई आणि देवी या दोन्हीही बाजू दाखवायच्या होत्या.

**पार्वती ही प्रचंड शक्ती आणि कृपेची देवी आहे. वास्तविक जीवनात तुम्ही त्यांच्याशी कसे संबंधित आहात?**

मी देवी पार्वतीच्या शांतता आणि संयमाशी जोडलेली आहे. त्यांच्याप्रमाणेच माझाही आव्हानांना संयमाने तोंड देण्यावर आणि शक्ती व करुणेचे संतुलन साधण्यावर विश्वास आहे. सेटवर आणि दैनंदिन जीवनात मी त्यांच्या ज्ञान आणि प्रेमाने नेतृत्व करण्याच्या क्षमतेचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करते. आपल्याला दैवी परिस्थितींचा सामना करावा लागत नसला तरी त्यांच्या व्यक्तिरेखेचे सार हे संगोपन करणारे, ज्ञानी आणि बलवान असणारे असे आहे, तेच मी माझ्या स्वतःच्या आयुष्यात पुढे नेण्याचा प्रयत्न करते.

**या शोमध्ये सुंदर सेट्स आणि पोशाख आहेत. ते तुम्हाला पात्रामध्ये शिरण्यासाठी कसे मदत करतात?**

देवी पार्वतीच्या दिव्य जगात पाऊल ठेवण्यासाठी सेट्स आणि पोशाख महत्त्वाचे आहेत. देवी पार्वतीचा माझा लूक शूटिंगच्या एक महिना आधीपासून सुरू झाला होता, त्यामध्ये अनेक प्रकारे त्यांच्या सौंदर्यावर लक्ष केंद्रित करून पोशाख आणि दागिन्यांवर भर देण्यासाठी मेकअप केला गेला होता. जेव्हा मी पार्वतीचा पोशाख परिधान करते आणि सेटची भव्यता पाहते तेव्हा मला लगेचच त्यांची ऊर्जा आणि आभा मूर्त रूप देण्यास मदत करतात. दागिन्यांपासून ते पार्श्वभूमीपर्यंत प्रत्येक दृश्य घटक मला पडद्यावर नैसर्गिकरीत्या त्यांचा संयम आणि शक्ती व्यक्त करण्यास मदत करतो.

**पौराणिक शोमध्ये काम करण्यासाठी विशिष्ट प्रकारची देहबोली, संवाद सादरीकरण आणि भाव असणे आवश्यक असते. तुम्ही दररोज हे कसे करता?**

प्रत्येक दिवशी मी अधिकृतपणा सुनिश्चित करण्यासाठी विशिष्ट देहबोली, हावभाव आणि संवाद सादरीकरणाचा सराव करण्यासाठी प्रामाणिकपणे वेळ देते. सेटच्या बाहेरही मी देवी पार्वतीच्या स्वभावातील शांतता आणि देखणेपण राखण्याचा प्रयत्न करते. ही सततची सवय मला पात्रात सातत्य राखण्यास मदत करते आणि शूटिंगदरम्यान मला त्यांच्या व्यक्तिरेखेत पूर्णपणे एकरूप होण्यासाठी साह्यभूत ठरते.

**शूटिंगपूर्वी पात्रात शिरण्यासाठी तुम्ही काही विशेष प्रयत्न किंवा धार्मिक गोष्टी करता का?**

ध्यान आणि चिंतन हे माझे आवडते मार्ग आहेत. शूटिंगपूर्वी मी स्वतःवर लक्ष केंद्रित करते आणि देवी पार्वतीच्या भावना व मानसिकता काही मिनिटे डोळ्यांसमोर आणते. असे केल्याने मला त्यांच्या ऊर्जेशी जुळवून घेण्यास, भावनिक बारकाव्यांवर लक्ष केंद्रित करण्यास आणि पात्राच्या दैवी साराशी सुसंगत अस्सल अभिनय करण्यास मदत होते.

**मोहित मलिक, एकांश आणि सुभान यांच्यासोबतच्या तुमच्या ऑफ-स्क्रीन केमिस्ट्रीचे तुम्ही कसे वर्णन कराल? तुम्हाला ऑनस्क्रीन मदत करतील असे अनेक मजेदार क्षण तुम्ही सेटवर व्यतीत करता का?**

सेटवर आमचे वातावरण खूप प्रसन्न आणि मजेदार असते. आम्ही हसतो, कथा शेअर करतो आणि एकमेकांना पाठिंबा देतो, त्यामुळे एक सकारात्मक आणि आरामदायी वातावरण तयार होते. ते सौहार्द आमच्या ऑन-स्क्रीन नात्यात रूपांतरित होते, त्यामुळे कौटुंबिक नाते हे नैसर्गिक आणि मनापासून जाणवते. आम्ही ऑफ-स्क्रीन एकत्र व्यतीत केलेले क्षण आम्ही एकत्र सादर केलेल्या दृश्यांमध्ये खरोखरच आत्मीयता वाढवतात.

**प्रेक्षकांनी पाहावा यासाठी तुम्ही सर्वात जास्त उत्सुक आहात, असा एखादा सीन किंवा सिक्वेन्स आहे का?**

मी आतापर्यंत केलेला सर्वात हृदयस्पर्शी आणि तीव्र सीन म्हणजे दंडपाणीचा शिरच्छेद. त्या क्षणी पार्वतीचे आई म्हणून हृदयद्रावक चित्रण करणे हे अतिशय भावनिक होते, मला त्यांचे दुःख, असहायता आणि वेदना खरोखरच हे सारे अनुभवावे लागले, तसेच त्यांनी दैवी संयम राखला. हे अनेक कंगोरे असलेले एक दृश्य आहे, ते एकाच वेळी त्यांचे बिनशर्त प्रेम आणि शक्ती दर्शवते. मला विश्वास आहे की, प्रेक्षक त्यांच्या या भावनांशी खोलवर जोडले जातील, पार्वतीला देवी आणि काळजी घेणारी आई म्हणून पाहतील.

# सोनी सबवरील गणेश कार्तिकेय मालिकेत उलगडणार गणपतीच्या आवडत्या मोदकामागील गोड कहाणी



**मुंबई, २४ ऑक्टोबर :** सोनी सबची गाथा शिव परिवार की ही मालिका दैवी कथाकथनाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करत आहे. ही मालिका भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेणू पारीख), आणि त्यांचे पुत्र भगवान गणेश (एकांश कथरोटिया) व भगवान कार्तिकेय (सुभान खान) यांच्या असाधारण प्रवासाचा मागोवा आहे.

यातील हृदयस्पर्शी पौराणिक प्रसंग भगवान गणेशाच्या मोदकावरील प्रेमामागील गोड रहस्य उलगडतो. ही कथा पार्वती तिच्या एकदंत असलेल्या मुलाला संयमाचा धडा शिकवते. गोड अतिशय प्रिय असलेल्या गणेशाच्या लाडूत एकदा पार्वती जाणूनबुजून साखर टाकत नाही. यामुळे गणेश संतुलित राहतील, अशी पार्वतीला आशा वाटते. पार्वतीच्या या कृतीने गणेश निराश होतात व जेवणच सोडून देतात. गणेशाचे भाऊ भगवान कार्तिकेय यांना हे कळते तेव्हा ते याबाबत भगवान शिवाचा सल्ला घेतात. भगवान शिव त्यांना अत्री ऋषींची दयाळू पत्नी अनसूया यांच्याकडे जाण्याचा सल्ला देतात. अनसूया एका भव्य मेजवानीचे आयोजन करतात व मोदक हा एक नवीन गोड पदार्थ बनवतात. स्वादिष्ट आणि पौष्टिक मोदक हा विचारशीलता आणि संतुलनाचे प्रतीक आहे. भगवान गणेश या परिपूर्ण निर्मिती म्हणजे त्या मोदकाचा आस्वाद घेतात त्या क्षणी त्यांचे दुःख नाहीसे होते. मोदक लगेचच त्यांचे हृदय जिंकतो आणि सर्वात प्रिय बनतो. मोदक म्हणजे प्रेम आणि सजग काळजीचे एक कालातीत प्रतीक आहे.

भगवान गणेशाची भूमिका करणारा एकांश कथरोटिया म्हणाला, मला ही कहाणी शूट करायला खूप मजा आली. ही कहाणी गणेशाच्या कुटुंबात किती प्रेम आहे हे दर्शवते. पार्वती माता त्याला धडा शिकववण्यासाठी नव्हे, तर त्याची काळजी घेण्यासाठी मिठाई बनवणे थांबवते. जेव्हा अनसूया माता मोदक बनवते तेव्हा ते फक्त गणेशासाठी खूप प्रेमाने बनवलेले काही तरी विशेष बनते. म्हणूनच मोदक त्याचा आवडता बनतो, तो फक्त चविष्टच नाही, तर प्रेम आणि काळजीने परिपूर्ण असतो.

# फिटनेस आणि सजगता - सोनी सबवरील गणेश कार्तिकेय मधील भगवान शिवाचे पात्र जिवंत करण्यास कशी मदत करते याबद्दल मोहित मलिक यांचे भाष्य




**मुंबई, २४ ऑक्टोबर :** सोनी सबवरील गाथा शिव परिवार की या मालिकेतील गणेश कार्तिकेय यांनी आपल्या महाकाव्य कथाकथनाने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेणू पारीख), आणि त्यांचे पुत्र भगवान गणेश (एकांश कथरोटिया) व भगवान कार्तिकेय (सुभान खान) यांनी शिव परिवाराचा असाधारण प्रवास जिवंत केला आहे. या मालिकेत या दैवी कुटुंबातील भावना, नातेसंबंध आणि आव्हानांचा सुंदर रीतीने शोध घेण्यात आला आहे. भव्यता आणि पौराणिक कथांपलीकडे जाऊन कलाकारांचे कथेतील समर्पण आणि तयारी पात्रांमधील प्रामाणिकपणा आणि तयारी दर्शवते, त्यामुळे कथा वास्तविक आणि सुसंबद्ध वाटते.

भगवान शिवाची भूमिका साकारणाऱ्या मोहित मलिक यांच्यासाठी शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक शांतता यांच्यातील संतुलन राखणे हे त्यांच्या पात्रातील शांत, संयमी ऊर्जेचे मूर्त रूप धारण करण्यासाठी महत्त्वाचे आहे. नियमित व्यायाम आणि ध्यानधारणेपासून ते सजग आहार व स्वतःची काळजी घेण्यापर्यंत त्यांची शिस्तबद्ध जीवनशैली भगवान शिवाच्या शांती आणि शक्तीचे सार प्रतिबिंबित करते.

आपल्या दिनचर्येबद्दल बोलताना ते म्हणाले, तंदुरुस्ती आणि ध्यान मला भूमिकेशी केंद्रित ठेवते. मी जेव्हा भगवान शिवाच्या भूमिकेत पाऊल ठेवतो तेव्हा वरील दोन्हीही महत्त्वाचे असतात. मी शूटिंगला जाण्यापूर्वी आठवड्यातून पाच दिवस सराव करतो आणि त्याने माझ्या संपूर्ण दिवसाचा सूर सेट होतो. ज्या दिवशी मला व्यायाम करणे जमत नाही त्या दिवशी मला अस्वस्थ आणि सुस्त वाटते. ध्यान मला लक्ष केंद्रित करण्यास मदत करते आणि मी सेटवर तसेच प्रवास करताना अनेकदा त्याचा सराव करतो, तो वेळ शांत चिंतनाच्या क्षणात परिवर्तित होतो. यासोबतच मी दिवसातून चार संतुलित जेवणांसह योग्य आहाराचे पालन करतो, साखर आणि तळलेले अन्न टाळून प्रथिने आणि फायबरवर लक्ष केंद्रित करतो. योग आणि श्वासोच्छ्वासाचे व्यायामसुद्धा माझ्या तयारीचा एक मोठा भाग बनले आहेत, ते मला भगवान शिवाच्या मूर्त स्वरूपातील शांतता आणि संयम राखण्यास मदत करतात. भगवान शिवाची भूमिका साकारण्यासाठी शक्ती आणि शांतता दोन्ही आवश्यक आहेत. ही शिस्तबद्ध दिनचर्या मला वास्तवाचे भान राखून पात्राच्या ऊर्जेशी जोडलेली ठेवते. कधी कधी मी रात्री एक तास चालायला जातो, पॉडकास्ट ऐकतो किंवा एकांतात शांत वेळ घालवतो. हा माझा रिचार्ज करण्याचा आणि जागरूक राहण्याचा एक मार्ग आहे.

# शब्दकोडे क्रमांक २२४७



**आडवे शब्द :-**

१) नवरात्रीतील देवीचे एक नाव
४) उपकार करणारे
९) भडीमार
१२) आश्रयस्थान म्हणून स्वीकारलेला अरण्यवास
१४) प्रश्न
१६) कबूतर
१८) वर्षाच्या बोलीने नेमलेला शेतमजूर
२०) तेव्हा (ग्रा.)
२१) गवत
२२) गाणे
२४) पात्याची तीक्ष्णता
२६) तोटी
२८) माकडांना खेळविणारा
३१) वर्षानुवर्षे
३३) एक मोठे चर्मवाद्य
३५) पंख
३६) सोने
३८) *** गमत
४०) घन, घट्ट, गर्द
४१) शुष्कता, अतिशय रूक्षता
४३) बारा वर्षे
४४) संरक्षक भिंत
४५) खाळ
४७) दारावरील खुणेचा आवाज
४९) बोलणारा पक्षी
५०) ऋण
५१) च्या बरोबर
५३) ज्वारीची वाळलेली खुंटे
५४) गुलाम, सेवक
५६) ठाणवई
५७) च्या पेक्षा वरचढ
५८) नाशाचे मंत्रतंत्र
६१) आजच्या आधीचा दिवस
६२) मार्ग
६३) अस्वला
६४) तपासणीसाठी अचानक केलेला हल्ला
६५) पडदा
६६) कळलाव्या मुनी
६८) लिहिलेले वाचणे
६९) रात्र, रजनी
७०) बारा महिन्याचा काळ
७१) धोबी
७२) बटु, बुटका
७३) नजरेचा तीर

**उभे शब्द : -**

२) शरीर लटलटण्याचा आजार
३) पद्धत
५) फाशातील एक या संख्येचे चिन्ह
६) कर्णेंद्रिय
७) पाठवणी
८) सत्व
९) घरातील मोठी माणसे
१०) गोदाम
११) चंद्राची कड
१३) पातळ खांब
१५) सत्ता
१६) पर्ण
१७) बडबड्या
१९) दरवाजा
२३) अंधार
२५) सामान
२६) नाच, नृत्य
२७) घराचा मागचा दरवाजा
२९) धर्मार्थ देणे
३०) पराभव
३१) शर्करा
३२) समुद्रकिनारा
३४) सीतापती
३५) वेगाने, त्वरित
३६) कारस्थान
३७) गोष्ट
३९) वृक्ष
४०) नेहमी अशुभ भविष्य सांगणारा
४२) पलंग
४५) अनेकांची कर्जे असलेला
४६) पांगापांग, वाताहात
४८) तलवार
४९) छोटे कुबड
५०) बाजू, काठ
५२) बैलाच्या नाकातील दोरी
५३) सकस
५५) संतोष, आनंद
५७) मोठी उथळ वाटी
५९) रसपूर्ण
६०) विपत्तीची कहाणी
६१) जेवणातील पातळ तोंडी लावणे
६२) दिवस
६५) पडणे
६६) श्वसनेंद्रिय
६७) औषध
६९) अभिप्राय (हिं.)

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# उसनवारीच्या पैशावरून एकाची कुऱ्हाडीने हत्या

■ महासागर प्रतिनिधी
उमरखेड, दि. २४ :

उमरखेड उसनवारीचे दिलेले १५ हजार रुपये मागील वर्षभरापासून का देत नाही, असे म्हणत एकाने कुऱ्हाडीने वार करून ४५ वर्षीय इसमाला झोपेतच ठार केले. ही घटना तालुक्यातील आडद धनज गावातील शेत शिवारात घडली. मात्र या प्रकरणात कुणीही लवकर तक्रार दिली नाही. त्यामुळे अखेर पोलिसांनी सर्व अहवाल प्राप्त झाल्यानंतर तपासची चक्रे फिरवत अवघ्या काही तासात एकास अटक केली. देवराव म्यानबा वाळके (४५, रा. धनज) असे मृतकाचे नाव आहे. तर किसन सोनबा वाळके (४५,रा. धनज) असे आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी सविस्तर असे की, आडद



शेत शिवारात एक इसम संशयीतरित्या मृत पावलेल्या अवस्थेत आहे, अशी माहिती पोफाळी पोलिसांना मिळाली होती. त्यावरुन पथकाने घटनास्थळाची पाहाणी केली असता, एक व्यक्ती डोक्यावर कशाचा तरी मार लागुन ठार झालेल्या अवस्थेत दिसुन आला.

पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा व इन्वेस्ट पंचनामा करुन त्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रवाना केला. या प्रकरणात सुरूवातीस अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली. मात्र त्यानंतर फॉरन्सिक टीम, डॉगस्कॉड, फिंगर तज्ञ यवतमाळ यांना पाचारण करण्यात आले. त्यांच्याकडून खुनाचे सर्व पुरावे ताब्यात घेत संशयित आरोपी किसन सोनबा वाळके (४५, रा. धनज, ता. उमरखेड) याला ताब्यात घेतले. मृतकासोबत दारु पित बसलो असता देवराव याच्याकडे उसने दिलेल्या पैशाची मागणी केली त्याने नकार दिला. मी रागाच्या भरात बाजेवर झोपून असलेल्या देवराव वाळके यांच्यावर सोबत नेलेल्या कुऱ्हाडीच्या तुंब्याने दोन वेळा डोक्यावर मारुन खून केला. त्याच्या या कबुलीवरुन पोलिसांनी गुन्हा दाखल करुन अटक केली.

## नगर वाचनालयात ग्रंथ प्रदर्शन, वाचन सप्ताह

■ महासागर प्रतिनिधी
वणी , दि. २४ :

वाचन प्रेरणा दिनानिमित्त नगर वाचनालयात नवीन ग्रंथ खरेदी केलेल्या ग्रंथांचे प्रदर्शन व युवकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी दि. १५ ऑक्टोबरला वाचन सप्ताह घेण्यात आला. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन मेघराज भंडारी यांनी केले. या प्रसंगी वाचनालयाचे उपाध्यक्ष विशाल झाडे, सचिव गजानन कासावार, संचालक हरिहर भागवत उपस्थित होते. या प्रसंगी मेघराज भंडारी यांनी डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. नगर वाचनालयात दरवर्षी वृत्तपत्र, मासिके व ग्रंथ खरेदी मोठ्या प्रमाणावर करण्यात येते. त्याचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्षीय भाषणात विशाल झाडे



यांनी केले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त दि. १२ ते १९ ऑक्टोबर दरम्यान दररोज १ तास वाचन हा उपक्रम राबवण्यात आला.

यात २५ महाविद्यालयातील युवक सहभागी झाले. दरम्यान विविध पुस्तकांचे वाचन केले.या उपक्रमामुळे वाचनाची आवड निर्माण करण्याचा वाचनालयाचा उद्देश साध्य होईल, असा विश्वास सचिव गजानन कासावार यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हरिहर भागवत यांनी केले. या कार्यक्रमासाठी देवेंद्र भाजीपाले, प्रमोद लोणारे, राम मेंगावार, कल्पना राठोड यांनी पुढाकार घेतला.

# धम्मसंस्कार स्वीकारण्याची आज तरुण पिढीला गरज : भंते धम्मवीर सारनाथ



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २४ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीक्षाभूमीवर मानव कल्याणार्थ प्रियदर्शनी सम्राट अशोक यांच्या विजयादशमी दिनी जी जबाबदारी आपल्यावर टाकली. आणि बुद्धाचा धम्म माणसासाठी दिला, त्या प्रेरणेतून धम्मसंस्कार स्वीकारण्याची आज नवीन तरुण पिढीला गरज आहे, असे प्रतिपादन भंते धर्मवीर सारनाथ यांनी केले. तिवसा येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने आयोजित धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाचे जाहीर धम्म प्रवचन कार्यक्रम प्रसंगी बोलताना केले.

या वेळी प्रमुख पाहुणे सविता खाकसे, सारिका शिंदे मुंबई, नगरसेविका सीमा खाकसे, ममता घरडे, नंदा यावले, वैशाली खाकसे आदींनी धम्म प्रवचनात मार्गदर्शन केले. भंते धम्मवीर म्हणाले, की 'धम्म' हा शब्द पारंपरिक अर्थाने धर्म नसून तो मानसशास्त्र, तर्कशास्त्र आणि नीतिमूल्यांचा समन्वय असलेली जीवन पद्धती आहे. माणसाला विज्ञाननिष्ठ, विवेकवादी, विचारशील बनवणे हे बौद्ध धम्माचे परम उद्दिष्ट आहे. सनातन परंपरा, रूढी-अंधश्रद्धा व मानवी गुलामगिरी याविरुद्धची तत्त्वेच बुद्धांच्या शिकवणुकीचा मूळ गाभा आहे. प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री त्याचे स्तंभ आहेत. नीती ही बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे. राष्ट्र ही एकत्वाची भावना आहे. जाती-पोटजातीत विभागलेला मानव समाज राष्ट्र म्हणून आकारला येऊ शकत नाही. समतेवर आधारित समाज रचना राष्ट्रीय एकात्मतेची पूर्व अट आहे. यास्तव बौद्ध धम्माची शिकवण जनतेत रुजवणे काळाची गरज आहे, असेही ते म्हणाले. तसेच या वेळी महामंगल सूत्रामध्ये आठ मंगल गाथा त्याच आचरण करण्यात यावे, अशा विविध तथागत गौतम बुद्ध, सम्राट अशोक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या विविध पैलूंवर धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने धम्म प्रवचन करण्यात आले. आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष पद्माकर खाकसे यांनी केले. सूत्रसंचालन देवदत्त कोंडे यांनी केले, तर आभार भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष सारंग पाटील यांनी केले. कार्यक्रमासाठी सारंग पाटील, राजीव बसवनाथे, सतीश यावले, राजेंद्र गडलिंग, दीपक मेश्राम, पुरुषोत्तम मकेश्वर आदींनी सहकार्य केले. भंते धम्मचारी यांनी बुद्धाचा धम्म हा माणसासाठी आहे. माणसाने माणसाप्रमाणे वागणे, हा धर्म असला पाहिजे, तो समता, स्वातंत्र्य, बंधुत्व स्वीकारते. तसेच बुद्धधम्म करुणा, मैत्रीचा धागा आहे. प्रज्ञाबरोबर शीलाची देखील आवश्यकता आहे. बुद्ध धम्म तत्त्वज्ञान हे गौतम बुद्धांनी शिकवलेल्या जीवन जगण्याच्या विचारधारेवर आधारित आहे. यात प्रज्ञा, शील आणि करुणेच्या त्रिसूत्रीवर जोर दिला आहे. हे तत्त्वज्ञान दुःखातून मुक्ती मिळवणे, निर्वाण प्राप्त करणे आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वावर आधारित समाज निर्माण करणे यावर केंद्रित आहे, असे ते म्हणाले.

## पूर्णा नदीच्यापात्रात सापडला बेपत्ता तरुणाचा मृतदेह

हिंगोली , दि. २४ :

परभणी जिल्हयातील डिग्रस येथून मागील एक महिन्यापासून बेपत्ता असलेल्या तरुणाचा मृतदेह सेनगाव तालुक्यातील चिंचखेडा शिवारात पूर्णा नदीच्या पात्रात आढळून आला आहे. त्याच्या अंगावरील बनीयन वरून त्याची ओळख पटली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेनगाव तालुक्यातील चिंचखेडा शिवारात पूर्णा नदीच्या पात्रात एक मृतदेह असल्याची माहिती सेनगाव पोलिसांना मिळाली होती.

त्यावरून सेनगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक मस्के, जमादार सुभाष चव्हाण, टी. के. वंजारे, एकनाथ राठोड यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता सदर मृतदेह कुजलेल्या अवस्थेत दिसून आला.

पोलिसांनी परिसरातील बेपत्ता व्यक्तीची माहिती घेतली. मृतदेहाच्या अंगावरील बनीयनवर लिहीलेल्या अक्षरांवरून पोलिसांनी माहिती घेतली असता, परभणी जिल्हयातील डिग्रस येथील सुरज अंभोरे (२०) हा तरुण बेपत्ता असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

यावरून पोलिसांनी त्याच्या कुटुंबियांशी संपर्क साधला असता त्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली असता सदर मृतदेह सुरज याचा असल्याचे स्पष्ट झाले. तो मित्रांसोबत एक महिन्यापुर्वी येलदरी धरण येथे आला होता.

# अधिकारी अनब कर्मचाऱ्यांनी साजरी केली आत्महत्याग्रस्त कुटुंबांसोबत दिवाळी

■ महासागर प्रतिनिधी,
महागाव, दि. २४ :

यवतमाळ जिल्हा प्रशासनाच्या 'उभारी' योजनेअंतर्गत आत्महत्या केलेल्या कुटुंबांना मानसिक आधार देण्यासाठी आणि त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी महागाव महसूल विभागाने एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला. महागाव येथील मंडळ अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी यांनी दगडथर येथील आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांसोबत दिवाळी साजरी करून प्रशासनाचे संवेदनशील रूप दाखवून दिले.

यवतमाळ जिल्ह्यात शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना आधार देण्यासाठी आणि नागरिकांचे मनोबल उंचावण्यासाठी प्रशासनाकडून 'उभारी' योजनेअंतर्गत विविध विभागांच्या योजनांची माहिती देण्यासाठी शिबिरे आयोजित केली जात आहेत. या योजनेसाठी महागाव तालुक्यातील दगडथर, सेनंद, बेलदरी, बोथा आणि शिरपूर या पाच गावांची निवड करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर, दगडथर येथे दि. ३०



सप्टेंबर रोजी प्रशासनाकडून एक विशेष शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात विविध शासकीय विभागांनी त्यांच्या योजनांची माहिती ग्रामस्थांना दिली. या कार्यक्रमांच्या मालिकेत, महागाव महसूल विभागातील मंडळ अधिकारी राम पंडित, दगडथरच्या ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) नीता मनवर यांनी एक हृदयस्पर्शी उपक्रम राबवला. त्यांनी दगडथर येथील आत्महत्या केलेले शेतकरी संजय लक्ष्मण बेडारे आणि नीलेश विजय जाधव यांच्या कुटुंबातील सदस्यांसोबत दिवाळी साजरी केली.

या वेळी गावच्या सरपंच मथुरा चव्हाण, गोकुळ चव्हाण, माजी सरपंच देविदास बुरकुले, रामेश्वर राठोड, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील सदस्या ममता नीलेश जाधव व रेणुका संजय बेडारे यांची उपस्थिती होती. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दाखवलेल्या या संवेदनशीलतेमुळे 'उभारी' योजनेचा उद्देश यशस्वी होताना दिसत आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना समाजाने, प्रशासनाने पाठिंबा दिल्यास ते आयुष्यात पुन्हा आत्मविश्वासाने उभे राहू शकतात, हा संदेश यानिमित्ताने देण्यात आला. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दोन्ही कुटुंबातील सदस्यांना दिवाळीनिमित्त नवे कपडे, धान्य, मिठाई, फटाके भेट दिले. प्रशासकीय अधिकारी थेट कुटुंबाच्या आनंदात सहभागी झाल्याने या कुटुंबांना मानसिक आधार मिळाला. मनोबल उंचावण्यासाठी मदत झाली.

## वाळूतस्कारांनी केला एकाचा खून



कळंब : जिल्ह्यात सध्या सर्वत्र रेतीतस्करांनी हैदोस घातला असतानाच रेतीच्या ट्रॅक्टरची माहिती तहसीलदाराला का देतो, मी तयार केलेल्या रस्त्यावरुन तुझ्या वाहनांची वाहतूक का करतो, असे म्हणत रेतीच्या वादातून एकाचा निर्घुन खून करण्यात आला. दरम्यान चाकुने भोकल्याने जखमी अवस्थेत खाली पडलेल्या मृताच्या अंगावर मारेकऱ्यांनी चक्क बुलेट चढवत पळ काढला. कळंब तालुक्यातील वर्धा नदीच्या काठावर चिंचोलीजवळ असलेल्या एका रेस्टॉरेंटवर घडली.रवींद्र अशोक पारिसे (४०, रा. अंदोरी, तालुका देवळी, जिल्हा वर्धा) असे खून झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृतक रविंद्र हा देखील रेतीतस्करी करीत होता. आरोपी रोहन देशमुख (३०, रा.आंजी) पंकज राजू जवडे (२८), सुनील तेलरांधे (३५), तुषार गघादाटे उर्फ बाटा (२८), योगेश बोटफफोडे (२२, रा. देवळी, जिल्हा वर्धा) यांच्याशी झालेल्या वादातून हा खून झाला.

# छठपर्वाच्या गर्दी नियंत्रणाकरिता रेल्वे स्थानकावर विशेष लक्ष

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २४ :

मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील रेल्वे कर्मयोगी दिवाळी आणि छठपर्वाच्या काळात प्रवाशांना सुरक्षित, सुलभ आणि आरामदायी प्रवास अनुभव देण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. या सणांच्या काळात २८ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मोठ्या प्रमाणात प्रवासी गर्दी राहण्याची शक्यता असल्याने भुसावळ विभागाने भुसावळ, मनमाड, नाशिक रोड, खंडवा आणि अकोला या प्रमुख स्थानकांवर गर्दी नियंत्रणासाठी सर्व आवश्यक तयारी केली आहे. तिकीट तपासणी अधिक कठोर होणार होणार असून, अतिरिक्त आरपीएफ आणि वाणिज्य कर्मचारी तैनात राहणार आहेत. छठपर्वाच्या पृष्ठभूमीवर बिहारसह अन्य ठिकाणी जाण्यासाठी रेल्वे स्थानकांवर गर्दी होत आहे. विभागाकडून



उपाययोजना करण्यात येत आहे. मुंबई -नागपूर दरम्यान विशेष ट्रेन गाड्यांमधील तिकीट तपासणी अधिक कठोर केली स्थिनकांवर अतिरिक्त आरपीएफ आणि वाणिज्य कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. सीसीटीव्हीद्वारे २४ तास देखरेख केली जात आहे. निशिक रोड आणि मनमाड स्थानकांवर प्लॅटफफॉर्म तिकिटांची विक्री तात्पुरती स्थगित करण्यात आली विॉर रूम २४ तास कार्यरत असून, विभागीय अधिकारी व कर्मचाऱ्यांशी सतत संपर्कात आहे. आपत्कालीन परिस्थितींसाठी स्थानकनिहाय जबाबदार अधिकारी नेमण्यात आले आहेत. निाशिक येथे होल्डिंग क्षेत्रामध्ये प्रकाश, पिण्याचे पाणी इत्यादी सर्व सुविधा सुनिश्चित करण्यात आल्या रिल्वे कर्मचाऱ्यांना हे सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत, की गाड्या केवळ नियुक्त प्लॅटफफॉर्मवरच घेतल्या जातील. महत्वाच्या ठिकाणी असे आहेत थांबे अतिरिक्त विशेष गाड्या दादर, ठाणे, कल्याण, नासिक रोड, मनमाड, जलगांव, भुसावल, मलकापूर, शेगाव, अकोला, मुर्तिजापूर, बडनेरा, धामनगाव आणि वर्धा येथे थांबणार आहे.

गाड्यामध्ये २० तृतीय वातानुकूलित व्हॅन आहेत. ट्रिन क्र. ०१००५ विशेष मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून २५ ऑक्टोबर रोजी ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी १५.३० वाजता पोहोचेल. ट्रिन क्र. ०१००६ विशेष नागपूर येथून २५ ऑक्टोबर रोजी १८.१० वाजता सुटेल आणि मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी ०८.२५ वाजता पोहोचणार आहे. मिध्य रेल्वेवरील एकूण १९९८ (अप आणि डाउन) विशेष गाड्यांपैकी १४६४ गाड्या भुसावळ विभागातून धावत आहेत. गिाड्या नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, खंडवा, अकोला आणि बडनेरा इत्यादी प्रमुख स्थानकांवर थांबतात. आिजापर्यंत भुसावळ विभागातून ५४४ (२७२ अप आणि २७२ डाउन) विशेष गाड्या चालवल्या गेल्या आहेत. सण विशेष गाड्यांची व्यवस्था अिमरावती-पुणे-अमरावती (गाडी क्रमांक ०१४०४/०१४०५) ही एक विशेष गाडी २६ नोव्हेंबरपर्यंत आठ ट्रिपसाठी (दर बुधवार) चालवण्यात येत आहे. भिुसावळ विभागातून एकूण १४६४ विशेष सेवा (अप आणि डाऊन प्रत्येकी ७३२) चालवल्या जात आहेत.

# सोयाबीन फेकून शासनाचा तीव्र निषेध
## नांदगावला किसान सभेचे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी,
नांदगाव खंड, दि. २४ :

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने गावा -गावात चौका -चौकातशासनाचा निषेध व्यक्त करण्यासाठी सोयाबीन फेको आंदोलनाची राज्यव्यापी हाक दिली. त्याचाच एक भाग म्हणून नांदगाव खंडेश्वर शहरातील मुंगसाजी चौकात किसान सभेच्या वतीने शेतकऱ्यांनी आणलेले सोयाबीन जमिनीवर फेकून राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाचा निषेध केला. राज्यासह जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या अडचणीत आला आहे. यंदा नैसर्गिक आपत्तीने शेतकरी हवालदिल झाला आहे.

त्यामध्ये शासनाचे झालेले दुर्लक्ष यामुळेही शेतकरी संकटात सापडला आहे. शासनाने शेत पिकांची नुकसान भरपाई अजूनही दिली नाही. शासनाच्या या उदासीन धोरणाचा विरुद्ध शेतकऱ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे.

या वेळी किसान सभेचे जिल्हा सचिव शाम शिंदे, माजी युवासेना



नेते प्रकाश मारोटकर, काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष अक्षय पारसकर, तालुका अध्यक्ष, दिलीप महल्ले, वईद खा पठाण, शत्रुघ्न मगर, मोहसीन शेख, राजीक शेख, बापूजी सुने, ज्ञानेश्वर शिंदे, दिनेश बावणे, किशोर मसराम, सूरज लोमटे, राजेंद्र राऊत, दीपक अंबाडरे, चैतन्य साळवन, गणेश बरगट यांचे सह आदी शेतकरी बांधव उपस्थित होते. तसेच या वेळी इडा पिळा टळू दे, बळीचे राज्य येऊ दे, या घोषणा देवून शेतकऱ्यांचा राजा सम्राट बळीराजाचा गौरव दिन साजरा करण्यात आला.

खरेदी केंद्र सुरू न झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. यामुळे सरकारने ही केंद्र लवकर सुरू करावी, अशी मागणीही यादरम्यान करण्यात आली.

तोटा सहन करावा लागल्याने अडचणीत सरकारने हमीभावाने सोयाबीन ५३२८ रुपये व कापूस ८१०० रुपये क्विंटल दराने, शासकीय खरेदी केंद्र सुरू करावेत, यासाठी सोयाबीन फेकून आंदोलन करण्यात आले.

शासनाने सरकारी सोयाबीन खरेदी केंद्र सुरू न केल्यामुळे सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना एकरी १०००० ते १२ हजार एकरी तोटा सहन करावा लागत आहे. फडणवीस सरकारची भूमिका शेतकरी विरोधी असून त्यांचा गगनभेदी घोषणाबाजी करत धिक्कार करण्यात आला.

# शालेय जिल्हास्तरीय कराटे क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांना चार सुवर्ण पदक



■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा, दि. २४ :

बुलडाणा क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त सहकार्याने शुक्रवारी १७ ऑक्टोबरला झालेल्या शालेय जिल्हास्तर कराटे क्रीडा स्पर्धेत रुखाई कन्या शाळेत चालणाऱ्या मार्शल आर्ट प्रशिक्षण वर्गातील विद्यार्थिनी अक्षरा पडोळ, वेदांत सोनुने, हर्षल वडवणकर, ओम एकडे यांनी आपआपल्या वय व वजनगटात सुवर्ण पदक प्राप्त केले. त्यांची विभागीय शालेय कराटे स्पर्धेकरीता निवड झाली आहे. तर मृन्मयी आसोलकर, अनुराधा बावस्कर यांनी द्वितीय क्रमांक तर रोशनी पवार हिने तृतीय स्थान मिळवले. वरील विद्यार्थी अनुक्रमे सहकार विद्यामंदीर, भारत विद्यालय, प्रबोधन विद्यालयाचे आहेत. विद्यार्थ्यांचे धर्मवीर मार्शल आर्ट स्पोर्ट कराटे असोसिएशनचे अध्यक्ष आ. संजय गायकवाड, भय्या गायकवाड ,ॲड दीपक पाटील, डॉ. आरती पाटील, व्ही. टी. काका देशमुख व सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शारीरीक शिक्षकांनी कौतुक केले असून, विद्यार्थी यशाचे श्रेय आई वडील व धर्मवीर मार्शल आर्टचे प्रशिक्षक अरविंद अंबुसकर यांना देतात. जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेतील यशस्वी खेळाडू.

# अवैध सावकारांकडील ७४ हेक्टर शेतजमीन शेतकऱ्यांना परत

**बुलढाणा :** महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील कलमांनुसार जिल्ह्यातील ६९ प्रकरणातील अवैध सावकारांकडील ७४.२७ हेक्टर आर शेतजमिन शेतकऱ्यांना परत करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा उपनिबंधक डॉ. महेंद्र चव्हाण यांनी दिली आहे. बुलढाणा जिल्ह्यात अवैध सावकारांकडून होत असलेली पिळवणूक रोखण्यासाठी प्रशासनाकडून कडक कारवाई सुरू असून शेतकऱ्यांनी निर्भयपणे तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले आहे. सावकारी पाशात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी हडपणाऱ्या टोळ्या सक्रिय, चिखलीत गल्लीबाजार तेजीत, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अवैध सावकारांना बळ या मथळ्याखाली बातमी प्रसिद्ध झाली होती. या बातमीचे खंडन करत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने स्पष्ट केले की, अवैध सावकारी तक्रारींची दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही नियमितपणे करण्यात येते. शासन निर्णयानुसार, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत जिल्हा पोलिस अधीक्षक सदस्य असून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था हे सदस्य सचिव आहेत. हा अधिनियम अंमलात आल्यापासून आतापर्यंत कलम १६ अंतर्गत ७७८ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६५१ प्रकरणांची चौकशी पूर्ण करण्यात आली आहे. तसेच कलम १८(२) अंतर्गत ४०१ तक्रारी प्राप्त झालेल्या असून २७० तक्रारी निकाली काढल्या गेल्या आहेत, तर १३१ प्रकरणे प्रलंबित आहेत.

**महसूल व वनविभाग कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१)
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५
क.स.म.अ./तह.नाग/(शहर)/कावि-१५९८/२०२५ दिनांक : ०८/१०/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार., २. मा.उप. सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-ख अ.दि. १७/०३/२०२५, ३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी- १/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५, ४. संगीता दुर्योधन वासनिक, रा. कौसल्यानगर, नागपूर यांचा अर्ज दिनांक १२/०८/२०२५

-: जाहीरनामा :-

ज्याअर्थी अर्जदार संगीता दुर्योधन वासनिक, रा. कौसल्यानगर, नागपूर यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू शुभम दुर्योधन वासनिक यांचा जन्म दिनांक १५/०७/१९९९ रोजी मेडिकल हॉस्पिटल, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याच प्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्माबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यासा त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वतः जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

**Change Of Name**

MY PASSPORT NO. M6419764 IS MY INCORRECT NAME WAS **FARHAN KHAN.** NOW NEW CORRECT NAME IS **FARHAN KHAN ABDUL GAFFAR KHAN.** **ADD :** 427, BHUTIYA DARWAJA DASARA ROAD, MAHAL, NAGPUR 440032 MS.

I **NASREEN BEGUM MOHD SHAFIODDIN FAROOQUEI** DECLERED THAT MY SON PASSPORT NO. Y2801013 IS MY INCORRECT NAME WAS **NASRIN BEGUM MOHMMAD SHAFIOUDDIN FAROOQUEI.** NOW NEW CORRECT NAME IS **NASREEN BEGUM MOHD SHAFIODDIN FAROOQUEI.** **ADD :** RAJ MOHAMMAD DARGAH ROAD, UDGIR, DISTT. LATUR 413517 MS.

MY OLD NAME WAS **SUMERANAJ HABIBUL RAHEMAN.** NOW MY NEW NAME IS **SHEIKH AASHIFA.** **ADD :** HAKIM PALA, NARKHED, NAGPUR.

MY OLD NAME WAS **SHIREEN TABASSUM.** NOW MY NEW NAME IS **SHIREEN TABASSUM SHEIKH.** **ADD :** EKTAA NAGAR, AKURDI, PUNE.

MY OLD NAME WAS **SAHIB KHAN.** NOW MY NEW NAME IS **SAHEBKHAN ABDUL HANIF PATHAN.** **ADD :** BANGALI PANJA NEAR IQBALBHAI TINWALE HOUSE NAGPUR 440002.

MY OLD NAME WAS **SHABEENA PARVEEN ANWAZ AHEMAD.** NOW MY NEW NAME IS **SHABEENA SAJIDKHAN PATHAN .** **ADD :** WARD NO.15 AT POST MUL CHANDRAPUR 441224

I **TULSHIRAM DESAI HEREBY** DECLARE THAT IN MY SON'S **(NISHANT DESAI)** EDUCATION DOCUMENTS MY NAME WAS WRONGLY MENTIONED AS **TULSHIRAMSINGH DESAI** BUT MY NEW NAME IS **TULSHIRAM DESAI** AS PER MY DOCUMENTS. **ADD :** HANUMAN MANDIR, AMGAON, KIDANGIPAR, GONDIA 441902

RNINO-20789/71 Mahasagar Nagpur
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Tekdi Road, Sitabuldi, Nagpur.
**Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak.
**Main office phone numbers:** 7447735851/9922970023/7447735853.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक २०७८९/१९७१ महासागर नागपूर
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, टेकडी रोड, सिताबर्डी, नागपूर, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**फोन : ७४४७७३५८५१, ७४४७७३५८५३**



# बालांगण

## पियानो

**ओळख वाद्यांची**

पियानोचा शोध इटलीतीलबार्टोलोमिओ किं स्टोफोरीयांनी अठराव्या शतकात लावला. पियानोचा गोड, गंभीर आणि भावपूर्ण आवाज विविध प्रकारच्या संगीतात–शास्त्रीय, जॅझ, पॉप, चित्रपटसंगीतात मोठ्या प्रमाणावर वापरला जातो.पियानोमध्ये साधारणतः८८ कीजअसतात. ५२ पांढऱ्या आणि३६ काळ्या. आत लोखंडी फें म असते. त्यावर स्टीलच्या ताराओढलेल्या असतात. की दाबल्यावर हातोड्यासारखे हॅमर तारांवर आपटले जाते आणि त्यामुळे आवाज निर्माण होतो. कीजवर हलके दाबले तर मृदू स्वर आणि जोरात दाबले तर तीव' स्वर मिळतो.



पियानो दोन्ही हातांनी वाजवला जातो. उजव्या हाताने प्रामु'याने धून वाजवली जाते.तर डाव्या हाताने साथसंगत दिली जाते. यात असलेल्या'पेडल्स' मुळे स्वर लांबवता किंवा मृदू करता येतात. बिथोवेन, मोझार्ट यांच्यासार'या अनेक महान संगीतकारांनी पियानोवर अप्रतिम रचना केल्या आहेत. आजही पियानो स्टेज शो, चर्च संगीत, चित्रपटसंगीत आणि पाश्चात्त्य संगीतासाठी आवश्यक आहे. ग्रॅंड पियानो म्हणजे सर्वात मोठा आणि पारंपरिक पियानो.याच्यातारा आडव्या पसरलेल्या असतात.कॉन्सर्ट हॉलमध्ये याचा जास्त वापर होतो.अपराइट पियानोलहान आकाराचा आणि उभा असतो. घरगुती वापर, शाळा किंवा सरावासाठी वापरला जातो. याला जागा लागते. याची किंमतही तुलनेने कमी असते.डिजिटल पियानो हा इलेक्ट्रॉनिक पियानो आहे.याचाआवाज सॉफ्टवेअर आणि स्पीकर्समधून येतो.हा वजनाने हलका आणि पोर्टेबल असतो. वेगवेगळे इफेक्ट्स देऊ शकतो. पियानो आजही अत्यंत लोकप्रिय वाद्य आहे.

## देशोदेशीचे झेंडे

**फन टाईम**



छोट्यांनो, प्रत्येक देशाचा झेंडा असतो. आपल्याला आपल्या तिरंग्याचा खूप अभिमान वाटतो. या तिरंग्यातही बरेच अर्थ दडले आहेत. प्रत्येक देशाच्या झेंड्याची रचना वेगळी, त्यातले रंग वेगळे... प्रत्येक देशाचा झेंडा विचारपूर्वक तयार करण्यात आला आहे. देशोदेशीच्या झेंड्यांविषयी...



- अमेरिकेच्या झेंड्यावर ५० चांदण्या आणि १३ आडव्या पट्ट्या आहेत. यातल्या ५० चांदण्या म्हणजे अमेरिकेतली ५० राज्यं. सध्याचा अमेरिकेचा झेंडा १९६० मध्ये अस्तित्वात आला.
- ब्रिटन म्हणजे युनायटेड किंग्डमच्या झेंड्याला युनियन जॅक असं म्हटलं जातं. १८०१ मध्ये हा युनियन जॅक अस्तित्वात आला. युनियन जॅकमध्ये तीन वेगवेगळे झेंडे आहेत. हा युनियन जॅक इंग्लंड, स्कॉटलंड आणि आयर्लंड या तीन देशांच्या झेंड्यांचं मिश्रण आहे.
- आपल्या भारताचा तिरंगा २२ जुलै १९४७ मध्ये अस्तित्वात आला. आपल्या तिरंग्यात केशरी, पांढरा आणि हिरवा असे तीन रंग आहेत. मध्यभागी अशोकचक्र आहे. केशरी हा त्यागाचा, पांढरा शांततेचा तर हिरवा समृद्धीचा रंग आहे.
- कॅनडाच्या झेंड्याच्या मध्यभागी एक पान पहायला मिळतं. या पानाला मॅपल लीफ असं म्हटलं जातं. या मॅपल लीफला अकरा टोकं आहेत. हे मॅपल लीफ कॅनडाचं राष्ट्रीय प्रतीक आहे. १९६५ मध्ये कॅनडाचा हा झेंडा अस्तित्वात आला.
- बांगलादेशचा झेंडा १९७२ मध्ये अस्तित्वात आला. हिरव्या रंगाच्या या झेंड्याच्या मध्यभागी लाल रंगाचा गोल आहे. बांगलादेशमधल्या हिरवाईचं प्रतीक म्हणून या झेंड्याचा रंग हिरवा आहे तर त्याच्या मध्यभागी असणारं लाल वर्तुळ बंगालमधल्या उगवत्या सूर्याचं तसंच बांगलादेशच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या वीरांच्या त्यागाचं प्रतीक आहे.

## कॉकेशस पर्वतरांगा

**पर्वत शिखरे**

कॉकेशस पर्वतरांग युरेशियामध्ये आहे. याचे स्थान काळा समुद्र आणि कॅस्पियन समुद्र यांच्यामध्ये आहे. या पर्वतरांगेचे दोन भाग आहेत. मोठाकॉकेशस आणि लहान कॉकेशस. मोठ्या कॉकेशसमध्ये खूप उंच शिखरे आहेत. युरोपातील सर्वात उंच शिखर 'माउंट एल्ब्'स' याच रांगेत आहे. त्याची उंची सुमारे ५६४२ मीटर आहे. लहान कॉकेशस ही रांग थोडीशी कमी उंचीची आहे. कॉकेशस पर्वतरांग म्हणजे युरोप आणि आशिया यांचा सांधाजोड मानला जातो. त्यामुळे अनेक संस्कृती, जमाती आणि परंपरा येथे आढळतात. या प्रदेशात जॉर्जिया, आर्मेनिया, अझरबैजान आणि रशियाचा काही भाग यांचा समावेश होतो. पर्वतरांग असल्यामुळे हवामानात विविधता आढळते. उंच ठिकाणी बर्फ आणि हिमनद्या आहेत. तर दऱ्याखोऱ्यांमध्ये सुपीक जमीन असून शेती केली जाते.



या पर्वतरांगेतूनटेरेक, कुबान, कुरो आणि अरास यासार'या अनेक महत्त्वाच्या नद्या उगम पावतात. ही पर्वतरांग समृद्ध जैवविविधतेसाठीही प्रसिद्ध आहे. येथे अस्वल, बिबट्या, लांडगे यांसारखे हिंस्र प्राणी आणि अनेक दुर्मिळ पक्षी आढळतात.कॉकेशस पर्वतरांगेला ऐतिहासिक दृष्ट्या मोठे स्थान आहे. येथे अनेक साम'ाज्यांनी सत्ता गाजवली. प्राचीन काळी व्यापार, संस्कृती आणि विचारांची देवाणघेवाण या मार्गाने होत होती.उंच डोंगर, बर्फाच्छादित शिखरे, दऱ्या आणि नद्या हे सर्व पर्यटकांना आकर्षित करतात. तसेच स्कीईंग, पर्वतारोहण यांसारखे खेळ येथे होतात. येथे राहणाऱ्या लोकांची भाषा, संगीत आणि परंपरा वेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यामुळे कॉकेशस पर्वतरांग केवळ भौगोलिक दृष्ट्या नाही तर सांस्कृतिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

## समुद्रातील रहस्यपूर्ण प्रवासी

**जपानी लोककथा**

जपानमधल्या ओसामु गावात तारो नावाचा एक कोळीराहत होता. एक दिवस समुद्रकिनारी त्याच्या जाळ्यात त्याला एक सोनेरी मासा आला. 'मला कृपा करून सोड. मी तुला भरपूर धनसंपती देईन.' सोनेरी मासा म्हणाला. तारोला त्या पैशांचा लोभ सुटला. तो माशाच्या शेपटीला पकडून खोल समुद्रात गेला. त्याला समुद्राच्या खाली पाण्याखाली एक सुंदर राजमहाल दिसला. काही क्षणातच सोनेरी माशाने आपले रूप बदलले. ' मी समुद्राचा राजा आहे. माझे नाव ओटोमाईन. माझ्या राज्यात तुझे स्वागत आहे.'तो म्हणाला. त्याने तारोला आपल्या राजमहालात ठेवून घेतले. काही दिवस गेल्यावर तारो घरी निघाला तेव्हा त्याने त्याला भरपूर धनसंपत्ती दिली. रत्ने, दागदागिने, मोती दिले. तारो समुद्राच्या पाण्यातून वर आला आणि घरी गेला. पण



सगळेच बदलले होते. ना त्याचे घर ना त्याची बायको, मुले, मित्र त्याला तिथे कुणीच भेटले नाही. तारोच्या ओळखीचे कुठेही काहीही नव्हते. निराश होऊन तारो गावातल्या बुद्धमंदिरात येऊन बसला. 'तू तारो आहेस ना ?' मान थरथरत असलेल्या एका म्हाताऱ्याने त्याला विचारले. त्याचे सगळे शरीर अगदी जर्जर झाले होते. 'तू इतकी वर्षे कुठे होतास तरी कुठे?' मी सोनेरी माशाबरोबर त्याच्या राज्यात गेलो होतो. त्याने मला भरपूर धन दिले आहे.' तारो म्हणाला. 'आता याचा काय उपयोग ? तू गेलास त्याला १०० वर्षे होऊन गेली. तारो, धन मिळवण्याच्या मोहात तू तुझे बाकी सगळे आयुष्य हरवून बसलास.' म्हातारा म्हणाला. आपण काय केले हे तारोला कळले. पण आता काय उपयोग. बिचारा तारो! समुद्राच्या काठावर जाऊन बसला. 'मला हे धन नको, मला माझे जग परत दे.' तो सोनेरी माशाला हाका मारीत राहिला. पण तो सोनेरी मासा त्याला कधीही परत भेटला नाही.

## करिअर ॲस्ट्रोफिजिक्समधलं

**कोण होणार?**

तुम्हाला विज्ञानाची आवड असेल, संशोधनाच्या क्षेत्रात काही करायचं असेल तर ॲस्ट्रोफिजिक्स आणि स्पेस टेक्नॉलॉजीशी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण करता येतील. फिजिक्स किंवा ॲस्ट्रोफिजिक्स या क्षेत्रांमध्ये पदवी मिळवल्यानंतर तुम्ही मास्टर्स पदवी मिळवू शकता. या क्षेत्रात करिअर करण्यासाठी मास्टर्स पदवी मिळवणं गरजेचं आहे. मास्टर्स केल्यानंतर तुम्ही पीएचडीही मिळवू शकता. पीएचडी केल्यानंतर या



क्षेत्रात तुम्हाला बऱ्याच संधी मिळू शकतील.

विज्ञानाच्या क्षेत्रात काही वेगळं करायचं असेल तर तुम्ही या विषयाची निवड करू शकता. या क्षेत्रांमधल्या करिअरमुळे तुम्हाला अनेकविध प्रोजेक्ट्सवर काम करता येईल. अत्यंत महत्त्वाकांक्षी अशी ही प्रोजेक्ट्स तुम्हाला आयुष्यात पुढे जायला मदत करतील.

देशभरातल्या विविध संस्थांमध्ये ॲस्ट्रोफिजिक्स विषयाशी संबंधित अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ ॲस्ट्रोफिजिक्समध्ये इंटिग्रेटेड एमएससी आणि पीएचडीचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. विविध शहरांमधल्या विद्यापीठांमधूनही तुम्ही हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकता.

या क्षेत्रात करिअर करण्यासाठी तुम्ही प्रचंड मेहनतीसाठी तयार असायला हवं. सततचा अभ्यास आणि संशोधन करून तुम्ही पुढे जाऊ शकता.




## कोण करतंय फोन?

**स्मार्ट टेक**

दोस्तांनो, बऱ्याचजणांच्या फोनमध्ये ट्रू कॉलर हे ॲप डाउनलोड केलेलं असतं. या ॲपचे बरेच फायदे आहेत. या ॲपवरची विविध फीचर्स खूप उपयुक्त ठरतात. एखादा कॉल येण्यापूर्वी ट्रू कॉलरच्या माध्यमातून त्याची आधीच सूचना मिळते. यामुळे आपल्याला कोण फोन करतंय हे आधीच कळतं. मग तो फोन उचलायचा की नाही हे आपण ठरवू शकतो. ट्रू कॉलरचं हे फीचर नेमकं कसं काम करतं याविषयी...

ट्रू कॉलर ॲप असणाऱ्या फोनमधून तुम्हाला फोन आला तर फोन करणाऱ्याचं नाव फोनची रिंग वाजण्याआधीच कळतं. फोन करतेवेळी युजरच्या फोनमधल्या डाटा किंवा वायफायचा वापर होतो. यामुळे फोनची सूचना समोरच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणं सोपं होतं. कोणत्याही सेल्यूलर नेटवर्कच्या तुलनेत डाटा किंवा वायफायची गती अधिक असते. त्यामुळे आपल्याला नेमकं कोण फोन करतंय हे आधीच कळू शकतं. ट्रू कॉलरच्या या फीचरमुळे दोन व्यक्तींना अगदी सुरक्षितपणे संवाद साधता येतो. हे फीचर अँड्रॉइड आणि आयओएस अशा दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्सवर काम करतं.



## आनंदी राहण्यासाठी...


**वाचा तर खरं**

मित्रांनो, लोकांना आनंदी, मनमिळावू माणसं खूप आवडतात. दुःखी, उदास, सतत नकारात्मक बोलणाऱ्या लोकांना लांब ठेवलं जातं. म्हणूनच आयुष्यात आनंदी राहणं खूप गरजेचं आहे. आनंदी राहण्यासाठी नेमकं काय करायला हवं? जाणून घेऊ.

- आनंदी राहण्यासाठी निरोगी असणं खूप आवश्यक आहे. तुमची तब्बेत चांगली असेल तर काहीही करता येतं. पोषक आहार घ्या. भरपूर व्यायाम करा. खेळा. यामुळे तुमचं मनही आनंदी राहील.
- मित्रमैत्रिणींमुळे तुम्ही आनंदी राहू शकता. म्हणूनच चांगल्या मित्रमैत्रिणींच्या सोबत राहा. सकारात्मक विचार करणाऱ्या मुलामुलींशी मैत्री करा. इतरांच्या सकारात्मक विचारसरणीमुळे आपल्यालाही बरं वाटतं.
- आजच्या काळात फक्त अभ्यास करून भागणार नाही. तुम्हाला एखादी कला अवगत असायला हवी. तुम्ही चांगला छंद जोपासा. नवं काहीतरी शिका. यामुळे तुमचा उत्साह आणि आत्मविश्वास दोन्ही वाढेल.
- मुलांनो, नेहमी सकारात्मक विचार करत राहा. सकारात्मक विचारांमुळेच आपण पुढे जाऊ शकतो. स्वतःची इतरांशी तुलना करू नका. इतरांबाबत असूया बाळगू नका.
- ताणतणाव हा आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. ताण दूर ठेवण्यासाठी बरेच उपाय करता येतील. योगासनं, ध्यान करून तुम्ही ताणाला लांब ठेऊ शकता. ताण कमी झाल्यावर तुम्हाला बरं वाटेल.



**ठिपके जुळवा**



**दोस्त हे मस्त**

### विश्व बिबट्यांचं



छोट्यांनो, तुम्ही बिबट्या बघितला असेल. विविध प्राणीसंग्रहालयांमध्ये बिबट्या असतो. जंगलातला बिबट्या मानवी वस्तीत आल्याच्या बातम्याही तुम्ही ऐकल्या असतील. बिबट्या भारतासह चीन आणि आफ्रिकेमध्येही आढळतो. आफ्रिकेत काळ्या रंगाचा बिबट्या आढळतो. त्याला ब्लॅक पँथर असं म्हटलं जातं. बिबट्याला छान पोहता येतं. तो नदी, तलावात अगदी सहज पोहू शकतो. बिबट्या झाडावरही चढू शकतो. बिबट्या १० ते १५ वर्षं जगतो.

**खादाडी**

### झक्कास पॉपकॉर्न बार



छोट्यांनो, तुम्हाला पॉपकॉर्न आवडत असतील. मग याच पॉपकॉर्नला ट्विस्ट देऊन तुम्ही मस्तपैकी पॉपकॉर्न बार बनवू शकता. यासाठी पाच कप पॉपकॉर्न, एक कप साखर, अर्धा कप पीनट बटर आणि अर्धा चमचा व्हॅनिला इसेन्स असं साहित्य लागेल. एक भांडं घ्या. त्यात पाणी आणि साखर घालून पाक तयार करून घ्या. आता गॅस बंद करून भांडं खाली काढून घ्या. त्यात पीनट बटर आणि व्हॅनिला इसेन्स घालून नीट मिसळून घ्या. मग या मिश्रणात पॉपकॉर्न घाला. आता एका ट्रेमध्ये किंवा थाळीत पॉपकॉर्न पसरवून घ्या. थोडं थंड होऊ द्या. मग पॉपकॉर्नचे हे बार कापून घ्या. मस्तपैकी खा. संध्याकाळचा खाऊ म्हणून असे बार बनवायला काहीच हरकत नाही.

**स्टडी टिप्स**

### मेंदूला द्या विश्रांती...



मित्रांनो, खूप अभ्यास करून तुम्ही दमता. खरं तर आपला मेंदू दमलेला असतो. या मेंदूला थोडा निवांतपणा हवा असतो. मग आपण मोबाईल हातात घेतो. गेम्स खेळतो. सोशल मीडिया बघतो. पण यामुळे मेंदूवरचा ताण जास्त वाढू शकतो. त्यामुळे घरी बसून मोबाईलवर गेम खेळण्यापेक्षा तुम्ही मैदानी खेळ खेळा. गाणी ऐका किंवा आवडीचं पुस्तक वाचा.

**योगा टाईम**

### योगा सुरू करताना...



मुलांनो, तुम्हालाही योगा करावासा वाटतो का? लहान मुलांसाठीही खास योगवर्ग असतात. पण योगा करताना काही नियमांचं पालन करावं लागतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे जेवल्यानंतर लगेच योगा करू नये. जेवल्यानंतर साधारण तीन तासांनी योगा करता येईल. जेवल्यानंतर आपण फक्त वज्रासनात बसू शकतो. त्यामुळे योगा क्लासला जात असाल तर क्लासच्या वेळेच्या तीन तास आधी जेवा.

# भाजप कार्यकर्त्यांचे मोबाइल, व्हॉट्सॲप सर्व्हेलन्सवर

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. २४ :

राज्याचे महसूल मंत्री आणि भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी भंडारा येथे आयोजित कार्यकर्ता दिवाळी स्नेहमेळाव्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप कार्यकर्त्यांना अत्यंत कडक शब्दात इशारा दिला आहे. पक्षांतर्गत बंडखोरी केल्यास गंभीर परिणाम होतील, असे स्पष्ट करतानाच, त्यांनी भंडाऱ्यातील सर्वांचे मोबाईल आणि व्हॉट्सॲप ग्रुप सर्व्हेलन्सवर टाकले आहेत, असे खळबळजनक विधान केले.



आगामी नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, पक्षात कुणी बंडखोरी केल्यास किंवा एक चुकीचं बटन दाबल्यास त्याचा मोठा फटका पक्षाला बसेल.एक चुकीचे बटण दाबल्यास देवेंद्र फडणवीस सरकार आणि केंद्र सरकारच्या योजनांचा बट्ट्याबोळ होईल. त्यामुळे चुकीचे बटन दाबून भंडाऱ्याचा सत्यानाश करू नका. तिकीट न मिळाल्याच्या रागात खडा तमाशा उभा करू नका, असा सल्लाही त्यांनी नेत्यांना दिला.

बंडखोरी करणाऱ्यांना थेट इशारा देताना बावनकुळे म्हणाले, जर कुणी बंडखोरी केलीच, तर पक्षाच्या मोठ्या नेत्यांचे दरवाजे त्या कार्यकर्त्यांसाठी पाच वर्षांसाठी बंद होतील, हे सर्वांनी लक्षात ठेवावे. तसेच, आता भंडाऱ्यातील सर्व मोबाईल आणि व्हॉट्सॲप ग्रुप सर्व्हेलन्सवर टाकले असून, सर्वांवर बारीक करडी नजर राहणार आहे, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना शिस्त पाळण्याचे निर्देश दिले.

बावनकुळे यांनी यावेळी भंडारा, पवनी, तुमसर आणि साकोली या चारही नगरपालिकांच्या जागा भाजपने लढवाव्यात, यासाठी कार्यकर्त्यांना '५१ टक्क्यांची लढाई' लढण्याचे आवाहन केले. या निवडणुकीसाठी लागेल तेवढा पैसा देण्यास तयार असून, विधान सभेपेक्षा जास्त ताकद या नगरपालिका निवडणुकीत लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

हा कार्यक्रम भंडारा भाजपच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. भंडाऱ्याचे पालकमंत्री पंकज भोयार, माजी राज्यमंत्री व आमदार परिणय फुके, माजी आमदार सुधाकर कोहळे हे यावेळी उपस्थित होते.


### बावनकुळेंना अटक करा - राऊत

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विधानाचा जोरदार समाचार घेतला. बावनकुळे यांच्यावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी त्यांनी केली. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर इंडियन टेलिग्राफ ॲक्टनुसार गुन्हा दाखल करावा. त्यांना तातडीने अटक करून चौकशी करावी. त्यांनी कोणत्या प्रकारचे पेगॅसिस मशीन स्वतः आणले आहे, की भाजपच्या कार्यालयात लावले आहे किंवा त्यासाठी काही खासगी लोक कामाला लावलेत का, असा सवाल त्यांनी केला.

# २० वर्षे ग्रामपंचायत सदस्य
## तरीही मतदार यादीतून नावाचे रहस्यमय स्थलांतर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

कोंढाळी (ता. काटोल) येथील २० वर्षांपासून ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले संजय नन्थुजी राऊत यांच्या नावाचे मतदार यादीतून रहस्यमयरीत्या स्थलांतर झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. राऊत हे कोंढाळी येथील वॉर्ड क्रमांक ६, राऊतपुरा, बाजार चौक येथील कायमस्वरूपी रहिवासी असून, ते २००३ पासून २०२३ पर्यंत सलग पाच पंचवार्षिक कार्यकाळ ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आलेले आहेत. मात्र, अलीकडेच त्यांच्या नावाचे काटोल विधानसभा मतदारसंघातील यादीतून वगळून ते हिंगणा विधानसभेतील वानाडोंगरी भाग क्रमांक २३५ मध्ये अनुक्रमांक ९६५ येथे समाविष्ट करण्यात आले असल्याचे उघड झाले आहे.



या संपूर्ण प्रकरणाला राजकीय हेतू असल्याचा आरोप माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केला आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन सखोल चौकशीची मागणी केली असून, राज्य निवडणूक आयोगालाही यासंदर्भात पत्र पाठवले आहे. देशमुख यांनी या प्रकाराला लोकशाही प्रक्रियेत हस्तक्षेप असे संबोधत, जबाबदार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

या प्रकरणाच्या चौकशीत काही गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. ७ डिसेंबर २०२४ रोजी नाव स्थलांतरासाठी केलेला ऑनलाईन अर्ज बोगस असल्याचे स्पष्ट झाले असून, त्यासोबत कोणतेही आवश्यक कागदपत्र जोडलेले नव्हते. तसेच संबंधित नागरिकास – म्हणजेच संजय राऊत यांना – अर्जाची कोणतीही नोटीस देण्यात आली नाही, सुनावणी घेण्यात आली नाही, आणि अर्जावर संबंधित बीएलओची स्वाक्षरीही नव्हती. या सर्व त्रुटींना न जुमानता, २ एप्रिल २०२५ रोजी राऊत यांचे नाव कोंढाळीच्या मतदार यादीतून वगळण्यात आले आणि ते वानाडोंगरी येथील यादीत बेकायदेशीरपणे समाविष्ट करण्यात आले.

## मूर्तिजापूर-दर्यापुर मार्गावर तीन वाहने एकमेकावर धडकली
# १ ठार, ८ गंभीर जखमी

■ महासागर प्रतिनिधी
मूर्तिजापूर, दि. २४ :

मूर्तिजापूर- दर्यापुर मार्गावर सायंकाळी सात वाजेच्या सुमारास पाय टांगी फाट्याजवळ झालेल्या विचित्र तिहेरी अपघातात एक जण जागीच ठार झाला तर इतर ८ जण गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवारी २३ ऑक्टोबरला घडली. जखमींत बालकांचाही समावेश आहे.



याबाबत प्राप्त माहितीनुसार, दर्यापुर मार्गावरील पायटांगी फाट्याजवळ सायंकाळी सात वाजेच्या सुमारास मूर्तिजापूरकडून जाणारी ग्रँड विटारा व्हॅन (क्र.एम.एच.३० बी.एल.७६००), मॅक्सीमा (ऑटो क्र.एम.एच.२६ बी.डब्ल्यू. ८०७५) व महेंद्र कंपनीचे ट्रॅक्टर यांचा विचित्र अपघात होऊन एकमेकांना भिडल्याने अपघातात एक अनोळखी व्यक्ती जागीच ठार झाला तर इतर आठ जण गंभीररित्या जखमी झाले आहे.

ट्रॅक्टर हा लाखपुरी येथील मेहेरे यांचा असल्याचे समजले. मूर्तिजापूर येथील जळमकर परिवारातील महिला भावासोबत भाऊबीज निमित्ताने गावाकडे जात होती. परंतु या ठिकाणी समोर येणारे ट्रॅक्टर, ऑटो,ग्रँड विटारा व्हॅन या तिघांची आपसात जबर धडक झाली. या अपघातात राहुल मोहन वानखडे (वय ३२, रा. लोणी टाकली, शिवम मेहरे (वय २७, रा.लाखपुरी), वैभव विपुल मेहरे (वय ३८, रा. टाकरखेडाः, साची संदीप जळमकर, प्राची मेहरे (वय ७), वैभवी विपुल मेहरे,अन्वी मेहरे आणि आणखी तीन अनोळखी व्यक्ती जखमी झाले आहे. अपघातग्रस्तांना मूर्तिजापूर येथील श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले होते. परंतु रुग्णालयाची एकूण अवस्था पाहता त्यांना अकोला येथे सर्वोपचार उपचारार्थ हलवण्यात आले. घटनास्थळी ग्रामीण पोलिस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल दीपक कानडे, ज्ञानेश्वर रडके, स्वप्नील तायडे, रितेश, किरण मुकुंदे, शंकर खेडकर, सतीश घाटे व गणेश ठाकरे पोहोचले होते. वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी ती सुरळीत केली. अपघाताबाबत सर्व बाजूंनी चौकशी केली जात आहे.

जखमी रुग्णांना रेफर टू अकोला मुंबई ते कोलकाता राष्ट्रीय महामार्ग आणि लोहमार्गावर वसलेले मूर्तिजापूर महत्त्वाचे शहर असून,या ठिकाणी श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा प्राप्त झाला आहे. परंतु या ठिकाणी अद्यावत अपघात विभाग आणि तज्ञ डॉक्टरांचा अभाव असल्यामुळे गंभीर जखमी रुग्णांना रेफर टू अकोला करण्यातच धन्यता मानली जात आहे.

# दलित महिला सदस्य व पतीला मारहाण

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २४ :

ग्रामपंचायत अंतर्गत बांधकाम सुरू असलेल्या आरओ प्लांटच्या निकृष्ट बांधकामाबाबत इस्टिमेटची मागणी केल्याने एका दलित महिला सदस्येसह तिच्या पतीला मारहाण केल्याची धक्कादायक घटना लाखांदूर तालुक्यातील खोलमारा गावात घडली. या प्रकरणात पीडित दलित महिला सदस्येच्या तक्रारीवरून महिला सरपंचाचा पती श्रीराम नागरीकर (३८), डाकराम नागरीकर (३५), चरणदास नागरीकर (६०), सुखराम नागरीकर (४४) आणि संदीप कांबळे (३४) या आरोपींवर दिघोरी/मो. पोलिस ठाण्यात ॲट्रॉसिटी ॲक्टसह विविध कलमांअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# चंद्रपुरात युवकाची चाकू भोसकून हत्या

■ महासागर प्रतिनिधी
चंद्रपूर, दि. २४ :

आई-बहिणीवरून शिव्या दिल्यामुळे संतप्त झालेल्या ६ जणांनी चाकूभोसकून एका युवकाची हत्या केल्याची घटना चंद्रपूर शहरात २३ ऑक्टोबर रोजी घडली. स्थानिकगुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या तासाभरात सर्व आरोपींना अटक केली आहे.

चंद्रपुरातील लॉकॉलेज परिसरात एका युवकाचा मृतदेह पडून असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. मृतदेह दुर्गापुरातील बेताल चौकातील नितेश वासुदेव ठाकरे वय २७ याचा असल्याची ओळख पटली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांनी गोपनीय माहितीच्या आधारे मुख्य आरोपी सुजित जयकुमार गणवीर २३, तौसिफ अजीज शेख २२, प्रतीक माणिक मेश्राम २२, अनिल रामेश्वर बोंडे १९, यश छोटेलाल राऊत २२, करण गोपाल मेश्राम २२ सर्व रा. दुगार्पूर या सर्व सहाही आरोपींना अवघ्या एका तासात अटक केली.

ताडोबा मार्गावर सुजित जयकुमार गणवीरचा पानठेला आहे. त्याठिकाणी मृत नितेश खर्रा घोटण्याचे काम करीत होता. मात्र तीन दिवसांपूर्वी नितेश व सुजित यांच्यात वाद झाला होता. यावेळी नितेशने सुजितला आई-बहिणीवरून शिवीगाळ केली होती. हा राग सहन न झाल्याने सुजितने ६ मित्रांच्या मदतीने नितेशचा काटा काढला. २२ ऑक्टोबरला नितेश रात्री चित्रपट बघण्यासाठी गेला होता. त्यावेळी नितेशला कॉल करून बोलावून घेतले. सर्वांनी दारू पिल्यानंतर ६ जणांनी त्याच्यावर चाकूने वार केले. या हल्ल्यात नितेशचा जागीच मृत्यू झाला. आरोपींनी लॉ कॉलेजच्या झुडपात नितेशचा मृतदेह ठेवून तेथून पळ काढला होता. आरोपींनी नितेशची दुचाकी सोबत घेऊन सिनालाजवळ आग लावून जाळून टाकली. दुसऱ्या दिवशी सकाळी नितेशचा मृतदेह मिळताच पोलिसांनी तपासाला गती दिली.

# यात्रेत गेलेल्या अल्पवयीन मुलीवर पाशवी अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
यवतमाळ, दि. २४ :

मारेगाव तालुक्यात प्रसिद्ध असलेल्या पांढरदेवी येथे गायगोधन यात्रा बघण्यासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलीस जंगलात नेवून तिच्यावर पाशवी अत्याचार करण्यात आल्याची संतापजनक घटना उजेडात आली. बुधवारी सायंकाळी घडलेल्या या घटनेने खळबळ उडाली असून, मुलीने सांगितलेल्या वर्णनावरून नराधम आरोपी कैलास सूर्यभान आत्राम ( २८, रा. आवळगाव, ता. मारेगाव) यास पोलिसांनी अटक केली.

दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी बलीप्रतिपदेस पांढरदेवी गायगोधन उत्सवानिमित्त मोठी यात्रा भरते. पंचक्रोशीतील नागरिक या यात्रेत गर्दी करतात. बुधवारी यात्रेत शेकडो लोक सहभागी झाले होते. त्यामुळे पोलिसांचाही मोठा बंदोबस्त होता. पीडित अल्पवयीन मुलगी पांढरदेवी गावाजवळच्या एका गावातून आपल्या तीन मैत्रिणीसह यात्रेत सहभागी होण्यासाठी आली होती. गर्दीमुळे चारही मैत्रिणींमध्ये ताटातूट झाली. पीडित मुलगी मैत्रिणीचा शोध घेत असताना आरोपी कैलास आत्राम याने तिला हेरले.

# जुन्या वादातुन युवकावर हल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. २४ :



नाशिकच्या वणी परिसरात घडलेली एक भयंकर घटना संपूर्ण भागाला हादरवून गेली आहे. चौसाळे गावात तमाशाच्या कार्यक्रमादरम्यान झालेल्या वादातून १८ वर्षीय राहुल किशोर काळे या तरुणाचा निर्घृण खून करण्यात आला असून, त्याचा मित्र विजय पवार (वय १७) गंभीर जखमी झाला आहे. जुन्या वादाची कुरापत काढून काही युवकांनी गर्दीच्या ठिकाणीच धारदार हत्यारांनी हल्ला चढवल्याने परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. या घटनेने संपूर्ण वणी परिसरात तणावाचे सावट पसरले असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करून सहा जणांना ताब्यात घेतले आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी की, २२ ऑक्टोबरच्या रात्री चौसाळे गावात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तमाशाचा कार्यक्रम सुरू होता. या कार्यक्रमाला शेकडो नागरिक उपस्थित होते. दरम्यान, गर्दीत काही युवकांमध्ये जुन्या वादावरून वादावादी सुरू झाली. अचानक एका गटाने हल्ला चढवला. विजय पवार या तरुणाने मला का मारले? असा प्रश्न विचारताच आरोपींनी त्याच्यावर आणि राहुल काळेवर हत्यारांनी वार केले. राहुलच्या छातीवर आणि पाठीवर सलग वार झाले, ज्यामुळे तो जागीच कोसळला. त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर विजय गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आला. डॉक्टरांच्या मते त्याची प्रकृती अजूनही चिंताजनक आहे.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वणी पोलिस ठाण्याचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसराचा वेढा घालत जलद कारवाई केली आणि या हल्ल्याशी संबंधित सहा संशयितांना अटक केली. यामध्ये मोहन लहु पवार, दीपक धनराज गायकवाड, गणेश बाळू गायकवाड, निवृत्ती पोपट चौधरी आणि दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते
# रोजगार मेळाव्यात दिले नियुक्तीपत्र




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

भारतीय टपाल विभागाच्या वतीने राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालय, राजनगर येथे आयोजित रोजगार मेळाव्यात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते टपाल विभागात नियुक्त २५ उमेदवारांना प्रतिनिधी स्वरूपात नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. नागपुरात झालेल्या कार्यक्रमात ११३ जणांना नियुक्तीपत्राचे वाटप करण्यात आले.

नियुक्त झालेल्या उमेदवारांचा ग्रामीण डाक सर्विस, टपाल विभाग आदी कार्यालयात सेवा द्यावी लागणार आहे. पंतप्रधानांच्या हस्ते देशातील ५१ हजार पेक्षा जास्त उमेदवारांना नियुक्तीपत्र कार्यक्रम शुक्रवारी रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून देशभरात घेण्यात आला.

# शरद पवार गटाला शेकडो कार्यकर्त्यांचा 'रामराम'

■ महासागर प्रतिनिधी
नांदेड, दि. २४ :

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अवघे काही महिने शिल्लक असताना नांदेड जिल्ह्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का देत जिल्ह्यातील प्रभावशाली गोरठेकर कुटुंबातील शिरीष गोरठेकर आणि कैलाश गोरठेकर यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. हे दोघेही लवकरच राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश करणार असून, त्यांच्या प्रवेशामुळे उमरी तालुक्यात अजित पवार गटाची ताकद वाढणार असल्याचे राजकीय वतुळांत बोलले जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी उमरी आणि देगलूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडणार आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री अजित पवार स्वतः उपस्थित राहणार असून, त्यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी मंत्री नवाब मलिक आदी वरिष्ठ नेते उपस्थित राहतील.

गोरठेकर कुटुंब नांदेड जिल्ह्यातील एक प्रभावशाली राजकीय घराणे मानले जाते. या कुटुंबाची तीन पिढ्यांपासून राजकारणात मजबूत पकड राहिली आहे. सध्या शिरीष गोरठेकर हे उमरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आहेत, तर कैलाश गोरठेकर हे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांच्या पक्षप्रवेशामुळे केवळ उमरीच नव्हे, तर संपूर्ण नांदेड जिल्ह्यात अजित पवार गटाचा प्रभाव वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

स्थानिक राजकीय समीकरणे जलदगतीने बदलत असताना, हा निर्णय शरद पवार गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

# अकोल्यातही मतदार यादीत घोळ

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. २४ :

जिल्ह्यातील मतदार यादीत हजारो दुबार नावे आढळल्याने प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे मतदार यादीतील घोळासंदर्भात तक्रार नोंदवली. मतदार यादी घोळ दूर झाल्याशिवाय निवडणुका घेऊ नयेत, अशी भूमिका मनसेने घेतली आहे.




शहरातील प्रभाग क्रमांक तीन मधील केंद्र क्रमांक १६३, १६४, १६५, १८३, १८४, १८५, १९४, ११८, १८२ आणि २०३ यामध्ये सुमारे एक हजार ४०० दुबार नावे असल्याचा दावा मनसेने तक्रारीत केला. प्रभाग क्रमांक १५ मधील केंद्र क्रमांक २६१ ते २७४ मध्ये सुमारे एक हजार २०० दुबार नावे आढळल्याचा उल्लेखही तक्रारीत आहे. या दुबार नावांमुळे मतदार यादीची विश्वासार्हता धोक्यात आली असून, काही मतदारांना मतदानाचा मूलभूत अधिकार मिळण्यात अडथळा येऊ शकतो. याचा थेट परिणाम निवडणूक प्रक्रियेवर होईल. अनियमिततेची शक्यता वाढेल. मतदार यादीची शुद्धता राखणे हे निवडणूक अधिकाऱ्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे, असे तक्रारीत म्हटले आहे.

दुबार नावांची तत्काळ तपासणी करून अनावश्यक नावे मतदार यादीतून वगळावीत, सुधारित मतदार यादीची प्रत तत्काळ उपलब्ध करावी, या प्रक्रियेच्या पाठपुराव्याची माहिती देण्यात यावी, सर्व मतदार याद्या यंत्रणेमार्फत अद्ययावत करण्यात याव्यात आदी मागण्या देखील मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केल्या आहेत. मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे, उपजिल्हाध्यक्ष सतीश फाले, अकोला शहराध्यक्ष सौरभ भगत आणि मनविसे जिल्हाध्यक्ष रणजित राठोड यांनी संयुक्तपणे ही तक्रार जिल्हा निवडणूक विभागाकडे सादर केली. जिल्ह्यातील मतदार यादीत हा घोळ निवडणूक यंत्रणेच्या निष्काळजीपणाचा परिणाम आहे. हजारो दुबार नावांमुळे खऱ्या मतदार आपल्या अधिकारापासून वंचित राहण्याची वेळ येऊ शकते. पुराव्यासह तक्रार दाखल केली असून, निवडणूक अधिकाऱ्यांनी त्वरित कारवाई करावी. अन्यथा मनसे कार्यकर्ते रस्त्यावर उतरतील, असा इशारा पंकज साबळे यांनी दिला. शहरातील मतदान केंद्रावरील याद्यांचा घोळ केवळ नमुने आहेत. संपूर्ण जिल्ह्यात अशी स्थिती आहे.

जिल्ह्यातील मतदार यादीतील घोळाचा मुद्दा वारंवार समोर येत आहे. या अगोदर भाजपने देखील निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करून इतर मतदारसंघातील मतदार शहरात टाकण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

# ई-रिक्षाच्या धडकेत तरुण ठार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

ई-रिक्षाच्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून एका दुचाकीस्वार तरुणाला जबर धडक दिली. यात गंभीर जखमीचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला. दानिश (३०) असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी मोहम्मद वाहिद रा. सिद्धार्थनगर, टेकानाकाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. वाहिद यांचा डेकोरेशनचा व्यवसाय आहे. त्यांचे यशोधरानगरच्या निझामुद्दिन कॉलनीत गोदाम आहे. मृतक दानिश हा त्यांच्याकडे काम करीत होता. गोदामाची देखरेख करण्याची जबाबदारी होती आणि तो तेथेच राहात होता. बुधवारी रात्री ११.४५ वाजताच्या सुमारास दानिश हा मालक वाहिद यांच्या एमएच-४९/डीएन-९३१८ क्रमांकाच्या दुचाकीने मेहंदीबाग पुलावरून राणी दुर्गावती चोकाकडे जात होता.विरुद्ध दिशेने येत असलेल्या ई-रिक्षा क्र. एमएच-४०/बीएम-२८७३चा चालक राजू श्रावण रामटेके (५०) रा. वैशालीनगर याने भरधाव वाहन चालवून दानिशच्या दुचाकीला धडक दिली. दानिश जखमी झाला.

# स्वच्छता कर्मचाऱ्याचे अवयवदान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नागपूर महानगरपालिकेत सफाई कर्मचारी म्हणून आयुष्य व्यतीत करताना चंद्रमणी जामगडे यांनी शहरातील घाण दूर करत स्वच्छतेचे व्रत जोपासले. आणि आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर त्यांनी अवयवदानातून पाच कुटुंबांमध्ये प्रकाशाची पेरणी करून समाजासाठी नवा आदर्श निर्माण केला. दिवाळीच्या सणात या कुटुंबाने अवयवदानाचा दीप प्रज्वलित केला आहे.



चंद्रमणी जामगडे (६६), रा. बिडगाव, ता. कामठी, जि. नागपूर हे नागपूर महानगरपालिकेतील माजी सफाई कर्मचारी होते. त्यांच्या कुटुंबात पत्नी नंदा (५८), मुलगे विरू (३७) आणि पंकज (३५) आहेत. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी म्हणजेच २१ ऑक्टोबर रोजी चंद्रमणी यांना अचानक भोवळ आल्याने ते घरातच कोसळले. कुटुंबियांनी तातडीने त्यांना उपचारासाठी नागपुरातील लकडगंज येथील न्यू इरा रुग्णालयात दाखल केले. विविध तपासण्यांमध्ये त्यांच्या मेंदूमध्ये रक्तस्राव झाल्याचे निदान झाले. उपचारांना प्रतिसाद न मिळाल्याने पुढील तपासणीत त्यांचा मेंदूमृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

न्यू इरा रुग्णालयातील समन्वयक डॉ. अश्विनी चौधरी यांनी कुटुंबीयांना परिस्थितीची सविस्तर माहिती देत अवयवदानाविषयी समुपदेशन केले. चंद्रमणींचे मुले विरू आणि पंकज तसेच इतर कुटुंबीयांनी, वडिलांचे काही भाग इतरांच्या शरीरात जिवंत राहू शकतात, या भावनेने अवयवदानाला संमती दिली. त्यानंतर विभागीय अवयव प्रत्यारोपण समितीला माहिती देण्यात आली. समितीचे समन्वयकांनी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण केली. गुरुवारी चंद्रमणींचे यकृत, दोन मूत्रपिंड आणि दोन डोळे दान करण्यात आले. त्यामुळे पाच कुटुंबांना नवजीवन लाभले. या उपक्रमात डॉ. निलेश अग्रवाल, डॉ. आनंद संचेती, डॉ. पराग मुन, साहिल बंसल, डॉ. विवेक देशपांडे तसेच न्यू इरा रुग्णालयातील वरिष्ठ व कनिष्ठ डॉक्टर आणि कर्मचारीवर्ग यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

भाऊबीजेच्या दिवशी चंद्रमणी यांचे यकृत न्यू इरा रुग्णालयातील ६५ वर्षीय महिलेच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. एक मूत्रपिंड एम्स, नागपूर येथील ५३ वर्षीय महिलेला तर दुसरे मूत्रपिंड न्यू इरा रुग्णालयातील ५७ वर्षीय पुरुषाला देण्यात आले. दोन्ही डोळे (बुबुळ) महात्मे नेत्रपेढीला देण्यात आले. अशा रीतीने, दोन महिलांना नवजीवन देत चंद्रमणी जामगडे यांनी या दिवाळीत खऱ्या अर्थाने भाऊबीजेचा भाऊ बनून मानवतेचा दीप प्रज्वलित केला.

नागपूरसह देशभारात आजही गरजेच्या तुलनेत खूप कमी अवयवदान होते. त्यामुळे अनेकांना अवयव उपलब्ध होत नसल्याने जीव गमवावा लागतो. अवयव दनाने अनेकांचे जीव वाचणे शक्य आहे.

## फटाके फोडण्यावरून जीवघेणा हल्ला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

फटाके फोडत असलेल्या एका तरुणावर माथेफिरू गुंडाने चाकू हल्ला केला. पोट आणि पासळ्यांवर वार करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. ही थरारक घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत समतानगर परिसरात घडली. पोलिसांनी आरोपी शेख इकराम उर्फ मेजर शेख मुश्ताक (२२) रा. प्रवेशनगर याला अटक केली आहे. जखमी रिवायत अकबर शेख खान (२१) रा. अजीज कॉम्प्लेक्स, यशोधरानगर याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

रिवायत याची यशोधरानगर चौकातच रेडिमेड कपड्यांची दुकान आहे. मंगळवारी रात्री तो दुकान बंद करून घरासमोर बसलेला होता. या दरम्यान काही मित्र फटाके फोडत होते. रिवायतही त्यांच्यासोबत मिळून फटाके फोडू लागला. दरम्यान परिसरातील एका फटाके दुकानदाराने त्यांना आग लागण्याच्या भीतीने दुसरीकडे जाऊन फटाके फोडण्यास सांगितले. रिवायत आणि त्याचे मित्र समतानगर मैदानात फटाके फोडण्यासाठी गेले. आरोपी इकराम आधीच तेथे बसलेला होता. रिवायत आणि त्याच्या मित्रांना फटाके फोडताना पाहून इकरामने शिविगाळ करीत दगड फेकून मारण्यास सुरूवात केली. रिवायतने जाब विचारला असता इकरामने त्याच्याशी वाद घातला. चाकू काढून रिवायतचे पोट आणि पासळ्यांवर वार केले. रक्तबंबाळ अवस्थेत रिवायतने जीव मुठीत धरून तेथून पळ काढला. जवळच असलेल्या एका घरात जाऊन लपला. काही लोकांनी त्याला त्याच्या घरी पोहोचवले. कुटुंबीयांनी तत्काळ त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात दाखल केले.

# हेमा मालिनी व रवीना टंडन करतील

## धापेवाडा येथील हातमाग केंद्राचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे वडीलोपार्जित गाव धापेवाडा, नागपूर जिल्ह्यातील एक सांस्कृतिक आणि औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण बनत आहे. धापेवाडा येथे गडकरी यांच्या पुढाकाराने सुरु झालेल्या टेक्सटाईल उद्योगाने स्थानिक कापड सामग्रीला एक नवीन ओळख दिली आहे. नुकतेच येथे ५ कोटी रुपयांच्या खचार्ने हातमाग केंद्रासाठी एक मोठी इमारत उभी करण्यात आली असून, त्याचे औपचारिक उद्घाटन येत्या जानेवारी महिन्यात होणार आहे.




धापेवाडा टेक्सटाईलमध्ये कोश्याच्या साड्या तयार केल्या जातात. सहा महिन्यांपूर्वी मुंबईतील काही मॉडेल्स नागपूरमध्ये आल्या होत्या आणि त्यांनी या साड्यांचे प्रदर्शन केले. प्रदर्शनानंतर या साड्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून, सध्या १२ हजार रुपयांच्या या साड्यांसाठी वेटिंग लिस्ट तयार झाली आहे. धापेवाडा येथे साड्या बनविल्या जातात तर प्रिंटिंग झारखंडमध्ये केले जाते.

हातमाग केंद्राच्या उद्घाटनासाठी विशेष आकर्षण म्हणजे अभिनेत्री हेमामालिनी आणि रवीना टंडन यांचा सहभाग. धापेवाडा टेक्सटाईलच्या साड्या परिधान करून त्या या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. गडकरी यांनी सांगितले की, येथील हातमाग वस्त्र युरोप, अमेरिका तसेच जगभरात निर्यात करण्याचा मानस आहे. हातमाग वस्त्र लोकप्रिय व्हावे यासाठी आम्ही सतत प्रयत्न करीत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

धापेवाडा टेक्सटाईलचा विकास स्थानिक अर्थव्यवस्थेसाठी आणि रोजगारनिर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. स्थानिक कापड उद्योग आणि हस्तकला यामुळे गावाची ओळख फक्त भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही वाढेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

याचवेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कळमेश्वर शहरातील विकास प्रकल्पांचा भूमिपूजन कार्यक्रमही पार पडला. ते म्हणाले की, कळमेश्वर शहर सॅटॅलाइट सिटी म्हणून विकसित होईल आणि येथील हातमाग उद्योगाच्या माध्यमातून हे शहर जागतिक नकाशावर उभे राहील.

कळमेश्वरमधील रेल्वे क्रॉसिंगवर ५३६ मीटर लांबीचा रेल्वे उड्डाण पुल उभारला जाणार असून, यासाठी ५५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे रेल्वे फाटक बंद होऊन वाहतुकीत होणाऱ्या विलंबापासून नागरिकांना दिलासा मिळणार आहे, तसेच वेळ आणि इंधनाची बचत होणार आहे.

याशिवाय वन टाइम इम्प्रूव्हमेंट योजनेअंतर्गत ९.५ किमी रस्त्यांचे दुभाजकांसह सुधारणा, पादचारी मार्ग, बस थांबे, जलनिस्सारण सुविधा, पथदिवे आणि पुलांची पुनर्बांधणी अशा विविध सुविधा योजनेत समाविष्ट आहेत. ९६ कोटी रुपयांच्या या तरतुदीने कळमेश्वरमधील रस्ते आणि वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित व आधुनिक बनविण्याचे उद्दिष्ट आहे.

## होमगार्डला कारखाली चिरडण्याचा प्रयत्न

### ऑटोमोटिव्ह चौकापर्यंत नेले फरफटत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नाकाबंदी दरम्यान वाहतूक पोलिसांसोबत कर्तव्यावर तैनात होमगार्डने संशयावरून एका कारच्या चालकाला थांबण्याचा इशारा केला. मात्र चालकाने थांबण्याऐवजी कारचा वेग वाढवून होमगार्डलाच कारखाली चिरडण्याचा प्रयत्न केला. इतकेच नाहीतर वाचण्यासाठी कारच्या बोनटवर चढलेल्या होमगार्डला तो उड्डाणपुलावरून ऑटोमोटिव्ह चौकापर्यंत फरफटत घेऊन गेला. ही थरारक घटना एलआयसी चौकातील सर्व सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. याप्रकरणी सदर पोलिसांनी होमगार्ड श्रेयस मानकरच्या तक्रारीवरून कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

श्रेयस मानकर हा होमगार्ड असून त्याचा सनद नंबर ४६०९ आहे. गुरूवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास शहर वाहतूक पोलिस विभागातर्फे एलआयसी चौकातील एमएसईबी वाय पॉईंटवर नाकाबंदी करून वाहन चालकांची तपासणी केली जात होती. वाहतूक कर्मचारी अनिकेत यादव, अभिषेक यादव व पवन ठेपाले यांच्यासोबत श्रेयसही कर्तव्यावर तैनात होता. दरम्यान एक कार संशयितरित्या भरधाव येताना दिसली. होमगार्डने कारच्या चालकाला थांबण्याचा इशारा केला. मात्र त्या चालकाने थांबण्याऐवजी आणखी गती वाढवली आणि कार होमगार्ड श्रेयसच्या अंगावर चढवण्याचा प्रयत्न केला. श्रेयसने वाचण्यासाठी कारच्या बोनटवर उडी घेतली.

त्यानंतरही चालक थांबला नाही आणि त्याने श्रेयससह कार पळवली. तो श्रेयसला उड्डाणपुलावरून आटोमोटीव्ह चौकापर्यंत फरफटत घेऊन गेला. आटोमोटिव्ह चौकाजवळ श्रेयसने स्वतःला सावरत बोनेटवरुन बाजूला उडी घेत आपला जीव वाचवला. या दरम्यान चालकाने श्रेयसला अनेकदा कारवरून खाली पाडत चिरडण्याचा प्रयत्न केला. कसा-बसा जीव वाचवून श्रेयसने ११२ वर कॉल करून घटनेची माहिती दिली. सदर पोलिस ठाण्याचे बिट मार्शल घटनास्थळी पोहोचले. याप्रकरणी सदर पोलिसांनी आरोपी कार चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलिसांची विविध पथके त्याचा शोध घेत आहेत.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे ही थरारक घटना घडत असताना श्रेयससोबत तैनात वाहतूक कर्मचाऱ्यांनी त्याला वाचविण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही. त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह नियंत्रण कक्षालाही घटनेची सूचना देण्याचे टाळून श्रेयसचा जीव धोक्यात टाकला आणि आरोपी कार चालकास पळून जाण्याची पूर्ण संधी मिळाली.

वाहतूक पोलिसांनी लगेच एयरवर वरिष्ठांना माहिती दिली असती तर आरोपी कार चालक उड्डाणपुलावरुन आटोमोटीव्ह चौकात उतरताच पोलिसांच्या हाती लागला असता. कारमध्ये पुरूष वाहन चालकासह एक महिला सुद्धा असल्याचे सांगण्यात येत आहे.

## मुंबई-नागपूरसाठी मध्य रेल्वेची अतिरिक्त वातानुकूलित सुपरफास्ट विशेष गाडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :




प्रवाशांच्या सोयीसाठी आणि दिवाळी तसेच छठ उत्सवाच्या काळात वाढत्या गर्दीचा विचार करून मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) आणि नागपूर दरम्यान अतिरिक्त वातानुकूलित सुपरफास्ट विशेष गाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ही गाडी सणासुदीच्या काळात प्रवाशांना प्रवासाची अधिक सोय उपलब्ध करून देईल आणि गर्दी व्यवस्थापनास मदत करेल.

या विशेष गाडीच्या माध्यमातून प्रवाशांना आरामदायी प्रवासाची संधी मिळेल. गाडी क्रमांक ०१००५, २५ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून पहाटे ००.२० वाजता सुटेल आणि दुपारी १५.३० वाजता नागपूर येथे पोहोचेल. परतीच्या प्रवासासाठी गाडी क्रमांक ०१००६ नागपूर येथून २५ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी १८.१० वाजता सुटेल आणि २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ०८.२५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पोहोचेल.

ही विशेष गाडी दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगांव आणि वर्धा या प्रमुख स्थानकांवर थांबेल. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना सुविधाजनक प्रवासाची खात्री राहील.

गाडीची रचना २० वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे आणि २ जनरेटर व्हॅन अशी असेल, जी प्रवाशांना आरामदायी आणि सुरक्षित प्रवास अनुभवण्यासाठी सक्षम आहे. मध्य रेल्वेने प्रवाशांना विनंती केली आहे की त्यांनी या विशेष गाडीचा लाभ घेण्यासाठी तिकिटे वेळेत आरक्षित करावीत आणि सणासुदीच्या काळातील गर्दी टाळावी.

मुंबई-नागपूर मार्गावरील नियमित सेवांमध्येही प्रवाशांसाठी काही प्रमुख पर्याय उपलब्ध आहेत. दररोज चालणारी सेवाग्राम सुपरफास्ट एक्स्प्रेस (१२१३९/१२१४०) मुंबई सीएसएमटी ते नागपूर दरम्यान सुमारे १४ तास ५० मिनिटांत प्रवास करते. त्याचप्रमाणे मुंबई-नागपूर दुरोंतो एक्स्प्रेस (१२२८९/१२२९०) ही गाडी दररोज चालते आणि प्रवास वेळ सुमारे ११ तास आहे. याशिवाय विदर्भ एक्स्प्रेस (१२१०६) नागपूर ते मुंबई दरम्यान दररोज धावणारी एक महत्वाची सेवा आहे. या नवीन विशेष गाडीच्या सुरूवातीमुळे सणासुदीच्या काळात प्रवाशांना वेळेवर आणि आरामदायी प्रवासाची सुविधा मिळेल. रेल्वे प्रशासनाने गर्दी आणि प्रवाशांच्या सोयीची पूर्ण जबाबदारी घेतली असून, ही सेवा सुरळीत चालविण्यासाठी सर्व आवश्यक व्यवस्थाही करण्यात आल्या आहेत. तसेच, प्रवाशांनी सणासुदीच्या काळात गाड्यांच्या आरक्षणासाठी तातडीने तिकिटे बुक करावीत, जेणेकरून प्रवासाच्या वेळेत कोणतीही अडचण येऊ नये. मुंबई-नागपूर मार्गावर या अतिरिक्त गाडीमुळे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध होईल.

## भाजप-काँग्रेस भेद न करता अतिक्रमण तोडा : नितीन गडकरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी कळमेश्वर शहरातील रस्त्याच्या विस्तारासाठी अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत की, अतिक्रमण कोणाचेही असो - भाजपचे असो की काँग्रेसचे - ते तोडावे. शहरातील रस्ता २४ मीटर करण्यात येत आहे. यासाठी अधिकाऱ्यांनी अतिक्रमण ठरवून हटवण्याचे काम त्वरित सुरू करावे, स्थानिक आमदार आणि भाजप नेत्यांनी अतिक्रमण कारवाई अडथळे निर्माण कराल तर याद राखा, असा इशाराही केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिला.



गडकरी यांच्या सूचनेनुसार, निवडणुकीचा कोणताही विचार न करता काम पूर्ण करावे. कुणाचेही अतिक्रमण आहे, पण काम थांबवू नका. रेषा ओढा आणि अतिक्रमण तोडा, असे त्यांनी आमदार आशीष देशमुख आणि भाजप नेते डॉ. राजीव पोद्दार यांना सांगितले. केंद्रीय मंत्री म्हणाले की, अतिक्रमण हटवल्याने शहराचा विकास आणि सौंदर्य वाढेल.

कळमेश्वर शहरातील उड्डाण पूल आणि अंतर्गत रस्ते तयार झाल्यानंतर नागरिकांना सुगम वाहतूक आणि आकर्षक शहराचे स्वरूप दिसेल. गडकरी यांनी स्पष्ट केले की, अतिक्रमण हटवण्याचे काम केवळ रस्त्याच्या विस्तारापुरते मर्यादित आहे आणि यामुळे लोकसंख्येला प्रत्यक्ष लाभ होईल.

शहरातील रस्त्यांचा विस्तार हा केवळ भौगोलिक सुधारणा नाही तर आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्वाचा आहे. नागरी सुविधांची उभारणी, वाहतूक सुरळीत करणे आणि शहराचे सौंदर्य वृद्धिंगत करणे हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

अधिकाऱ्यांनी अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने करावी, कोणत्याही पक्षाचे दबाव न घेता कार्य करावे, असे गडकरी यांनी सांगितले. शहरवासीयांच्या सोयीसाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरणार आहे. कळमेश्वरमध्ये हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराचा चेहरा अधिक आधुनिक आणि सुंदर दिसेल, असा विश्वास मंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

कळमेश्वर हे शहर एक सॅटॅलाइट सिटी म्हणून विकसित होईल. त्याचप्रमाणे येथील हातमागाच्या व्यवसायाच्या माध्यमातून हे शहर जगाच्या नकाशावर येईल, असा विश्वास केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज व्यक्त केला. कळमेश्वर शहरातील रेल्वे क्रॉसिंगवर रेल्वे उड्डाण पुलाच्या तसेच कळमेश्वर मधील अंतर्गत रस्त्यांचे दुभाजकांसह सुधारणा या प्रकल्पाचे भूमिपूजन आज गडकरींच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. ५५ कोटी रुपयांच्या तरतुदीने सेतुबंधन योजनेअंतर्गत येणाऱ्या सुमारे ५३६ मीटर लांबीच्या रेल्वे उड्डाण पुलामुळे या रेल्वे क्रॉसिंग वरील रेल्वेच्या वाहतुकीमुळे वारंवार बंद होणाऱ्या रेल्वे फाटक पासून कळमेश्वरवासीयांना दिलासा मिळणार असून पर्यायाने त्यांचा वेळ आणि इंधनाची बचत होणार आहे.

## व्यावसायिकाच्या घरी चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

दिवसाढवळ्या फ्लॅटचे कुलूप तोडून अज्ञात आरोपींनी रोकड आणि दागिन्यांसह एकूण ७ लाख १६ हजार रुपये किंमतीच्या मालावर डल्ला मारला. ही घटना नंदनवन पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी श्रीगोपाल मदनलाल सोनी (८५) रा. जयस्वाल अपार्टमेंट, उमिया कॉलनी, नंदनवनच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. या घटनेने संपूर्ण अपार्टमेंटमध्ये एकच खळबळ उडाली आहे. सोनी कुटुंबाचा संगणक विक्रीचा व्यवसाय आहे. ते शाळा, कार्यालय व इतर ठिकाणी मागणीनुसार संगणकांचा पुरवठा करतात. गुरूवारी सकाळी ९.१५ वाजताच्या सुमारास सोनी कुटुंब भाऊबीज साजरी करण्यासाठी घराला कुलूप लावून प्रजापतीनगरात राहणाऱ्या नातेवाईकाच्या घरी गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपींनी फ्लॅटच्या मुख्य दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.

बेडरूमच्या कपाटात ठेवलेली दीड लाखांची रोकड, सोन्याचे दागिने आणि हिऱ्यांचा हार असा एकूण ७.१६ लाख रुपये किंमतीचा माल चोरी करून पसार झाला. जवळपास दोन तासानंतर सोनी कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले.

## प्राचीन व आधुनिक शिक्षण पद्धतीतील सहसंबंधावर मार्गदर्शन कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

जिल्हा परिषद हायस्कूल, पाचगाव नुकत्याच झालेल्या कार्यक्रमांमध्ये "प्राचीन शिक्षण पद्धती व आधुनिक शिक्षण पद्धती यामधील सहसंबंध" या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल व्यापक दृष्टीकोन निर्माण व्हावा, यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य जी.आर.मोटघरे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून एडुसन फाऊंडेशनचे संचालक डॉ. निलेश काळे उपस्थित होते. डॉ काळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना प्राचीन शिक्षणपद्धतीतील नैतिक मूल्ये व तत्त्वे आधुनिक जीवनात कशी उपयुक्त ठरतात याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी गुरुकुल प्रणाली, नैतिक शिक्षण, व्यावहारिक जीवनकौशल्ये या गोष्टींवर सविस्तर प्रकाश टाकला. डॉ. काळे यांनी सांगितले. की, "आजच्या विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक यशाकडे न पाहता, सहनुभूती, आदरभाव, जबाबदारी आणि नैतिक मूल्ये अंगीकारली तरच ते खरे अथार्ने यशस्वी होतील." योग्य जीवन कौशल्य आत्मविश्वास निर्माण करतो व यशाचा मार्ग सोपा होतो. त्याचबरोबर शालेय विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा अती वापर करण्याऐवजी वाचनाचे प्रमाण वाढविण्याकरिता डॉ. काळे यांनी मुलांना प्रोत्साहित केले. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षिका रंदई मॅडम व भोयर यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## नेल्को सोसायटीतील विविध नागरी समस्यांची आयुक्तांकडून पाहणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नेल्को सोसायटीतील विविध नागरी समस्यांबाबत नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी शुक्रवारी (ता. २४) दौरा करून पाहणी केली व नेल्को सोसायटी नागरिक समितीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली.

नेल्को सोसायटी नागरिक समितीने नेल्को सोसायटीमधील काही नागरी समस्यांबाबत निवेदन दिले होते. या अनुषंगाने आयुक्तांनी या भागाची पाहणी केली. यावेळी उपायुक्त मिलिंद मेश्राम, उपसंचालक नगररचना गिरीश गोडबोले, कार्यकारी अभियंता रविंद्र बुंधाडे, कार्यकारी अभियंता आशिष तालेवार, कार्यकारी अभियंता राजेंद्र राठोड, उप अभियंता उमेश मदने लक्ष्मीनगर झोनचे झोनल स्वच्छता अधिकारी ऋषीकेश इंगळे उपस्थित होते.



यात नेल्को सोसायटी मधील अंतर्गत रस्त्यांचे सिमेंटीकरण, डांबरीकरण व फुटपाथवर पेव्हर ब्लॉक्स लावण्यात यावे, या भागातील विवेका हॉस्पिटलच्या समोरच्या भागात एक जलवाहिनी फुटलेली असल्याने पाणी साचत असल्याची तक्रार निवेदनात केली होती. त्याचप्रमाणे या सोसायटीतील मैदानावर प्राथमिक शाळा व वाचनालयासाठी असलेले आरक्षण हटवून खेळाच्या मैदानासाठी राखीव ठेवावे तसेच या मैदानात नागरीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात निवेदन दिले होते.

नेल्को सोसायटी नागरिक समितीच्या तक्रारीच्या अनुषंगाने या सर्व नागरी समस्यांची आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी पाहणी केली. नागरी समस्यांचा निपटारा त्वरित करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. नेल्को सोसायटीतील खुल्या जागेवर विकास आराखड्यांमध्ये वाचनालय व प्राथमिक शाळेसाठी आरक्षण राखीव केलेले आहे. या भागात मुलांना खेळण्यासाठी कोणतेही दुसरे खेळाचे मैदान उपलब्ध नसल्याने विकास आराखड्यातील आरक्षण हटवून केवळ खेळाच्या मैदानासाठी ही जागा राखीव करावी, अशी मागणी सोसायटीच्या शिष्टमंडळाने यावेळी केली.

या संदर्भात सोसायटीने प्रस्ताव संमत करून तो महानगरपालिकेकडे पाठवावा. त्याअनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी आयुक्तांनी शिष्टमंडळाला दिले. सोसायटीच्या वतीने आयुक्तांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक प्रमोद तभाने, सोसायटीचे सचिव मनोहर पांडे, विजय नाईक, पी. एम. ब्राम्हणकर, केशव कोसे, श्री. देवलाल कोरडे, मोहन पांडे यांच्यासह सोसायटीचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मनपाचे उपअभियंता अभिजीत नेताम, अभियंताशीतल रंगारी, अभियंता महेंद्र सुरडकर, स्वच्छता निरीक्षक दिनकर गजभिये व आकाश रंगारी उपस्थित होते.

नेल्को सोसायटीच्या खेळाच्या मैदानावर पाहणीच्यावेळी १४ वर्षाखालील मुलांची क्रिकेटचा सामना सुरू होता. यावेळी नेल्को सोसायटीच्या सदस्यांनी आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांना क्रिकेटचा फटका मारण्याची विनंती केली. आयुक्तांनी या आग्रहाचा मान राखत बॅट हाती धरली, गोलंदाज प्रमोद तभाने यांनी टाकलेल्या चेंडूला फटका मारून आयुक्तांनी क्रिकेट खेळाचा आनंद घेतला.

## चेन स्नॅचर गुन्हे शाखेच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

गुन्हे शाखेच्या सोनसाखळी चोरी विरोधी पथकाने सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून हुडकेश्वर ठाण्यांतर्गत चेन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीला २४ तासांच्या आत अटक केली आहे. हर्षल धनराज चौधरी (२१) रा. संजय गांधीनगर, हुडकेश्वर असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून सोन्याचे लॉकिट आणि दुचाकी वाहनासह एकूण १ लाख १४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमालही जप्त करण्यात आला.

फियार्दी मुकुंद कृष्णा डोमळे (६१) रा. लवकुशनगर, हुडकेश्वर हे नेहमीप्रमाणे बुधवारी सकाळी ६.३० वाजताच्या सुमारास घरून मॉर्निंग वॉकसाठी निघाले होते. रिंग रोडवर भाग्यलक्ष्मी हॉलसमोर मागून भरधाव आलेल्या दुचाकीस्वार आरोपीने त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावली. यात चेन तुटून खाली पडली. मात्र २० हजार रुपये किंमतीचे लॉकिट आरोपीच्या हाती लागले. आरोपी लॉकिट घेऊन पसार झाला. डोमेळे यांच्या तक्रारीवरून हुडकेश्वर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला.

# संगम गावात गोवर्धन पूजेचा जल्लोष

■ महासागर प्रतिनिधी
**हिंगणा, दि. २४ :**

संगम येथे गोवर्धन पूजा अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

या प्रसंगी दिनेश भोंगाडे, मनोज भोंगाडे, सुमित भोंगाडे आणि गौरव भोंगाडे यांनी आपल्या गाई-म्हशींना रंगीबेरंगी सजवून गावभर भव्य रॅली काढली. या रॅलीने संपूर्ण गावाचे लक्ष वेधले आणि गोवर्धन पूजेच्या निमित्ताने वातावरण भक्तिमय झाले.



कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तंटामुक्ती अध्यक्ष ज्ञानेश्वर मते, माजी नगरसेवक गुणवंत मते, विशेष कार्यकारी दंडाधिकारी मनोज राऊत, माजी सभापती भागवत काळे, मानव अधिकार नागपूर जिल्हाध्यक्ष दादाराव मुडे, सामाजिक कार्यकर्ते पवन राऊत, अण्णा कन्हेरे, अभिजीत पचारे, महेश मुडे तसेच गावातील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुजरातचा चोरटा पोलिसांच्या जाळ्यात

**नागपूर, दि. २४**

गुजरात येथे घरफोडी करून पळून आलेल्या एका चोरट्यास नरखेड पोलिसांनी आपल्या जाळ्यात अडकवून त्याला वेजलपूर (गुजरात) पोलिसांच्या ताब्यात दिले.

आशिष महेंद्र देशभ्रतार (२२) महालक्ष्मीनगर, अहमदाबाद असे या चोरट्याचे नाव आहे.

आशिषने वेजलपूर पो. स्टे. अंतर्गत घरफोडी करून तो खैरगाव (नरखेड) येथे नातेवाईकांकडे पळून आला होता.

वेजलपूर पोलिसांना ही माहिती समजताच त्यांनी नागपूर ग्रामीण पोलिसांशी संपर्क केला. नरखेड पोलिसांनी खैरगाव येथून आशिषला ताब्यात घेतले. आशिष हा सराईत गुन्हेगार असल्याची माहिती आहे.

# वेणा जलाशयातून सोडलेले अवशिष्ट (वेस्टेज) पाणी रस्त्यावर

## उपाययोजना करण्याची नागरीकांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. २४ :**

येथील वेणा जलशुध्दीकरण केंद्रातील अवशिष्ट (वेस्टेज) पाणी रस्त्यावर येत आहे. या पाण्यामुळे ईश्वर लॉन जवळ असलेली सीमेंट पाईप पुर्णपणे बुजलेली असुन पाणी भारत अपार्टमेंट पेट्रोल पंप जवळुन जाणाऱ्या सर्वीस रस्त्यावरुन वाहत असल्यामुळे हा रस्ता पुर्णपणे खराब झाला आहे.रस्त्यावर पाणी साचत असल्यामुळे रस्त्यावर खड्डे तयार झाले आहे. त्या खड्ड्यात पाणी साचल्यामुळे वाहनाच्या अपघाताच्या संख्येत वाढ झाली आहे. रघुपती नगरला जाणाऱ्या रस्त्यावर पाणी साचत असल्यामुळे हा रस्ता पाण्याने भरला राहत आहे.



या रस्त्यावरील नाल्यावर सिमेंटच्या पायल्या टाकुन रहदारीसाठी रस्ता

**भारत अपार्टमेंट पेट्रोल पंप जवळुन जाणाऱ्या सर्वीस रस्त्यावरुन वाहत असल्यामुळे हा रस्ता पुर्णपणे खराब झाला आहे**

मोकळा करण्यात यावा. अशा आशयाचे निवेदन मुख्याधिकारी यांना देण्यात आले. यावेळी शंकरराव कडू, माधव भोयर, सतीश उगले, प्रमोद वाटकर, सुरेश काकडे, रामचंद्र सिंग, अनिरुद्ध विश्वकर्मा,गोपाल शर्मा, बाळु बरडे,रवि सोनी, सतीश वैद्य, सुरेश यादव, विनय श्रीवास्तव,अमीत तायडे उपस्थित होते.

# एनएसएच्या तीन मुलींची आंतरजिल्हा फुटबॉल स्पर्धेसाठी निवड

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. २४ :**

येथील नोबेल स्पोर्ट्स ( एनएसए ) अकॅडमीतील गौरी पाटील, जिनिशा कोल्हे, सृष्टी सिंह या तीन मुलींची नाशिक डिस्ट्रिक्ट फुटबॉल असोसिएशन संघात निवड झाली असून हे खेळाडू आंतरजिल्हा कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत शिरपूर, जिल्हा धुळे येथे सहभागी होणार आहे. नोबेल स्पोर्ट्स अकॅडमीमध्ये घेतलेल्या कठोर प्रशिक्षण आणि शिस्तीमुळे या विद्यार्थांनी मानाचा टप्पा गाठला आहे. त्यांच्या मेहनतीने आणि अनुशासनानेच त्यांनी ही उंची गाठली असल्याचे मत अकॅडमीचे उपाध्यक्ष हर्षल काकडे यांनी सांगीतले. अकॅडमीच्या प्रशिक्षकांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितले की, ही निवड एनएसएच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फळ आहे. आम्ही स्थानिक पातळीवर फुटबॉलचा प्रसार आणि महिला खेळाडूंचे सबलीकरण यासाठी कटिबद्ध आहोत.एनएसएचे प्रवक्ते म्हणाले, आमच्या



विद्यार्थ्यांच्या निवडीमुळे संपूर्ण एनएसए परिवार आणि वाडीकरांसाठी हा अभिमानाचा क्षण आहे.

# संस्कृतीचा वारसा, भक्ती व धार्मिक परंपरा जोपासने काळाची गरज आहे : ह.भ.प. निंबाजी महाराज तागड

■ महासागर प्रतिनिधी
**कुही, दि. २४ :**

गावाच्या संस्कृतीचा, भक्तीचा आणि परंपरेचा संगम असलेला शारदा उत्सव यंदा गावकऱ्यांच्या उत्साहात पार पडला. शारदा उत्सव मंडळाच्या वतीने बुधवारी आयोजित हरिभक्त पारायण निंबाजी महाराज तागड यांच्या भारूड कार्यक्रमाने संपूर्ण वातावरण भक्तिमय आणि मनोरंजक केले. हा कार्यक्रम केवळ मनोरंजनापुरता मर्यादित न राहता, आपल्या लोकसंस्कृतीचा अभिमान आणि समाजजागृतीचा संदेश देणारा ठरला. भारुडातील सखोल विचार, साजरी भक्ती, आणि मधुर संगीतामुळे उपस्थित ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाला विदर्भ युवक काँग्रेस प्रभारी अनुराग भोयर, कृषी उत्पन्न बाजार समिती कामठीचे सभापती अनिकेत शहाणे, सचिन भोयर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच उपसरपंच रत्नाकर



देऊळकर, सदस्य राजू राऊत, दीपक चांभारे, शीला काकडे, प्रिया गोंडाणे, ज्येष्ठ नागरिक लढारूजी चांभारे, मुरलीधर ठाकरे, विलास येडके, सैलेश सहारे, अनिल काकडे, अनिकेत मानमोडे, नथ्थू ठाकरे, तसेच मंडळाचे अध्यक्ष स्वप्निल ठाकरे आणि श्याम विलाईतकर उपस्थित होते.

भक्तिगीतांच्या लहरींनी आणि भारुडाच्या गमतीदार सादरीकरणाने कार्यक्रमाला अप्रतिम रंग चढला. सरपंच विजय खोडके म्हणाले, अशा उत्सवांमुळे आपली परंपरा जपली जाते, संस्कृतीची खरी ओळख निर्माण होते आणि नवीन पिढीत अभिमान जागृत होतो. ग्रामस्थांचे सहकार्य हीच आमची खरी ताकद आहे.

# आज एनसीसीएल पुरस्कार आणि दिवाळी मिलन



आयुक्त रविन्द्र कुमार सिंगल



डॉ. पंकज राजेश भोयर

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. २४ :**

नागपूर चेंबर ऑफ कॉमर्स लिमिटेड दरवर्षी उद्योग, व्यापार आणि सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना एनसीसीएल पुरस्काराने सन्मानित करते. या वर्षी शहरातील तीन प्रमुख व्यक्तींची एनसीसीएल पुरस्कार २०२५ साठी निवड झाली आहे. उद्योग क्षेत्रातील सचिन पचिसिया, व्यापार क्षेत्रातील संजय मोहोड आणि सेवा क्षेत्रातील हिरालाल पालीवाल (हिरू) यांची निवड झाली आहे. हा पुरस्कार सोहळा आज, शनिवार, २५ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ७:०० वाजता महाराजबाग क्लब लॉन येथे होणार आहे. प्रमुख पाहुणे डॉ. पंकज राजेश भोयर (गृहनिर्माण, गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, सहकार आणि खाण राज्यमंत्री) आणि शहर पोलिस आयुक्त रवींद्र कुमार सिंगल (आयपीओ) एनसीसीएल पुरस्कार २०२५ प्रदान करतील.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या १०९ प्रकरणांची नोंद





## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. त्यानुसार, शुक्रवारी (ता.२४) रोजी उपद्रव शोध पथकाने १०९ प्रकरणांची नोंद करून ६०,१०० रुपयाचा दंड वसूल केला. यात हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत २६ प्रकरणांची नोंद करून १०,४०० रुपयांची वसुली करण्यात आली.

व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/-दंड) या अंतर्गत ७ प्रकरणांची नोंद करून रू.७०० चा दंड वसूल करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत ६ प्रकरणांची नोंद करून रू.२,४०० चे दंड वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत २६ प्रकरणांची नोंद करून २९,००० रुपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता, यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा, अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,००० रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास ३३ प्रकरणांची नोंद करून ६,६०० रुपयाचा दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास १० प्रकरणांची नोंद करून रु. १०,००० चे दंड वसूल करण्यात आलेला आहे. सदर कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

याशिवाय उपद्रव शोध पथकाने पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत येणाऱ्या श्री. मोरेश्वर, नवजीवन कॉलोनी, यांच्यावर सी अँड डी साहित्य फुटपाथवर टाकल्याने प्रकरणी रु.५,००० दंड वसूल करण्यात आले. तसेच मे. स्पंदन कला यांनी रस्त्यालगत साहित्य टाकल्या प्रकरणी रू.५,००० दंड वसूल करण्यात आला. तर गांधीबाग झोन अंतर्गत येणाऱ्या इतवारीतील झेंडा चौक येथील फराळी भंडार आणि बंगालीपंजा येथील अन्नपूर्णा किराणा यांच्यावर प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल प्रत्येकी रु. ५,००० चा दंड वसूल करण्यात आला.

सतरंजीपुरा झोन अंतर्गत येणाऱ्या मे. शुभम मिष्ठान भंडार यांच्यावर प्रतिबंधात्मक प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रु. ५,०००चा दंड वसूल करण्यात आला.

लकडगंज झोन अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. २४, सूर्यनगर येथील श्री. नरेश गुप्ता यांच्यावर रिकाम्या प्लॉटवर कचरा टाकल्याप्रकरणी रु.५,००० चा दंड वसूल करण्यात आला.

मंगळवारी झोन अंतर्गत येणाऱ्या छावणी येथील क्लासिक ग्रो यांच्यावर रस्त्यालगत बांधकामाचे साहित्य टाकल्या प्रकरणी कारवाई करीत रु.१०,००० चा दंड वसूल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाच्या जवानांनी ७ प्रकरणांची नोंद करून रू. ४०,००० दंड वसूल केला. तसेच ३ किलो प्लास्टिक जप्त केले.

## किरकोळ वादातून तरुणाला मारहाण

**नागपूर, दि. २४ :** किरकोळ वादातून झालेल्या बाचाबाचीत दिगणी, जि. खगरिया (बिहार) यास मारहाण करून त्याचा खून करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला कुही पोलिसांनी अटक केली. आकोली बसथांबा येथील रेल्वे पुलाच्या परिसरातील रेल्वे क्वॉर्टरमध्ये एक तरुण रक्तबंबाळ अवस्थेत पडून आहे अशी माहिती कुही पोलिसांना मिळाली होती. पोलिस त्वरेने घटनास्थळी पोहचले. त्यावेळी एक तरुण रक्तबंबाळ अवस्थेत पडून होता. पोलिसांनी त्याला मेडिकलमध्ये भरती केले. पोलिसांनी परिसरात चौकशी केली असता जखमीचे नाव कुंदन सदा असल्याचे निष्पन्न झाले. २१ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या वेळी कुंदन हा आरोपी अभिषेक विष्णू गजभिये (२३) आकोली याच्यासोबत होता अशी माहिती पोलिसांना समजली. त्यावरून पोलिसांनी अभिषेकला ताब्यात घेतले असता किरकोळ वादातून कुंदनला मारहाण केल्याची कबुली दिली. अभिषेकची २६ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी घेतली आहे.

## दुकानात चोरी करणाऱ्या दोघा चोरट्यांना अटक



नागपूर, दि. २४: जुना कामठी मार्गावरील एका दुकानाच्या टिनाचे छत उचकवून रोख २५ हजार रुपये चोरून नेणाऱ्या दोघा चोरट्यांना अटक करण्यात कळमना पोलिसांना यश आले आहे.

सक्षम प्रेमनाथ मौंदेकर (२५) गोळीबार चौक आणि अनुप देवाजी वाकडे (१९) घसियारीपुरा, लष्करीबाग अशी या चोरट्यांची नावे आहेत.

आनंदनगर, बिनाकी येथे राहणाऱ्या आशिष सुरेश पांडे (४१) यांचे जुना कामठी मार्गावरील शनी मंदिर चौकात माधव ट्रेडर्स नावाचे किराणा दुकान आहे. २१ आणि २२ ऑक्टोबरच्या रात्री दुकान बंद करून ते घरी गेले होते. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरांनी छतावरील टिन उचकवून दुकानात प्रवेश केला आणि गल्ल्यातील रोख २५ हजार रुपये चोरून नेले होते. याप्रकरणी कळमना पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांनी त्या परिसरातील सीसी टीव्ही फुटेज तपासले असता दोन्ही चोरट्यांची ओळख पटली. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी चोरीची कबुली दिली. कळमना व्यतिरिक्त प्रतापनगर येथेही घरफोडी केल्याची त्यांनी कबुली दिली.

पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून सोन्याचे दा गि ने आणि रोख २४ हजार रुपये असा १ लाख ८१ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. ही कामगिरी वपोनि प्रवीण काळे, उपनिरीक्षक संतोषकुमार रामलोड, हे. कॉ. रविकुमार शाहू, प्रदीप पवार, शिपाई मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव, प्रफुल्ल गोहोकर यांनी केली.

# नवनीत नगरात वीज मीटर बदलावरून संताप
# अन्यायकारक वीजबिलांविरोधात नागरिकांचा आक्रोश

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. २४ :**

येथील नवनीत नगर, मधील नागरिकांनी महावितरण विभाग आणि स्थानिक प्रशासनाविरोधात निषेधाची लाट उसळवली आहे. परिसरातील अनेक घरांमध्ये ग्राहकांची संमती न घेता नवीन वीज मीटर बसविण्यात आल्यामुळे वीजबिलांमध्ये प्रचंड वाढ झाली असून नागरिकांनी हे प्रकरण गंभीरतेने घेतले आहे. नागरिकांच्या तक्रारीनुसार, प्रत्यक्ष वीज वापर अत्यल्प असतानाही बिलांचा आकडा तीन ते चार पट वाढला आहे. पूर्वी महिन्याला सुमारे एक हजार रुपये एवढे बिल येणाऱ्या घरांचे आता चार हजार रुपये पर्यंत इतके बिल येत असल्याचे रहिवाशांनी सांगितले. ही वाढ अकारण, अवाजवी आणि सामान्य जनतेच्या आर्थिक स्थितीवर मोठा ताण आणणारी असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर नागरिकांनी शुक्रवार २४ ऑक्टोबर रोजी वाडी, लाव्हा



महावितरण कार्यालयासह वाडी पोलिस स्टेशनमध्ये तक्रारपत्र सादर केले. यावेळी नागरिकांनी काही ठोस मागण्या पुढे केल्या आहेत. नव्याने बसविलेल्या मीटरांची तांत्रिक तपासणी व सत्यापन तात्काळ करावे.

**. ज्या घरांमध्ये वीज वापर नाही, तेथील नवीन मीटर काढून जुने मीटर पुन्हा बसवावेत.**

**. मागील महिन्यांची जादा वीजबिले सुधारून दिलासा द्यावा.**

**. भविष्यात ग्राहकांच्या संमतीशिवाय कोणतेही बदल न करावेत.**

रहिवाशांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर या प्रकरणात तात्काळ आणि न्याय्य तोडगा निघाला नाही, तर ते शांततामय आंदोलन, महावितरण कार्यालयावर मोर्चा आणि कायदेशीर लढा उभारतील. आम्ही सहकार्य करायला तयार आहोत, पण अन्याय सहन करणार नाही, असा ठाम संदेश नागरिकांनी दिला आहे.यावेळी विनित गजभिये, आशीष पाटिल, शैलेश थोराणे, गोलू गावडे, श्री. सलामें, प्रिया पतले, संगीता येसकर, रीना बांगरे, प्रज्ञा मोटघरे, मनीष कुरसांगे, दीपक टेमबर्न, रितेश पटले, विवेक उर्कुडे आदी प्रमुख नागरिकांसह नवनीत नगरचे असंख्य रहिवासी उपस्थित होते.

# बसस्थानक परिसरात मधमाशाचा धुमाकूळ, नागरीकाची उडाली तारांबळ

■ महासागर प्रतिनिधी
**भिवापूर, दि. २४ :**

बस स्थानक परिसरात जुन्या पाण्याच्या टाकीजवळ एक मधमाशांचे मोठे पोळे होते. येथील मधमाशा अचानक उडू लागल्या व बाजारहाट करण्यास आलेला नागरीकांला चावा घेवू लागल्याने एकच तारांबळ उडली काहीजण सैरावैरा पळू लागले. तर काहीनां मधमाशांनी चाव घेतल्यामुळे त्यांना उपचारा करीता ग्रामीण रुग्णालय येथे उपचारा करीता धाव घेण्याची वेळ आली.

आज शुक्रवार हा बाजार हाटाचा दिवस असल्यामुळे या मार्गावर नागरीकांची वदर्ळ होती. अशातच दोन वाजताच्या दरम्यान पाण्याच्या टाकीवर असलेला मधमाशाच्या पोळ्या वरील मधमाशा अचानक



उडू लागल्या व ये -जा करणाऱ्याचा चावा घेवू लागल्याने काही नागरीक भयभीत होवू लागले. काही जण आपला जिव वाचविण्यासाठी सैरावैरा पळू लागले. यावेळी परिसरातील काहींनी आपले दुकान काही वेळ बंद बंदही केले. त्यामुळे नागरीकात चांगलीच तारंबळ उडाली होती. काहींना मधमाशांनी चावा घेतल्याने ग्रामीण रुग्णालयात दाखल झाले. काहींनी उलट्या पण केल्याची माहिती आहे. त्यातील तिघे जण ग्रामीण रुग्णालयात डॉक्टराच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले. तर दहाजणांनी प्राथमिक उपचार घेतल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

# सूक्ष्म आणि लघु उद्योगांना केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान पुन्हा सुरु करा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

सूक्ष्म आणि लघु उद्योगांना केंद्र सरकारकडून मिळणारे अनुदान पुन्हा सुरु करण्यात यावी, अशी मागणी कोसिया विदर्भच्या वतीने करण्यात आली.

एमएसएमई मंत्रालयाच्या संयुक्त विकास आयुक्त रुख्मीणी अत्री यांना कोसिया विदर्भच्या अध्यक्ष झुल्फेश शाह यांच्या नेतृत्वात भेट घेतली.



याप्रसंगी संयुक्त संचालक विजय सिरसाट, नितीन आ ा ळ श ी , गोविंद राठी, ललित कारेमोरे आदी उपस्थित होते. विदर्भातील सूक्ष्म आणि लघु उद्योगांना येत असलेल्या अनेक अडचणींची माहिती यावेळी देण्यात आली.

भारत सरकारने सुरू केलेल्या विविध योजनेचा लाभ उद्योगांना मिळावा, बंद झालेल्या योजना पुन्हा सुरु झाल्यास अनेकांना लाभ होईल.

सूक्ष्म आणि लघु उद्योगांना मिळणारे १५ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान मिळाल्यास बंद लघु उद्योग पुन्हा सुरु होतील, असा विश्वास शिष्टमंडळाने व्यक्त केला.

## उमिया कॉलनी, नंदनवन येथे ७.१६ लाखांची घरफोडी

**नागपूर, दि. २४ :** दिवाळीनिमित्त नातेवाईकांना फराळ देण्यासाठी गेलेल्या इसमाच्या घरी घरफोडी करून अज्ञात दोन हेल्मेटधारी चोरट्यांनी ७ लाख १६ हजाराचा ऐवज चोरून नेला. उमिया कॉलनी, नंदनवन येथील जयस्वाल अपार्टमेंट येथे राहणारे श्रीगोपल मदनलाल सोनी यांचा संगणकचा व्यावसाय आहे. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.१५ च्या सुमारास आपला फ्लॅट कुलूपबंद करून दिवाळीनिमित्त नातेवाईकांना फराळ देण्यासाठी आणि भेट घेण्यासाठी ते कुटुंबियांसह प्रजापतीनगर येथे गेले होते. ही संधी साधून अज्ञात चोरांनी मुख्य दाराचा कुलूपकोंडा तोडून घरात प्रवेश केला आणि विविध खोल्यांमध्ये ठेवलेली कपाटे फोडली. चोरांनी सोन्याचांदीचे दागिने, हिरेजडीत नेकलेस आणि रोख दीड लाख रुपये असा ७ लाख १६ हजाराचा ऐवज चोरून नेला. दुपारी सव्वाबाराच्या सुमारास सोनी कुटुंबिय घरी आले असता ही घटना उघडकीस आली.

पोलिसांनी सोनी यांच्या घरी लावलेल्या सीसी फुटेज तपासले असता दोन हेल्मेटधारी चोरांनी चोरी केल्याचे दिसून आले. याप्रकरणी नंदनवन पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## एमडी तस्कर गजाआड

**नागपूर, दि. २४:** एमडीची तस्करी करण्याच्या प्रयत्नात धंतोली पोलिसांनी तीन तस्करांना अटक करून त्यांच्या ताब्यातून कारसह ८ लाख ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

काल दुपारी धंतोलीचे पोलिस पथक परिसरात पॅट्रोलिंग करीत होते. डॉक्टर कॉलनी येथील मोकळ्या जागेत प्रदीप पुरणदास उईके (३२), चिंटू उर्फ विवेक लेखराज बनोटे (२८) आणि तेजस विजय भांडारकर (२५) तीनही रा. कुंभारटोली, धंतोली हे स्विप्ट कारजवळ उभे होते. पोलिसांना संशय आल्याने संशयावरून पोलिसांनी त्यांची विचारपूस केली असता ते उडवाउडवीची उत्तरे देत होते. पोलिसांना संशय आल्याने त्यांची अंगझडती आणि कारची तपासणी केली असता एका झिपलॉक पन्नीमध्ये १०.७३० ग्रॅम एमडी मिळून आली. त्याचप्रमाणे कारमध्ये दोन चाकू सुद्धा मिळाले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून एमडी पावडर, ईलेक्ट्रीक वजनकाटा, कार, चाकू, ५ मोबाईल असा ८ लाख ७३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी तिघांनाही अटक केली.

ही कामगिरी वपोनि अनामिका मिर्झापुरे, उपनिरीक्षक जाधव, हे. कॉ. योगेश चांभारे व त्यांच्या पथकाने केली.

## कुख्यात गुंड तडीपार

**नागपूर, दि. २४ :** पाचपावली हद्दीतील नंदगिरी रोडवरील लाडपुरा येथे राहणारा कुख्यात गुंड ऋतिक उर्फ सोमेश विलास पराते (२४) याला दोन वर्षांसाठी शहरातून तडीपार करण्यात आले.

ऋतिकवर अनेक गुन्हे असून त्याच्यावर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. परंतु, त्याच्यात काहीच सुधारणा झाली नाही. त्यामुळे त्याला दोन वर्षांसाठी शहरातून तडीपार करण्यात आले. त्याला यवतमाळ येथे त्याच्या नातेवाईकांकडे सोडण्यात आले.

## वेध प्रतिष्ठान नागपूरतर्फे दीपोत्सव स्नेहानुबंध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

वेध प्रतिष्ठानतर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दीपावलीच्या पावन सणानिमित्त दीपोत्सव - स्नेहानुबंध कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आला होता. हा उपक्रम एस. बी. बी. एम. फाऊंडेशनद्वारे संचालित व्यंकटेश वृद्धाश्रम, माहुली, ता. पारशिवनी येथे पार पडला. कार्यक्रमात सामाजिक ऋण देण्याच्या स्वरूपात ? १५,०००/-(पंधरा हजार रुपये फक्त) धनादेश प्रदान केला गेला. तसेच अमोल गाकरे यांच्या सौजन्याने वृद्धाश्रमातील सदस्यांसाठी दिवाळी फराळाचीही व्यवस्था करण्यात आली होती.

या सोहळ्यास प्रख्यात समाजसेवी व अधिकारी उपस्थित होते, ज्यामध्ये डॉ. मनोहर नरांजे, वसंत गोमासे, खुशाल कापसे, ओंकार पाटील, डॉ. अश्विन किनारकर, राजेश माहूरकर, प्रशांत बट्ठे, ज्येष्ठ नागरिक ज्ञानेश्वर पाल, सामाजिक कार्यकर्ते अमोल गाकरे, कुमार सानंद व प्रशांत बट्ठे, तसेच व्यंकटेश वृद्धाश्रमाचे संचालक अश्विन अंजीकर व अंजीकर प्रमुख होते.

कार्यक्रमा दरम्यान वृद्धाश्रमातील सदस्यांनी आनंद व्यक्त केला, तर उपस्थितांनी या सामाजिक उपक्रमासाठी वेध प्रतिष्ठानाचे कौतुक केले. दीपोत्सवाच्या या उपक्रमामुळे वृद्धांचे मनोबल वाढले आणि सणाची आनंदपूर्ण भावना वृद्धाश्रमात अनुभवायला मिळाली.

## २६ वर्षे सेवेनंतर बडर्तफ शिक्षिकेला दिलासा

**नागपूर:** नागपुरातील राष्ट्रीय विद्यालयातील सहायक शिक्षिका अलका ठाकूर यांच्या सेवा व निवृत्ती लाभांच्या मागणीवर राज्य सरकारने येत्या १४ डिसेंबरपर्यंत निर्णय घ्यावा, असा आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यांना अनुसूचित जमाती प्रवर्गातून सहायक शिक्षिका पदावर नियुक्ती देण्यात आली होती. त्यानंतर शिक्षण विभागाच्या सूचनेवरुन संस्थेने एकाच दिवसात नोकरीतून बडर्तफ केले होते. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. अलका ठाकूर यांनी २६ वर्षे या विद्यालयात नोकरी केली होती. त्यांच्या हक्काच्या सेवा व निवृत्ती लाभांसाठी त्यांनी ॲड. शैलेश नारनवरे यांच्या मार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती मुकुलिका जवळकर व न्या. राज वाकोडे यांनी ही याचिका मंजूर करत ठाकूर यांना दिलासा दिला. ठाकूर यांच्याकडे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र असून, ३ जुलै १९९१ रोजी त्यांना अनुसूचित जमाती प्रवर्गातून नवी शुक्रवारी येथील राष्ट्रीय विद्यालयात सहायक शिक्षिका म्हणून नियुक्ती देण्यात आली होती. ८ मार्च १९९४ रोजी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीला मान्यता दिली होती. विशेष म्हणजे, नियुक्तीपत्रामध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची अट नव्हती.बाजू मांडण्याची संधी दिली नाहीशिक्षण संस्थेने जात वैधता प्रमाणपत्र नसल्याचे कारण देत २० नोव्हेंबर २०१७ रोजी शिक्षिका अलका ठाकूर यांना सेवेतून बडर्तफ केले. या कारवाईपूर्वी त्यांना कोणतीही सुनावणीची संधी देण्यात आली नव्हती. त्यांना बाजू मांडण्यासाठी वेळ देण्यात आला नाही, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, राज्य सरकारने २१ डिसेंबर २०१९ रोजी अनुसूचित जमाती वैधता नसलेल्या कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा निर्णय घेतला होता.

## खरसोली ग्रामस्थांचा अवैध दारूविक्रीविरोधात आवाज बुलंद

### दारूबंदीची मागणी ; धार्मिक सौहार्द बिघडण्याची भीती, महिला मंडळ बेमुदत उपोषणाच्या तयारीत

■ महासागर प्रतिनिधी,



**सावरगांव, दि. २४ :** खरसोली गावातील ग्रामस्थांनी अवैध दारूविक्रीविरोधात तीव्र आक्रोश व्यक्त करत नरखेड पोलीस निरीक्षकांना व नरखेडचे तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. गावातील युवक वर्ग दारूच्या आहारी जात असल्याने महिलांना आणि कुटुंबांना त्रास सहन करावा लागत आहे. सामाजिक सौहार्द आणि धार्मिक वातावरण धोक्यात येत असल्याचे महिला व ग्रामस्थांचे म्हणणे आहे. महिला व ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले की, खरसोली हे बहुधर्मीय व बहुजाती ऐक्याचे गाव आहे. येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बिरसा मुंडा, साईबाबा, गजानन महाराज यांच्या मूर्ती तसेच बौद्ध विहार, हनुमान मंदिर, साईबाबा मंदिर, गजानन महाराज मंदिर आणि मुस्लिम दर्गा अशी अनेक धार्मिक स्थळे आहेत.परंतु या परिसरात अवैध दारूविक्री वाढल्यामुळे श्रद्धाळू भाविकांना रोजच मनस्ताप सहन करावा लागतो.

सीमालगत मध्यप्रदेशातून येणाऱ्या काही व्यक्तींमार्फत अवैध दारूची विक्री होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून महिला मंडळाचा इशारा ङ्गगावात दारूबंदी लागू न झाल्यास येत्या नागपूर हिवाळी अधिवेशनात नागपूर महिला मंडळ आणि सामाजिक संघटना बेमुदत उपोषणावर बसतील,ङ्ग असा ठाम इशारा ग्रामस्थांनी प्रशासनाला दिला आहे. महिलांनी सांगितले की, दारूविक्रीमुळे घरातील वातावरण उद्धवस्त झाले आहे.

अनेक कुटुंबे आर्थिक संकटात सापडली असून गावातील युवक वर्ग चुकीच्या मार्गाला लागला आहे. प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदन देर्णा?या महिलांनी केली आहे. प्रशासनाकडे निवेदन सदर निवेदनावर प्रफुल गजबे, बबीता गजबे , धम्ममित्रा नारनवरे ,वनमाला गजभिये,वनिता धुर्वे ग्राम पंचायत सदस्य, प्रतिभा धुर्वे,पुष्पा धुर्वे, पुष्पा सरयाम, दीपा धुर्वे,माया उईके, वनिता शेंडे, रेखा नारनवरे,सिंधू बांदरे, भारती वंजारी, सुष्मा चक्रपाणी, बेबी फूसे,प्रीती खोब्रागडे, मेघा वाकडे, लता गजबे, मनीषा धुर्वे, भारती बांदरे, मीनाक्षी बरडे,सुगंधा परतेती, कविता गजबे या महिला दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ ला सदर निवेदन दिले आहे.

या निवेदनाच्या प्रतिलिपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, तहसीलदार नरखेड, राज्य उत्पादन शुल्क विभाग नागपूर, नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक, तसेच उपविभागीय अधिकारी काटोल यांना पाठविण्यात येणार आहे.

**महत्वाचे मुद्दे:**

गावात अवैध दारूविक्रीमुळे धार्मिक आणि सामाजिक तणाव वाढतो आहे. युवकवर्ग बिघडत असून, कुटुंबांचे आर्थिक नुकसान वाढले आहे. पोलीस व प्रशासनाने दारू विक्रेत्यांवर तातडीने कारवाई करावी.

गावात कायमस्वरूपी दारूबंदी लागू करावी, अशी ग्रामस्थांची मागणी. दारूविक्रीसारखे सामाजिक प्रश्न हे केवळ कायद्याचे नव्हे तर समाजजागृतीचे विषय आहेत. खरसोलीसारख्या गावांनी पुढाकार घेत दारूबंदीचा आग्रह धरणे हे नक्कीच परिवर्तनाची दिशा दाखवणारे पाऊल आहे. प्रशासनाने या निवेदनाची दखल घेऊन तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.


## संत गजानन महाराजांची पायी दिंडी यात्रा कोराडीला

■ महासागर प्रतिनिधी

**नागपूर, दि. २४ :** शहरातील सर्व भक्तांसाठी आनंदाची बातमी आहे की दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री संत गजानन महाराजांची पायी दिंडी यात्रा रविवारी २६ ऑक्टोबर ला सकाळी ६ वाजता सुरू होणार आहे. ही यात्रा निर्मल नगरी रोड येथील संत गजानन महाराज मंदिरातून निघून महालक्ष्मी जगदंबा माता मंदिर, कोराडी येथे पोहोचेल. भक्तांसाठी महाप्रसादाची विशेष व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

यात्रा संपल्यावर दुपारी २ वाजता महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात सर्व सहभागी भक्तांना महाप्रसाद मिळणार आहे. हे सर्व भक्तांसाठी आनंदाचा आणि आध्यात्मिक अनुभवाचा क्षण ठरेल.

दिंडी यात्रेचा मार्ग असा ठरला आहे. निर्मल नगरी- उमरेड रोड-सक्करदरा चौक-बस स्टँड- कॉटन मार्केट चौक-लोहा पूल-गणेश टेकडी-एनआयटी चौक-सदर रेसिडेन्सी रोड-छावणी- पागलखाना चौक- मानकापूर-झिंगाबाई टाकळी-महादुला- कोराडी. श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या आवाहनानुसार सर्व भक्तांनी या पायी यात्रेत सहभागी होऊन महालक्ष्मी माता व संत गजानन महाराजांच्या आशीर्वादाचा लाभ घ्यावा.



## पोलीस ठाण्याबाहेर तडजोडीसाठी आटापिटा का? झोटिंग, बोंडे आर्थिक व्यवहार प्रकरण

**नागपूर :** जिजाऊ बँकेच्या खामगाव शाखेतून १०० कोटींचे कर्ज मिळवून देतो, असे सांगत निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील बोंडे आणि माधव पांढरे पाटील या दोघांनी साडेतीन कोटींची फसवणूक केल्याची तक्रार देणारे व्यवसायिक अतुल झोटिंग यांच्या अर्जावर सीताबर्डी पोलिसांनी ३ महिन्यांपासून गुन्हा दाखल केलेला नाही. पण, हे प्रकरण ठाण्याबाहेर मिटवण्यासाठी आटापिटा केला जात असल्याची माहिती आहे. त्यामुळे यामागचा खरा सूत्रधार कोण, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.साडेतीन कोटींच्या रकमेची विचारणा केली की सुनील बोंडे आणि माधव पाटील आत्महत्येची धमकी देतात, असा स्पष्ट उल्लेख झोटिंग यांनी पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. तरीही पोलिसांनी अद्याप गुन्हा दाखल केलेला नाही. शिवाय हे प्रकरण पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठांना माहीत आहे. त्यामुळे तातडीने गुन्हा दाखल करून घेत या फसवणुकीत बोंडेंची भूमिका काय, याचा छडा पोलीस लावू शकतात. मात्र झोटिंग यांच्या तक्रारीवर तीन महिन्यांपासून गुन्हाच दाखल झालेला नाही. पण, ठाण्याबाहेर तडजोड करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे कळते. त्यामुळे यात नेमका कोणाचा फायदा आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खोटे नेमके कोण बोलतेय? फसवणुकीच्या तक्रारीसंदर्भात भूमिका जाणून घेण्यासाठी झोटिंग यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, हा व्यक्तिगत व्यवहार आहे. सुनील बोंडे यांना विचारणा केली असता ते म्हणाले, झोटिंग यांच्यासोबत तडजोड झाली असून लवकरच व्यवहार पूर्ण होईल. मात्र या तडजोडीची माहिती पोलिसांकडे नसल्याचे सीताबर्डीचे ठाणेदार राजपूत यांनी सांगितले. त्यामुळे नेमके खोटे कोण बोलत आहे, यावरूनही संशय वाढत चालला आहे. युनियन बँक अधिकाऱ्याची भूमिका संशयास्पदझोटिंग यांच्या फसवणुकीची सुरुवात २५ डिसेंबर २०२३ला झाली. युनियन बँकेचे अधिकारी आशीष गोंडाणे यांनी त्यासाठी मध्यस्थी केली. गोंडाणे यांनीच झोटिंग यांची बोंडेंशी ओळख करून दिली. त्यावर बोंडे यांनी २९ जानेवारी २०२४ ला जिजाऊ बँकेतून १०० कोटींचे कर्ज मिळवून देतो, अशी हमी झोटिंग यांना दिली.

## न्यायालयीन प्रकरणामुळे १५ कोटींचे नुकसान; सरन्यायाधीश गवईच्या निकालामुळे मार्ग मोकळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

नागपूर शहराच्या सौंदर्यात भर घालणारा फुटाळा तलावातील संगीत कारंजी आणि मल्टीपल लेव्हलससह पार्किंग प्लाझा या प्रकल्पाला पर्यावरणवादी संघटनांनी विरोध केला होता. हे प्रकरण न्यायालयात गेल्याने प्रकल्पाचे काम ठप्प झाले. सुमारे दीड वर्षांपासून प्रकल्प बंद असल्यामुळे १५ कोटींहून अधिक रुपयांचे नुकसान झाले आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या मंजुरीनंतर आता या प्रकल्पाचे काम पुन्हा सुरू होत असून, त्यासाठी आवश्यक सर्वेक्षण सुरू झाले आहे, अशी माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. महामेट्रोने फुटाळा तलाव परिसरात प्रेक्षक दीर्घा, सिमेंट रस्ता आणि पार्किंग प्लाझा या प्रकल्पांचे काम हाती घेतले आहे. केंद्रीय रस्ता निधी (सीआरएफ) अंतर्गत सुरू झालेल्या या प्रकल्पाची एकूण किंमत सुमारे ११३ कोटी रुपये आहे. प्रकल्पात 'प्रोजेक्टर रूम विथ व्ह्युइंग गॅलरी', मल्टीपल लेव्हल पार्किंग प्लाझा आणि सिमेंट रस्ता असे तीन प्रमुख घटक आहेत. 'मल्टीमीडिया लेझर डिस्प्ले' तयार करण्याचे काम नागपूर सुधार प्रन्यासकडे आहे. या प्रकल्पाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्याने काम ठप्प पडले होते.

नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडला ३४२ मीटर लांबीच्या मातीच्या बंधाऱ्याचे मजबुतीकरण करण्याचे आदेश देण्यात आले असून, उर्वरित ९५२ मीटरचा खर्च राज्य सरकारने करावा, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. बंधाऱ्याच्या दीर्घकालीन सुरक्षेसाठी जलसंपदा विभागाला १४ एप्रिल २०२६ पर्यंत सविस्तर आराखडा सादर करण्यास सांगण्यात आले आहे. त्याचा खर्च एनएमआरसीएल, नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यास यांच्याकडून वसूल करण्यास राज्य सरकारला परवानगी देण्यात आली आहे.



दुसऱ्या बाजूला, फुटाळा तलाव परिसरातील फाउंटेन शो, तरंगते रेस्टॉरंट, बॅन्केट हॉल आणि व्ह्यूइंग गॅलरीच्या उभारणीविरोधात 'स्वच्छ असोसिएशन' या नागपूरस्थित एनजीओने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांनी तलावाला 'पाणतळ स्थळ' म्हणून घोषित करण्याची मागणी केली होती.हेही वाचामंत्री गुलाबराव पाटील जेव्हा अपघातग्रस्त तरुणाच्या मदतीला धावतातः!मात्र सरन्यायाधीश भूषण गवई, न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारीया यांच्या पीठाने ही याचिका फेटाळली. तलाव हा मानवनिर्मित जलाशय असल्याने तो 'पाणतळ स्थळ' म्हणून ओळखला जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे येथे तात्पुरत्या स्वरूपातील पर्यटक सुविधा उभारण्यास कायदेशीर अडथळा उरलेला नाही.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले की, मानवी कृती जर पर्यावरणाशी सुसंगत असतील, तर त्या कायद्याच्या चौकटीत राहून प्रोत्साहित केल्या पाहिजेत.

तसेच, सार्वजनिक ट्रस्ट तत्त्वज्ञान हे नैसर्गिक तसेच मानवनिर्मित संसाधनांवरही लागू होत असल्याने, प्रशासन आणि नागरिक या दोघांचीही जबाबदारी आहे की त्यांनी निरोगी पर्यावरण टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहावे.

## स्वसंवाद (२)

### ॐ पूर्णमद : पूर्णम इदम...

'**ॐ पूर्णमद:** पूर्णम इदम, पूर्णत पूर्णम उडच्चते ! पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णम एवं वशिष्यते !' असा एक संस्कृत श्लोक लहानपणी ऐकला होता. त्याचा अर्थ म्हणजे समस्त विश्व हे शून्य आहे, या शून्यातूनच सर्व गोष्टी उदीत होतात आणि त्या सगळ्या गोष्टी शून्यात विलीन होऊन शेवटी शून्यच शिल्लक राहते. ' असा अर्थ मेंदूला समजला होता. पण जाणवला नव्हता. आता जेव्हा वयाची सत्तरी जवळ येत चाललीय तेव्हा रोजच एक एक अनुभवातून ती जाणीव जास्त जास्त प्रबळ होत चाललीय.

ज्या ज्या क्षेत्रात आपण खूप तीर मारले आहेत, आपण तज्ञ असल्याचा फुकटचा मनात अभिमान वाटत होता त्या त्या क्षेत्रात आत्ता आपले कौशल्य शून्य झाल्याचा अनुभव रोज येतो आहे.

एक उदाहरण देतो, मी व माझे मित्र वयाच्या दहा-बाराव्यवर्षांपासून सायकल चालविण्यात पारंगत झालो होतो. महाविद्यालयात असताना आम्ही दोस्त मंडळी सायकलने नागपूर ते रायगडला छत्रपती शिवारायांच्या दर्शनाला गेलो होतो. येताना पन्हाळा, प्रतापगड बघत बघत परतलो होतो. रस्त्यात एखाद्या मित्राची सायकल पंक्चर झाली तर त्याला आपल्या सायकल वर डबलसीट घेऊन त्याची सायकल आपल्या बरोबर समांतर खेचत आणण्याची कला असणारे आपण, आता मात्र आपल्या दरवाजा पासून सोसायटी च्या गेट पर्यंत नातवाची सायकल चालवू शकत नाही. म्हणजे आपले ते कौशल्य शून्य झाले आहे. शाळा, कॉलेज मध्ये दादागिरी करणारे, रोजच्या मारामाऱ्याने वैतागलेल्या आई बाबांच्या शिव्या खाणारे दिवस गेलेत, तर भांडणाऱ्या मुलांना 'बेटा, भांडभांडी करु नये. शांत पणे बोलून वाद मिटविता येतो. ' असा उपदेश कधी पासून सुरु केला ते ही कळले नाही. म्हणजे ती अंगातील रग पण शून्य होत चाललीय. अक्खे इंजिनीरिंग चे शिक्षण डोक्यात भिनवून कोटी कोटी चे प्रकल्प डिझाईन ते पूर्ण पार पडणाऱ्या डोक्यात, रोजच्या भेटीतील व्यक्तीचे नाव कसे बरे लक्ष्यात राहत नाही ? म्हणजे स्मरणशक्ती शून्य होत चाललीय असे भासते. माणसाने कामावलेला पैसा, घरदार, शेती सगळं त्याच्यासाठी शून्य होते हे पहिले आहे आणि कळले आहे.

आपण आपल्या देशाच्या साठी ह्या ह्या गोष्टी केल्या आहेत, त्याची तारीफ, कौतुक समाजाने केलेल्याला अनेक वर्षे झालीत आणि आता समाज ते सर्व विसरून गेलाय, नव्या पिढीला तर ते माहित देखील नाही. म्हणजे आपले तथाकथित कर्तृत्व शून्य झालं आहे ही जाणीव देखील मनाला घट्ट, स्थिर आणि प्रबुद्ध करण्यासाठी उद्युक्त करत असते. केवळ आपण एक व्यक्ती म्हणून नाही, तर समस्त मानव समाज आदिमानवापासून प्रगत होत होत आता मात्र जातीवाद, धर्मवाद, भाषवाद, सत्तावाद, पैसा, आतंकवाद,विस्तारवाद, झुंड शाही, काळे गोरे, हुकूमशाही, आणि अणु शक्ती ची चढाओढ, करत करत तिसऱ्या सर्वविनाशक महायुद्धच्या उंबरठ्यावर येऊन ठेपले आहे, म्हणजे च शून्यातून शून्याकडे वाटचाल होतेय. या वरून आपली व सर्व जगताची वाटचाल शून्यातून येऊन शून्याच्या दिशेने निघाली आहे हे उमागते. म्हणूनच पुन्हा एकदा श्लोक आठवतोय, 'ॐ पूर्णमद: पूर्णम इदम, पूर्णत पूर्णम उडच्चते ! पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णम एवं वशिष्यते !'

▼ डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, हिंगणा रोड
नागपूर ४४१११०

# सावनेर नगर विकास आघाडीचा भाजपला प्रस्ताव

## नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसह पाच प्रभागाची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
सावनेर, दि. २४ :

स्थानिक सावनेर नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत चढाओढ निर्माण झाली असता अचानक सावनेर नगर विकास आघाडी ने भाजपचे माजी प्रदेश अध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आपला प्रस्ताव सादर केला आहे.



सावनेर नगरपालिकेत केदार गटाला शह देण्याकरिता मागील 28 वर्षापासून भाजप व नगर विकास आघाडी युती करून सत्ता काबीज करीत आहे मागील 18 वर्षापासून सातत्याने भाजप व आघाडीची युती सत्तेत आहे. आघाडीच्या प्रस्तावात सन 1997 च्या पंचवार्षिक निवडणूकित भाजपचे संख्याबळ कमी असताना ॲड. पल्लवी मुलमुले यांना समर्थन देत नगराध्यक्षपदी आरूढ केले होते. सन 2007 च्या पंचवार्षिक निवडणुकीत नगराध्यक्ष पद अडीच-अडीच वर्षासाठी राखीव होते, आघाडीचे संख्याबळ जास्त असल्यामुळे पहिले दीड वर्ष आघाडीला व उर्वरित एक वर्ष भाजपला असे ठरले असल्यामुळे दीड वर्ष संपताच आघाडीचे नगरपालिका अध्यक्ष ॲड.अरविंद लोधी यांनी राजीनामा देऊन भाजपचा नगराध्यक्ष पदारूढ केला होता परंतु पुढील अडीच वर्षाच्या काळात काही भाजप समर्थित नगरसेवकांनी केदार गटाशी हात मिळवणी करून सत्ता स्थापन केली. सन 2012 च्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये भाजप समर्थित दोन नगरसेवक असताना उपाध्यक्ष पद भाजप समर्थकांना देण्यात आले सन 2013-14 ला हद्द वाढ झालेल्या निवडणुकीत आघाडीने पूर्ण समर्थन देत राजू घुगल सह तिन्ही नगरसेवक भाजपचे विराजमान केले. सन 2017 च्या निवडणुकीत आघाडीने तत्कालीन नगराध्यक्ष रेखा मोवाडे यांना पाठिंबा देत नगर विकास आघाडीच्या प्रभाग क्रमांक एक व दोन मधून सर्वाधिक मताने आघाडी मिळून दिली, या सर्व बाबींचा उजाळा देत पुन्हा केदार गटाला झुंज देऊन पालिकेच्या सत्तेपासून दूर ठेवण्याकरिता व आघाडीचा त्याग बघून आणि आघाडीला लहान भाऊ समजून या सार्वत्रिक निवडणुकीत धर्मनिरपेक्ष मतदारांना सोबत घेऊन आघाडीला नगराध्यक्ष पदाची उमेदवारी व कमीत-कमी पाच प्रभाग (क्रमांक 1 2 3 5 व 8) सह एक स्वीकृत सदस्यांची मागणीचा प्रस्ताव आघाडीचे नेते व सुनील केदार यांचे कट्टर विरोधक अड अरविंद लोधी यांनी शिष्ट मंडळासह भाजप पक्षश्रेष्ठीकडे सादर केला आहे.

अनेक वर्षांपासून सावनेर शहराचे राजकारण हे आघाडी व भाजप यांच्या बुद्धिबळाच्या पास्यावर चालत आले आहे, ते नेहमी सुनील केदार गटाला पालिकेच्या सत्तेपासून दूर ठेवण्यात यशस्वी ठरले आहे. जर यावेळी भाजप ने आघाडीला उमेदवारी दिली तर काही दिग्गज या युतीला सावनेर पालिकेच्या सत्तेत आणण्याच्या तयारीत दिसत आहे. असे अड लोधी यांनी केले आहे.

# कॉमहेड यूकेतर्फे वृद्ध आणि गरजूंसोबत दिवाळीचा उत्सव साजरा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

मातृ सेवा संघ संचालित उमरेड रोडवरील पंचवटी वृद्धाश्रम तसेच वर्धा रोड, जामठा येथील अशोकवन सेवाश्रमात यावर्षी दिवाळीचा सण विशेष आत्मीयतेने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. कॉमहेड यूके या संस्थेच्या पुढाकाराने वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना पारंपरिक फराळाचे वाटप करण्यात आले तसेच त्यांच्या सोबत आपुलकीने संवाद साधून आनंदाचे क्षण वाटले गेले. या उपक्रमामुळे अनेक वृद्धांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलले, जे सहसा हा सण एकटेपणात साजरा करतात.

याप्रसंगी कॉमहेड यूकेचे कार्यकारी संचालक डॉ. उदय बोधनकर, मानद सचिव डॉ. प्राजक्ता कडूस्कर, कोषाध्यक्ष डॉ. कमलाकर देवघरे, महाराष्ट्र आयएमएच्या नवनियुक्त अध्यक्षा डॉ. मंजुषा गिरी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील ऑक्युपेशनल थेरपी स्कूलच्या प्राचार्या डॉ. सोफिया आझाद, नियोग थेरपिस्ट डॉ. प्रवीण डबली तसेच पंचवटी वृद्धाश्रमाच्या संचालिका टिकेकर काकू उपस्थित होत्या. यानंतर कॉमहेडतर्फे बाबा आमटे यांच्या विचारांनी प्रेरित वर्धा रोड, जामठा येथील अशोकवन सेवाश्रमात ही फराळाचे वाटप करून तेथील मनोरुग्ण आणि कुष्ठरुग्णांसोबत दिवाळीचा उत्सव साजरा करण्यात आला. या उपक्रमातून समाजातील उपेक्षित घटकांपर्यंतही आनंद आणि आपुलकीचा प्रकाश पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. दिवाळीच्या आनंदाची रोशनी वृद्धाश्रम आणि अशोकवनापर्यंत पोहोचवून ज्येष्ठ नागरिक तसेच समाजातील वंचित घटकांप्रती आदर आणि आत्मीयता व्यक्त करणारा हा उपक्रम सर्वांच्या हृदयाला स्पर्शून गेला. कॉमहेड (कॉमनवेल्थ असोसिएशन फॉर हेल्थ अँड डिसएबिलिटी) ही युनायटेड किंगडमस्थित आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था असून ती कॉमनवेल्थ फाऊंडेशनशी संलग्न आहे. ही संस्था जगातील ५४ कॉमनवेल्थ देशांमध्ये आरोग्य, पुनर्वसन आणि समाजसेवा या क्षेत्रांमध्ये कार्यरत असून पीडित आणि वंचित घटकांच्या कल्याण, सन्मान आणि सक्षमीकरणासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

# तृतीयपंथीयाच्या घरी चोरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

चोरांनी दिवसाढवळ्या एका तृतीयपंथीयाच्या घराचे कुलूप तोडून रोकड आणि दागिन्यांवर हातसाफ केला. ही घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी संगीता जयदेव खडतकर (३८) रा. बिनाकी मंगळवारीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

संगीता तृतीयपंथी असून आपल्या आईसोबत राहते. लोकांना पैसे मागून आपला उदरनिर्वाह चालवते, तर तिची आई साफ-सफाईचे काम करते. सकाळी ८ वाजताच्या सुमारास दोघीही त्यांच्या कामावर गेल्या होत्या. या दरम्यान अज्ञात आरोपीने मागच्या दाराचे कुलूप आणि कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील रोख २५ हजार रुपये आणि सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख ३६ हजार रुपये किंमतीचा माल चोरून नेला. दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास संगीताची आई घरी परतली असता चोरी झाल्याचे समजले. . पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# सम्यक थिएटर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशनच्या विद्यमाने विशेष प्रयोगाचे आयोजन रविवारी




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २४ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील पहिले महानाट्य 'महासूर्य'चा विशेष प्रयोग 26 ऑक्टोबर रोजी कवीश्रेष्ठ सुरेशभट सभागृह, रेशीमबाग, नागपूर येथे दुपारी 3 वाजता. आयोजित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील पहिले महानाट्य, अशी सांस्कृतिक इतिहासात नोंद झालेले 'महासूर्य' हे महानाट्य नागपूरकरांनी अत्यंत सामर्थ्यानें निर्माण केले आणि ज्यामुळे नागपूरकर कलावंतांचे नाव सर्वदूर पसरले; त्या ऐतिहासिक कलाकृतीला आता 25 वर्ष पूर्ण होत आहेत. 'महासूर्य' या महानाट्याचे लेखक व दिग्दर्शक डॉ. सुनील रामटेके हे असून निर्मिती सम्यक थिएटरने केली आहे. सम्यक थिएटर या संस्थेनेही 25 वर्ष पूर्ण केली आहेत. या निमित्ताने सम्यक थिएटर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेल्थ ऑर्गनायझेशन या दोन्ही संस्थांनी मिळून या विशेष प्रयोगाचे आयोजन केले आहे.

25 वर्षांपूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर अशी भव्य कलाकृती निर्माण करण्याचे स्वप्न नागपूरकर रंगकमीर्नी पाहिले आणि ते यशस्वी झाले. अनेक अंगांनी ही कलाकृती अत्यंत सक्षम असल्याची पावती सर्व स्तरातून मिळाली आहे. एक अनोखी आणि सामाजिक, सांस्कृतिक व कलात्मक दृष्टिकोनातून उत्तम अशी कलाकृती निर्माण करण्याचे श्रेय नागपूरकर रंगकमीर्ना नक्कीच आहे. या कलाकृतीचे सौंदर्य अजोड आहे. सलग तीन तास प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य त्यात आहे. महासूर्य आणि सम्यक थिएटर यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन जानेवारीमध्ये करण्यात येणार आहे.

प्रस्तुत महानाट्याच्या प्रयोग प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम, गिरीश गांधी, प्रसिद्ध न्यूरोलॉजिस्ट डॉ. संजय रामटेके, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधवी खोडे, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव तसेच इ. झेड. खोब्रागडे, डॉ. हिरेन नगराळे, अशोक गेडाम उपस्थित राहतील.

# नागपूरच्या तरुणीला पुण्यात अटक

### लग्नाचे आमिष दाखवून वृद्धाला चुना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :

शहरातील एका तरुणीला पुणे पोलिसांनी फसवणुकीच्या प्रकरणात अटक केली आहे. या तरुणीने एका वृद्धाला जाळ्यात अडकवले. लग्नाचे आमिष दाखवून पैसे उकळू लागली. अखेर वरिष्ठ नागरिकाने बिबवेवाडी पोलिसात तक्रार केली. गुन्हा नोंदवून पोलिसांनी आरोपी तरुणीला अटक केली. हर्षला राकेश डेंगले (२८) रा. न्यू ओमनगर, हुडकेश्वर असे अटकेतील तरुणीचे नाव आहे. पोलिसांनी तिच्याकडून काही पैसेही वसूल केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारकर्त्याने एका वृत्तपत्रात लग्नाशी संबंधित जाहिरात वाचली होती. त्यांनी त्या जाहिरातीत दिलेल्या नंबरवर १८ एप्रिल २०२५ रोजी संपर्क केला. कॉलवर बोलणाऱ्या हर्षला डेंगले हिने तिचे नाव ममता जोशी सांगितले आणि हळू-हळू वृद्धाशी मैत्री गाठली. काही दिवसांनी तिने कोल्हापुरात असल्याची माहिती देत पैशांची मागणी केली. तिने सांगितले की, तिच्या मावशीच्या मुलीचा अपघात झाला आहे आणि उपचारासाठी तत्काळ पैशांची आवश्यकता आहे. पुण्याला परतल्यानंतर पैसे परत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर ती वेगवेगळे बहाणे सांगून वृद्धाकडून पैसे उकळत गेली. तिने ऑनलाईन ट्रांजेक्शनच्या माध्यमातून वृद्धकडून एकूण ११ लाख ४७ हजार रुपये घेतले. दरम्यान तिच्याकडून वारंवार पैशांची मागणी होत असल्याने वृद्धाला संशय आला आणि त्यांनी १ जून रोजी पोलिसात तक्रार दाखल केली. पोलिसांनी फसवणूक आणि आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

तांत्रिक तपासात वृद्धाची फसवणूक करणारी हर्षला डेंगले असून ती नागपुरात राहात असल्याचे निष्पन्न झाले. तत्काळ पोलिसांचे एक पथक नागपूरला पोहोचले आणि तिला अटक केली. पोलिसांनी हर्षलाकडून ३ मोबाईल फोन आणि ११ लाख ४५ हजार रुपये जप्त केले.

महासागर Diwali special 2025 महासागर













